प्राज्ञ पाठशाळा मंडळ
वाई
८/५/०८
ग्रंथालय

नवभारत

मे २००८

वनिता सारस्वत

कमळाचं जाळं



सुंबरान मांडीलं ...

मराठी लोककथा

आणि इथं गोष्ट संपली.

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई – ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

निवेदन

राज्य मराठी विकास संस्था, मुंबई ही महाराष्ट्र शासनाने स्थापन केलेली स्वायत्त संस्था आहे. मराठी भाषा विभागाच्या पत्राप्रमाणे (संदर्भ क्र. मसंस २०१६/प्र.क्र.११५/२०१६/भाषा-२, दि. ३ जानेवारी, २०१७) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे '**महाराष्ट्रातील मराठी संशोधन मंडळ/ संस्थांना अर्थसाहाय्य योजना**' कार्यान्वित करण्यात आली असून या योजनेअंतर्गत महाराष्ट्रातील मराठी भाषा, साहित्य व संस्कृती वृद्धिंगत होण्यासाठी काम करणाऱ्या महाराष्ट्रातील मान्यताप्राप्त मंडळ/ संस्थांना अर्थसाहाय्य करण्यात येते.

सदर प्रकल्पांतर्गत प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई यांना राज्य मराठी विकास संस्थेद्वारे नवभारत मासिकांचे ऑक्टोबर १९४७ ते सप्टेंबर २०१७ पर्यंतच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासाठी अर्थसाहाय्य करण्यात आले होते. याअंतर्गत सदर अंकांचे संगणकीकरण करण्यात आले असून **प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई यांनी हे अंक जतन केलेले असल्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.**

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर असणार नाही.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाई संचालित मासिक

नवभारत

वर्ष ६१ । अंक ८ । मे २००८
चैत्र/वैशाख शके १९३०
वार्षिक वर्गणी २०० रुपये.
या अंकाची किंमत रु. २०/-

या अंकातील लेखांत व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व प्राज्ञपाठशाळा मंडळ सहमत असतीलच, असे नाही.

नवभारतची भूमिका*

मानवाच्या व मानवसंस्कृतीच्या विकासास व उन्नतीस पोषक होईल अशा प्रकारे महाराष्ट्रीय जीवनाचा व संस्कृतीचा विकास करणे, हे या मासिकाचे ध्येय व उद्दिष्ट आहे.

ध्येयप्रवण व्यक्तींनी स्वोन्नतीच्या हेतुपूर्तीसाठी जे आपले सांस्कृतिक मूल्यमापन ठरविलेले असेल, उच्च वातावरणातील जो अभिजात अनुभव स्वतःच्या साधनेने संगृहीत केलेला असेल, त्याचे दिग्दर्शन हेच संस्कृतिपोषक वाङ्मय होऊ शकते, असा संचालक व संपादक मंडळ यांचा विश्वास आहे.

या मासिकात येणाऱ्या लेखांत कोणत्याही विशिष्ट मताचा, वादाचा, पक्षाचा किंवा पंथाचा प्रचार करण्याचा हेतू नाही.

संचालक व संपादक-मंडळातील सर्व व्यक्ती यांचेही सर्व विषयांत मतैक्य आहे, असे नाही. मानवी जीवनविषयक व सांस्कृतिक मूल्यांसंबंधी सदृश अशा दृष्टिकोनानेच त्यांना एकत्र आणले आहे. तथापि प्रत्येकाचे व्यक्तिवैशिष्ट्य व विचारस्वातंत्र्य यांचा विनाश न होता विकास व्हावा या दृष्टीनेच त्यांचे सहकार्य राहील. प्रत्येक व्यक्ती आपल्या नावाने प्रसिद्ध होणाऱ्या लेखाबद्दलच जबाबदार राहील.

मासिकात प्रसिद्ध होणाऱ्या प्रत्येक लिखाणात सत्य-निष्ठा, संयम आणि सहिष्णुता असतील अशी काळजी घेतली जाईल.

* नवभारत, ऑक्टोबर १९४७, वर्ष १ ले, अंक १ मधील कै० शंकरराव देव यांच्या 'संचालकांचे मनोगत' मधून.

प्राज्ञपाठशाळामंडळ
अध्यक्ष व विश्वस्त :
सरोजा भाटे

संपादक :
श्री. मा. भावे

संपादक मंडळ :
वसंत पळशीकर, सुधीर रसाळ,
सीताराम रायकर, यशवंत कळमकर

९|५|०८

संपादकीय पत्रव्यवहार :
संपादक, *नवभारत* मासिक,
द्वारा : प्राज्ञपाठशाळा मंडळ,
वाई - ४१२८०३ (जि. सातारा).

व्यवस्थापकीय पत्रव्यवहार :
घ. वा. जोशी
व्यवस्थापक, *नवभारत* मासिक,
द्वारा : प्राज्ञपाठशाळा मंडळ, ३१५ गंगापुरी,
वाई - ४१२८०३ (जि. सातारा).

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने या नियत-कालिकाला अनुदान दिले असले तरी या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ व राज्य शासन सहमत असेलच, असे नाही.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

नवभारत

मे २००८

अनुक्रमणिका

'लोकमान्य ते महात्मा'च्या निमित्ताने - लेखांक ५ वा ४
बहुपक्षीय लोकशाहीची सुरुवात

➤ श्री० मा० भावे

श्री ज्ञानदेवांचे तत्त्वज्ञान १५

➤ रत्नाकर बापूराव मंचरकर

जन्म भाषेचा, पुराणकथेचा ३१

➤ विश्वनाथ खैरे

काल, आज आणि उद्या ३६
राष्ट्रीय ज्ञान आयोग

➤ साक्षी

लेखकांचा परिचय

- **प्रा. श्री. मा. भावे**

  माजी प्रपाठक व विभाग प्रमुख, गणित विभाग, नौरोजी वाडिया कॉलेज, पुणे; गणित व तत्त्वज्ञान या विषयांत पी.एच्.डी. व पदवीत्तुर संशोधन; शिक्षक चळवळीत सहभाग; शिक्षण, गणित व तत्त्वज्ञान विषयावर २५ शोधनिबंध प्रसिद्ध.

  पत्ता : ३३/२०, ४ थी गल्ली, प्रभात रोड, पुणे – ४११ ००४.

- **रत्नाकर बापूराव मंचरकर**

  मराठीचे सेवानिवृत्त अध्यापक, मध्ययुगीन मराठी वाङ्मयाचे अभ्यासक, साहित्य, शिक्षण आणि समाज यांवर वैविध्यपूर्ण लेखन, संपादन व शोध निबंध, लेखनाबद्दल राज्य पुरस्काराने सन्मानित.

  पत्ता : श्री स्वामी समर्थ, १९, नंदनवन कॉलनी, कोहिनूर मंगल कार्यालयासमोर, सावेडी, अहमदनगर –४१४००३.

- **विश्वनाथ खैरे**

  केंद्रिय सार्वजनिक बांधकाम खात्यातून अभियंते म्हणून निवृत्त; संस्कृत, मराठी, तामिळ या भाषांच्या आंतरसंबंधाचा विशेष अभ्यास, प्राचीन मिथ्यकथा, महाकाव्ये – पुराणे, प्राचीन भारतीय संस्कृती व परंपरा या विषयांमध्ये वैशिष्ट्यपूर्ण मौलिक लेखन; एकलव्य, युरेका, वंशाचा व्यास (नाटके), भारतीय मिथ्यांचा मागोवा, ज्ञानेश्वरांचे चमत्कार इत्यादी ग्रंथांचे कर्ते.

  पत्ता : ३७४, सिंध सोसायटी, पुणे – ४११ ००७.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

आदरांजली

❛ कुठल्याही प्रदेशाचा सांस्कृतिक वारसा जसा त्या प्रदेशातील ऐतिहासिक वास्तू, वास्तुकलेचे अवशेष, मंदिरे अशा मूर्त वास्तूंमध्ये असतो तसाच तो त्या प्रदेशात विकसित झालेल्या साहित्य, संगीत, चित्रकला अशा कलांमध्ये देखील असतो. साहित्याच्या प्रांतात लिखित साहित्याला मोठे महत्त्व असते. पण या लोकसाहित्यात पिढ्यानपिढ्या रुजलेली लोकसंस्कृती हा खरा लिखित साहित्याचा देखील पाया असतो. या लोकसंस्कृतीची जाण असणारा लेखक किंवा कवीच साहित्यात मोलाची भर घालू शकतो. महाराष्ट्रातील लोकसाहित्याचा हा वारसा मराठीच्या अभ्यासकांना आणि लेखकांना उपलब्ध करून देण्याचं अत्यंत मोलाचं काम डॉ. सरोजिनी बाबर यांनी केलेलं आहे. महाराष्ट्र लोकसाहित्य संशोधन मंडळाच्या अध्यक्ष म्हणून त्यांनी महाराष्ट्रातल्या नामवंत अभ्यासक आणि संशोधकांना एकत्र आणून तीस खंडांमध्ये लोकसाहित्याचं संकलन केलं. केवळ संकलनच केलं नाही तर त्या साहित्याचं वर्गीकरण, विश्लेषण आणि समालोचनही केलं. त्यांचे वडील, अण्णासाहेब बाबर, शिक्षणाधिकारी होते तसेच मोठ्या आत्मीयतेने लोक प्रबोधनाच्या कार्यात रममाण होणारे कार्यकर्तेही होते. सरोजिनी आक्कांनी लोकप्रबोधनाचा हा वारसा आयुष्यभर जोपासला. त्यांनी लिहिलेल्या आणि संपादित केलेल्या समाजशिक्षण मालेच्या प्रबोधनपर पुस्तिका महाराष्ट्राच्या खेड्यापाड्यापर्यंत पोहोचल्या. या कार्यासाठी त्यांना कुठलेही अनुदान मिळत नव्हते हे विशेष. त्यांनी शांता शेळकेंच्या जोडीने दूरदर्शनवर सादर केलेला 'रानजाई' हा कार्यक्रम खूपच लोकप्रिय झाला होता. बाळराज, जा माझ्या माहेरा, साजशिणगार असे त्यांचे संपादित साहित्य देखील लोकमानसात रुजलेले आहे.

ज्यांच्या संशोधनातून पुढच्या पिढ्यांना मार्गदर्शन मिळालं अशा सरोजिनी अक्का सिद्धहस्त लेखिका होत्या. त्यांच्या कथा, कादंबऱ्या आणि ललित लेखन सहज सुंदर मराठमोळ्या भाषेचा उत्कृष्ट नमुना आहे. त्या विधानसभेच्या दोनदा आणि राज्यसभेच्या देखील सभासद होत्या. पण राजकारणापेक्षा समाजकारणातच त्या जास्त रमल्या. त्यांच्या साहित्यातून त्या सतत आपल्याबरोबर आहेतच. त्यांच्या स्मृतीला आम्ही नवभारत परिवारातर्फे ही आदरांजली वाहतो. ❜

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थाद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

'लोकमान्य ते महात्मा'च्या निमित्ताने - लेखांक ५ वा

बहुपक्षीय लोकशाहीची सुरुवात

श्री० मा० भावे

In fact, the national movement was facing the basic problem that any mass movement has to face : how were they to carry on political work in the movement's non-active phases?

The Swarajists said that the work in the councils was necessary to fill in the temporary political void .... electioneering and speeches in the councils would provide fresh avenues for political agitation and propaganda.[१]

माँटेग्यू-चेम्सफर्ड सुधारणांनी प्रांतिक व केंद्रीय विधिमंडळातील निर्वाचित प्रतिनिधींची संख्या वाढविली होती. विधिमंडळात सरकार-नियुक्त सभासद आता अल्पमतात गेले होते. अर्थात् यामुळे सरकारी अधिकारांवर फारशी बंधने आली होती, असे नाही. कारण एखादे विधेयक किंवा अगदी अंदाजपत्रकही सभागृहात नामंजूर झाले, तरी गर्व्हनर अगर व्हाईसरॉय आपल्या अधिकारात ते विधेयक अंमलात आणू शके. तसेच एखादे खाजगी विधेयक सभागृहात मंजूर झाले, तरी ते निष्फळ ठरविण्याचे अधिकार सरकारला होतेच. असे असले तरी, लोकपक्षाला काही रोकडे अधिकार नक्कीच मिळाले होते. सभागृहाचा अध्यक्ष आता विधिमंडळातील सदस्यांनी निवडायचा होता. तसेच सभागृहाच्या निरनिराळ्या समित्यांवर काम करण्याची संधीही निर्वाचित सदस्यांना मिळणार होती.

पण अधिकाराचे अधिक वाटप प्रांतिक स्तरावर झाले होते. इथे नवीन सुधारणांनी द्विदल राज्यपद्धतीची प्रस्तावना केली होती. प्रांतिक स्तरावरील खात्यांचे 'सोपीव खाती' आणि 'राखीव खाती' असे दोन गट केले होते. 'सोपीव खात्यां'चा कारभार निर्वाचित प्रतिनिधींपैकी काहींची मंत्री म्हणून नेमणूक करून केला जाणार होता; तर 'राखीव खात्यां'चा कारभार गव्हर्नर व त्यांचे 'सल्लागार मंडळ' (कौन्सिल) यांच्या कडे राहणार होता. आपला कारभार पाहण्यास मंत्र्यांना पूर्ण मोकळीक होती, असे नाही. मंत्र्यांनी घेतलेला निर्णय गव्हर्नरला मान्य असेल तरच त्याची अंमल-बजावणी होत असे. इतके असले तरी मंत्रिपदाला एक झळाळी होती व तिचे आकर्षण निर्वाचित सदस्यांना वाटावे, हे साहजिकच होते.

परंतु, मंत्री हा विधिमंडळाला नव्हे तर गव्हर्नरला जबाबदार होता. विधिमंडळात एखादा पक्ष बहुमतात आहे, त्यामुळे त्या पक्षाचे प्रतिनिधीच मंत्री म्हणून नेमले जातील, असा काही नियम नव्हता; किंवा, अमुक एका मंत्र्याविरूद्ध अविश्वासाचा ठराव मंजूर झाला म्हणून त्या मंत्र्याला राजीनामा द्यावा लागेल, अशीही स्थिती नव्हती. नवीन सुधारणांचा हेतू स्पष्ट करताना माँटेग्यूने म्हटले होते की, 'प्रशासनाच्या प्रत्येक शाखेत हिंदी लोकांचा सहभाग असावा; स्वयं-प्रशासित (सेल्फ गव्हर्निंग) अशा संस्था टप्प्या टप्प्याने निर्माण व्हाव्यात; आणि ब्रिटिश साम्राज्याच्या अंतर्गत जबाबदार सरकाराची हिंदुस्थानावर राज्य करण्यासाठी स्थापना होण्याकडे वाटचाल व्हावी, असा आमचा उद्देश आहे.'[२] ही वाटचाल केंद्रीय स्तरावरून सुरू न करता प्रांतिक स्तरावरून सुरू झाली होती.

१९२० सालच्या निवडणुकात स्वराज्य पक्ष उतरलाच नव्हता; त्याची स्थापनाही तेव्हा झाली नव्हती. पण १९२३ च्या नोव्हेंबरला काँग्रेसची एक शाखा या नात्याने फेरवाद्यांनी स्वराज्य पक्षाच्या नावावर निवडणुका लढविल्या. या निवडणुकीत स्वराज्य पक्षाला

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

लक्षणीय यश मिळाले. केंद्रीय विधिमंडळात स्वराज्य-पक्षाचे ४५ सदस्य निवडून आले. मुंबई प्रांतिक विधिमंडळात १११ जागा होत्या; पण त्यापैकी फक्त ४६ जागा सर्वसाधारण (म्हणजे गैर राखीव) होत्या. (त्यातही मराठा १, तत्सम जातींसाठी ९ जागा–स्वतंत्र मतदार संघ नसलेल्या पण तरीही राखीव अशा होत्या.) त्यांपैकी २८ जागा स्वराज्य-पक्षाने लढविल्या व २३ जिंकल्या. पण स्वराज्य पक्षाला दैदिप्यमान यश मध्यप्रांत-वऱ्हाडच्या विधिमंडळात मिळाले. तेथे ७० सभासद असून त्यापैकी ५३ जागांसाठी निवडणूक घेतली जाई. या ५३ पैकी ४१ जागा स्वराज्य-पक्षाने जिंकल्या व आणखी ४ सभासदांचा पाठिंबा या पक्षाला होता. डॉ. मुंजे विधिमंडळ स्वराज्य-पक्षाचे नेते होते. बंगाल प्रांतात स्वराज्य-पक्षाकडे बहुमत नव्हते पण तो खूपच मोठा पक्ष होता.[३]

इंग्रज सरकारने मॉंटेग्यू–चेम्सफर्ड सुधारणांची प्रस्तावना करताना 'हिंदुस्थानात जबाबदार राज्यपद्धती निर्माण करायची व प्रशासनात अधिकाधिक हिंदी लोकांचा समावेश करून घ्यावयाचा,' असे उद्दिष्ट तोंड भरून सांगितले असले, तरी त्यांचा अंतस्थ, पण गुप्त न राहिलेला हेतू, हा होताच की, अधिकारपदांचे आमिष दाखवून राष्ट्रीय चळवळीत बेदिली माजवावयाची व आपल्या प्रशासनाला सहाय्यभूत होतील असे सहकारी (कोलॅबोरेटर्स) मिळवायचे. त्यामुळेच, गर्व्हनरवर विधिमंडळात बहुसंख्य असणाऱ्या पक्षातूनच मंत्री घ्यावेत असे बंधन नसतानाही, मध्यप्रदेश + वऱ्हाडच्या गर्व्हनरने मुंज्यांना तर बंगालच्या गर्व्हनरने दासांना मंत्रिमंडळाची स्थापना करण्यासाठी बोलाविले.

– १ –

असहकाराच्या चळवळीपासून 'कौन्सिल बहिष्कार' हा गांधीवादी कॉंग्रेसजन व पारंपरिक कॉंग्रेसजन यांच्यातील वादाचा कळीचा मुद्दा होऊन राहिला होता. हिंदी राष्ट्रवादाचे आरंभीचे नेते गृहीतच धरून चालले होते की, विधिमंडळाचा क्रमशः विस्तार होईल, तेथील लोकप्रतिनिधींची संख्या वाढेल, त्या प्रतिनिधींचे प्रशासनावरील नियंत्रण अधिक प्रभावी होत जाईल आणि यातून स्वराज्य मिळेल.[४] गांधी देखील याच विचाराचे होते. पण 'खिलाफत' ची चळवळ उभी राहिली व मुसलमान त्या चळवळीत निकराने भाग घेतील, अशी आशा गांधींना वाटली. त्यामुळे त्यांनी सर्वंकश असहकाराचे पाऊल उचलले. या असहकाराच्या कल्पनेने राजकारणात नुकतीच उतरलेली राजेंद्र प्रसाद, वल्लभभाई पटेल, राजगोपालाचारी इत्यादींची नवी पिढी भारावल्यासारखी झाली. 'बार्डोली'नंतर असहकाराची चळवळ तहकूब झाली तरी 'कौन्सिल–बहिष्कार' उठविण्यास हे लोक तयार नव्हते. त्यामुळे मोतीलाल नेहरू, विठ्ठलभाई पटेल, चित्तरंजन दास यांनी अशी भूमिका घेतली की, 'आम्ही विधिमंडळात असहकार बरोबर घेऊनच जातो आहोत. आम्ही मंत्रिपदे स्वीकारणार नाही, तसेच गव्हर्नरच्या 'सल्लागार मंडळा'वरही जाणार नाही. आम्ही सरकारी विधेयके, इतकेच नव्हे तर अंदाजपत्रके देखील नामंजूर करू व सरकारला त्यांच्या विशेषाधिकाराचा वापर करूनच कारभार करता येईल, अशी परिस्थिती निर्माण करू ! या नव्या सुधारणा कशा पोकळ व फसव्या आहेत, हे जगाला उघड करून दाखवू.' अशा कडव्या भूमिकेतून स्वराज्यपक्षाने विधिमंडळात प्रवेश घेतला असल्याने मुंजे आणि दास या दोघांनीही मंत्रिमंडळे स्थापण्याला नकार दिला.

खरे तर स्वराज्यपक्षाचे हे धोरण मुळातच व्यवहाराला सोडून होते. गांधींनी तुरूंगातून सुटून आल्यावर 'नाफेर'वाल्यांना सांगितले की, त्यांनी स्वराज्यपक्षीयांना त्यांच्या मताप्रमाणे काम करण्यास मोकळीक द्यावी; त्याच वेळी त्यांनी असेही म्हटले की, असहकार व विधिमंडळ प्रवेश या दोन्ही गोष्टी एकत्र नांदू शकत नाहीत. आम्ही विधिमंडळात जाऊन सरकारी कारभाराला अडथळा निर्माण करू, हे म्हणणे फोल आहे. त्याऐवजी कॉंग्रेसचा जो खादी, ग्रामोद्योग, दारूबंदी, इत्यादी विधायक कार्यक्रम आहे, तो सरकारी

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

पातळीवरून अंमलात आणण्यासाठी विधिमंडळाचा उपयोग केला पाहिजे. हिंदुस्थानासारख्या मागासलेल्या देशात प्रगती घडवून आणण्यासाठी सरकारने प्रयत्न करणे हे पराकाष्ठेच्या गरजेचे आहे, हे आपल्याला स्वातंत्र्यानंतर कळले आहे; व आताच्या 'मुक्त अर्थव्यवस्थे'च्या काळातही प्रत्येक क्षेत्रातील नवीन उपक्रमांसाठी आपणाला सरकारी मदत लागते, हे आपण पावलोपावली अनुभवत आहोत. पाऊणशे वर्षांपूर्वी परिस्थिती आणखीच अवघड होती, यात संशय नाही. त्यामुळे नाफेरवादी देखील 'कौन्सिल-बहिष्कार' विसरून आपले प्रश्न विधिमंडळात चर्चिले जावेत अशी अपेक्षा धरीत. नंदांनीही म्हटले आहे की, १९३७ साली काँग्रेसने विधिमंडळावरील बहिष्काराचा पवित्रा सोडला व (१९३५ च्या कायद्याने दिलेल्या) सुधारणा राबविण्याचा निर्णय घेतला, तशासारखा निर्णय १९२४ सालीच घ्यायला हवा होता. अनेक नेमस्त आणि मुसलमान नेत्यांचा (जिनांसकट) हाच सल्ला होता. जर स्वराज्यवाद्यांनी 'अडथळ्यां'चा धोशा लावला नसता तर, कदाचित हे नेमस्त व मुसलमान पुढारीही स्वराज्य पक्षाबरोबर राहिले असते.

स्वराज्यपक्षाने केंद्रीय विधिमंडळात व इतरत्रही उत्तम कामगिरी केली व सरकारच्या नाकी नऊ आणले. नेमस्त, जिना व मालवीय यांची वेळोवेळी मदत मिळवून त्यांनी सरकारचे सभागृहात अनेकदा पराभव केले. प्रांतातूनही हेच धोरण अवलंबून स्वराज्यपक्षाने सरकारला कारभार करणे अशक्य करून सोडले. वारंवार आपल्या विशेषाधिकारांचा वापर करून सरकारला राज्य चालवावे लागले आणि मॉंटेग्यू चेम्सफर्ड सुधारणा कशा फोल आहेत हे जगाच्या निदर्शनास आले. स्वयंशासनाच्या दिशेने प्रगती व्हावी यासाठी झपाट्याने नवीन सुधारणा झाल्या पाहिजेत, नागरी स्वातंत्र्यांवर सरकारकडून घाला पडू नये व राजकीय कैद्यांची सुटका व्हावी, आणि भारतीय उद्योगांना प्रोत्साहन मिळावे हे तीन मुद्दे स्वराज्यपक्षाने विधिमंडळात आवेशाने लावून धरले. कुंठित झालेल्या राष्ट्रीय चळवळीला स्वराज्य पक्षाने विधिमंडळात चालविलेल्या राजकारणाने एक नवी वाट मिळाली. स्वराज्य पक्षाच्या पुढाऱ्यांनी विधिमंडळात दिलेली व्याख्याने, त्यांनी केलेले सभात्याग, त्यांनी सरकारचे केलेले पराभव, मांडलेली विधायके यांच्या वृत्तपत्रातून ज्या चर्चा चालत, ते प्रतिनिधी आपली कामगिरी जनतेला समजावून सांगण्यासाठी जी व्याख्याने देत, नवीन वादांना जे तोंड फुटे त्यामुळे संसदीय लोकशाहीची एक चटक लोकांना लागली हे मान्य करावेच लागेल. न पेक्षा, असहकाराची चळवळ विफल झाल्यावर पुनः उग्रवादी व अतिरेकी चळवळी राजकीय अवकाश व्यापून टाकतील अशी शक्यता होती.

या संबंधात ज्याची विशेष दखल घ्यावी अशी गोष्ट म्हणजे या उग्रवादी व डाव्या अतिरेकी चळवळीच्या पुढाऱ्यांना त्यांच्या खटल्याबाबत व नंतरच्या तुरूंगवासात केळकरांसारख्या विधिमंडळ सदस्यांनी केलेली मदत. नागरी स्वातंत्र्याचा जो आग्रह स्वराज्य पक्षाने धरला होता त्याच्या अनुषंगानेच ती मदत केली जात होती. भगतसिंगाने केंद्रिय विधिमंडळात बॉंबस्फोट केला. त्यावेळी वाटलेल्या किंवा भिरकावून टाकलेल्या पत्रकात त्याने मोतीलाल नेहरु, केळकर, जयकर यांच्या कामाचा आदरपूर्वक उल्लेख केला होता. केळकरांनी आपल्याला जी मदत केली तिचा उल्लेख डांग्यांनी देखील केला आहे.

- २ -

विधिमंडळात तर जायचे, पण ते सरकारी कामात केवळ अडथळे आणण्यासाठी, या भूमिकेतील अंतर्विग्रह स्वराज्यपक्षाच्या अनुभवाला येऊ लागला. मंत्रिपदे स्वीकारण्याला स्वराज्यपक्षाच्या घटनेतच बंदी घातलेली होती. पण विधिमंडळाचे अध्यक्षपद स्वीकारायला किंवा सरकारने नेमलेल्या समित्यांवर कामे करण्याला बंदी नव्हती. त्यामुळे केंद्रिय विधिमंडळाच्या अध्यक्षपदाची निवडणूक विठ्ठलभाई पटेल यांनी लढविली व अवघ्या दोन मतांच्या फरकाने ते

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

निवडून आले. विधिमंडळाचे अध्यक्ष म्हणून त्यांना, त्या काळात, द. म. ४००० रु. पगार मिळे. हा पगार त्यांनी, खरे तर, स्वराज्यपक्षाकडे जमा करावयाचा होता. पण त्यांनी तसे करण्यास नकार दिला व 'मी आता स्वराज्यपक्षाचा उरलो नाही' असे तांत्रिक दृष्ट्या बरोबर कारण दिले.[८] खुद्द मोतीलाल नेहरु यांनी 'स्क्रीन-समिती'वर काम केले. 'हिंदी लष्करात हिंदी अधिकाऱ्यांना कसा वाव द्यावा,' या महत्त्वाच्या प्रश्नांचा विचार करण्यासाठी ही समिती नेमलेली होती. त्यामुळे त्या समितीवर लोकप्रतिनिधींनी जाणे इष्टच होते. तथापि, अधिकारोत्सुक अशा इतर सभासदांना 'मोतीलालांनी स्क्रीन समितीवर काम केले' ही सबब आपली अधिकार लालसा उघडपणे सांगायला पुरेशी झाली. त्यामुळे स्क्रीन समितीवर काम केले हे चुकले, असे मान्य करून त्या समितीच्या कामाचे मिळालेले पैसे मोतीलालानी स्वराज्यपक्षाकडे जमा केले.[९] बापूजी अणे हे देखील रेल्वे फायनान्स समितीचे सभासद होते. पटेल, मोतीलाल, अणे अशा दिग्गज नेत्यांनी ही उदाहरणे घालून दिल्यावर 'मंत्रिपद स्वीकारले नाही तरी सरकारी समित्यांचे अगर आयोगाचे सभासदत्व स्वीकारण्यास काय हरकत आहे?' असे विचारणाऱ्या सभासदांची संख्या वाढत चालली.[१०]

प्रांतिक स्तरावरील विधिमंडळात स्थानिक प्रश्नांचा विचार होत असल्याने ती प्रजेला फार जवळची वाटत. तसेच प्रांतिक विधिमंडळाचा सदस्य मंत्री होऊ शके व मंत्री झाल्यावर आपल्या जवळच्यांवर कृपा करणे व नावडत्यांवर अवकृपा करणे या गोष्टी त्याला शक्य होत. (उदा. ना. सी. फडके यांनी असा आरोप केला आहे की रँ. परांजपे यांनी मुंबई प्रांताच्या शिक्षणमंत्रिपदाचे वजन वापरून फडक्यांची हैद्राबाद (सिंध) येथील महाविद्यालयातील नोकरी घालविली.[११]) साहजिकच प्रांतिक विधिमंडळांना, एका अर्थाने, केंद्रीय विधिमंडळापेक्षा जास्त महत्त्व होते. याच कारणाने टिळकांनी १९२० साली आपल्या 'कॉंग्रेस डेमोक्रॅटिक पार्टी' तर्फे केळकरांना प्रांतिक विधिमंडळाच्या जागेसाठी तर खाडिलकरांना केंद्रीय विधिमंडळावरील जागेसाठी उभे केले होते. आता, १९२३ साली, दासांनी बंगाल विधिमंडळाची निवडणूक लढविली व मुंज्यांनी मध्यप्रदेश + वऱ्हाड विधिमंडळावर जाण्याचे ठरविले याचे कारण हेच होते. प्रांतिक विधिमंडळ सदस्यासमोर आमिष मोठे होते. त्यामुळे या सदस्यांना स्वराज्य-पक्षाच्या शिस्तीत वागविणे मुत्सद्दीपणाचे काम होते. त्यासाठी दास, मुंजे, जयकर अशी मुरब्बी माणसे प्रांतिक विधिमंडळपक्षांच्या नेतेपदी असावीत, हेच योग्य होते.

अशा अवघड परिस्थितीत स्वराज्यपक्षात बेशिस्तीची लागण होणे साहजिक होते. मद्रास व पंजाब येथील विधिमंडळात स्वराज्य-पक्ष अगदीच अल्पमतात होता. त्याचे अनु. ७ व ८ सभासद या विधिमंडळात होते. जस्टिस पार्टी हा ब्राह्मणेतरांचा पक्ष मद्रासमध्ये मोठ्या संख्येने होता तर पंजाबात स्थानिक जमिनदार-पक्षाचे प्राबल्य होते. या दोन्ही ठिकाणी मंत्रिपदाची आमिषे दाखवून स्वराज्य-पक्षात बेशिस्त माजविण्यात इंग्रज सरकार यशस्वी झाले. मध्यप्रांतातील विधिमंडळ पक्षनेते मुंजे यांच्यामागे सदस्य मंडळी (यांना आपण 'आमदार' म्हणू) टुमणे लावून बसलीच होती की, 'आम्हास मंत्री होऊ द्या, निदान समित्यांवर कामे करू द्या.'

खुद्द मुंज्यांना मंत्रिपद मुळीच नको होते. (त्या काळी मंत्रिपदाला 'दिवाणगिरी' म्हणत असत.). त्यांना मुळात केंद्रीय विधिमंडळात जावयाचे होते.[१२] पण पक्षाच्या दडपणामुळे त्यांनी नागपूर शहरातून निवडणूक लढविली. ते आमदार झाले व विधिमंडळ स्वराज्यपक्षाचे नेते झाले. त्यांच्यापुढे आपल्या आमदारांना सरकारच्या आमिषाला भुलण्यापासून कसे रोखायचे हा मोठाच प्रश्न होता. त्यातून अवघड भाग असा होता की, स्वराज्य पक्षाचे केवळ अडवणुकीचे धोरण स्वतः मुंज्यांना तत्त्वतः अमान्य होते. अशा स्थितीत आपल्या 'कळपाला' काबूत ठेवण्यासाठी मुंज्यांना अनेक हिकमती लढवाव्या लागल्या. 'विशिष्ट अटीवर दिवाणगिऱ्या घ्यावयास हरकत नाही असेही

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

त्यांनी दिवाणगिऱ्या घ्याव्या असे मत असलेल्या आपल्या अनुयायांस सांगितले होते. पण त्या अटी सरकारला मान्य नसल्यामुळे त्या (पक्षी: मध्यप्रांत) प्रांतात दिवाण नेमण्यात आले नाहीत..... असे करण्यामध्ये त्यांचा उद्देश दिवाणगिऱ्या घेण्यात येऊ नयेत असाच होता, असेही डॉक्टरसाहेबांनी (पक्षी: मुंज्यांनी) सांगितले."[१३]

मुंज्यांचे जे विरोधक होते त्यांनी मुंज्यांच्या या वर्तणुकीचा अर्थ मुंजे हे आमदारांना दिवाणगिऱ्या घेण्यास फूस देत होते, असा केला. श्रीधर बळवंत तांबे हे एक स्वराज्यपक्षीय आमदार होते. ते काही फार नावाजलेले पुढारी होते, असे नाही. त्यांना अधिकार-स्वीकाराची हाव होती. त्यांची ही हाव मुंज्यांनी त्यांना विधिमंडळाचे अध्यक्ष करून पुरविलीही होती. पण तेवढ्याने त्यांची सत्ताकांक्षा शमली नाही. सरकारने त्यांना गृहमंत्रिपदाची लालूच दाखविताच त्यांनी गृहमंत्रिपद स्वीकारले. इथे हे लक्षात ठेवणे जरूर आहे की, 'गृहमंत्री' हा 'दिवाण' नव्हता, तर गव्हर्नरच्या सल्लागार मंडळात होता. इथून स्वराज्य पक्षातील उत्पाताला सुरूवात झाली. त्याला अधिक कर्कश रूप आले ते केळकरांनी तांब्यांना अभिनंदनाची तार पाठविली, त्यामुळे.

१ नोव्हेंबर १९२५ या दिवशी या उत्पाताचा विचार करण्यासाठी स्वराज्यपक्षाच्या कार्यकारिणीची सभा नागपूरला भरविण्यात आली. त्याच दिवशी, पण त्या आधी, मध्यप्रांत + वऱ्हाड या प्रांताच्या स्वराज्यपक्षाची सभा झाली. या सभेला मोतीलाल, जयकर, केळकर, श्रीनिवास अय्यंगार इ., राष्ट्रीय स्तरावरची पुढारी मंडळी हजर होती. सभेत तांब्यांच्या निषेधाचा ठराव बॅ. मोरोपंत अभ्यंकर यांनी मांडला; व तो मंजूर होऊन सभा संपली असती तर फाटाफूट उफाळून आलीही नसती. पण, असे दिसते की, मुंजे यांचे विरोधक असणाऱ्या अभ्यंकर गटाने मुंज्यांच्या 'पक्षविरोधी' कारवायांवर हल्ला चढविला. त्यात तांब्यांनी अणे यांना लिहिलेले पत्र अभ्यंकरांनी सभेपुढे ठेवले. या पत्रात तांब्यांनी लिहिले होते की, "मुंजे व बाबासाहेब परांजपे यांचे असे मत आहे की, दिवाणांचे पगार-जे स्वराज्य पक्षाने आपले बहुमत वापरून नामंजूर केले होते - ते (आता) मंजूर करावेत व दिवाणगिऱ्या स्वीकाराव्यात. दिवाणांनी पगारापैकी पुरेसे पैसे स्वत:कडे ठेवून बाकीचे पक्षाकडे जमा करावेत. हे तुम्हास योग्य वाटते का?" या पत्राविषयी मुंजे काहीच बोलले नाहीत. त्यांनी सर्वसाधारण खुलासा केला की, "मी माझी मते कधीच चोरून ठेवली नाहीत. 'दिवाण नेमू नका' अशी स्वराज्य पक्षाची आज्ञा पंडित नेहरूंकडून येताच मी त्यांस कळविले की "तुम्ही म्हणता तर तसे करू-पापपुण्य तुमच्याकडे." मग पं. नेहरुंकडून आलेला हुकूम अंमलात आणण्यासाठी मला बऱ्याच लटपटी कराव्या लागल्या! राजकारणात असे करावेच लागते.... अखेर दिवाण नेमले न जाऊ देण्याच्या प्रयत्नात यशस्वी झालो."[१४]

यानंतर अभ्यंकर गटाने असा ठराव सभेपुढे आणला की, 'सध्याच्या परिस्थितीत स्वराज्य पक्षाच्या चालू कार्यक्रमात बदल करण्याची काहीच जरूर नाही. हल्ली आहे तोच कार्यक्रम चालू ठेवावा.' हा ठराव ३८ विरूद्ध १६ मतांनी मंजूर झाल्यावर मुंजे गटाच्या लोकांनी मुंज्यांच्या विधिमंडळपक्षनेता म्हणून काम करण्यावर विश्वासाचा ठराव मांडला. पण तोपर्यंत सभा विस्कळीत झाली असल्याने तो मागे घेण्यात आला.

बॅ. मोरोपंत अभ्यंकर हे अतिशय यशस्वी वकील होते. त्यांचा मुळी निश्चयच होता की, दिवसाला ५०० रू. पेक्षा कमी प्राप्ती ज्यातून होईल, असा खटला स्वीकारायचाच नाही. यावरून त्यांची आमदनी काय असेल, याची कल्पना येईल. ख्याली-खुशालीत व मिजाशीत जगावे, मद्य-प्राशन व मांसभक्षण त्याज्य मानू नये, फाकडे व शिवराळ इंग्रजी/मराठी बोलावे अशी त्यांची जीवनशैली होती. या काळात (१९२३-२६) ते केंद्रीय विधिमंडळाचे सभासद होते. त्यामुळे, व दोघांच्या वृत्तीतील साम्यामुळे, मोतीलाल व मोरोपंत यांची गट्टी झाली होती. मुळांत अभ्यंकरांनी आपल्या राजकीय

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थाद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

जीवनाची सुरूवात मुंज्यांचे सहकारी म्हणून केली होती. पण दिल्लीस गेल्यापासून त्यांनी मुंज्यांविषयी वैरभाव बाळगिला होता."[१५] वर सांगितलेल्या सभेला मोतीलाल हजर होते. या सर्वांवरून असा समज होतो की, मुंजे पक्षाला बदनाम करण्यासाठी ही सभा वापरण्याचा कट मोतीलाल, मोरोपंत व स्वराज्यपक्षाचे हिंदी भाषक सभासद यांच्यात आधीच शिजला असावा.

इथपर्यंतच्या विवेचनावरून हे स्पष्ट होईल की, तांबेप्रकरणाशी केळकरांचा संबंध केवळ तांब्यांना अभिनंदनाची तार पाठविण्यापुरताच होता. केळकरांनी हे पुनःपुनः व जीव तोडून सांगितले की, "तांबे हे ओळखीचे गृहस्थ असल्यामुळे केवळ वैयक्तिक पातळीवरून मी तार पाठविली." मुळात उद्रेक निर्माण झाला होता तो मध्यप्रदेशातील स्वराज्यपक्षात. त्याच्याशी केळकरांचा संबंध नव्हताच. केळकर, जयकर, मुंजे या सर्वांचा स्वराज्यपक्षाच्या नकारात्मक धोरणाला विरोध होता व तो त्यांनी काही लपवून ठेवला नव्हता. त्यांची भूमिका अशी होती की, आम्ही स्वराज्यपक्षाचे हे धोरण बदलण्यासाठी प्रयत्न करीत राहू. आपली ही मते केळकर, जयकर, मुंजे यांनी जानेवारी १९२५ मध्ये स्वराज्यपक्षाच्या कार्यकारिणीत मांडली होती. यातही बेशिस्त होत नव्हती. बरे, तार करण्यात केळकरांनी चूक केली होती, तर स्क्रीन समितीचे सदस्यत्व स्वीकारण्यात मोतीलालांनीही चूक केली होती. तेव्हा स्वराज्यपक्षातील फाटाफुटीला 'केळकरांनी पाठविलेली तार कारणीभूत होती' असे जे चित्र प्रा. मोरे यांनी काका गाडगीळ यांच्या आत्मचरित्राच्या आधाराने रंगविले आहे, ते अतिरंजित आहे. (७२२-२३)

गोष्ट अशी दिसते की, मध्यप्रांतात स्वराज्यपक्षाने मिळविलेल्या यशामुळे व मध्यप्रांतातील त्या पक्षाची धुरा मुंजे, बाबासाहेब परांजपे अशांसारख्या - - स्वराज्य पक्षाच्या नकारात्मक धोरणाला विरोध करणाऱ्या-मराठी पुढाऱ्यांकडे असल्यामुळे, मोतीलाल नेहरुंना ही मंडळी आपल्याला डोईजड होणार अशी धास्ती वाटू लागली. त्यांनी, बहुधा, निश्चयच केला असावा की, अभ्यंकर हे आपले मराठी मित्र व महाकोशल भागातून निवडून आलेले हिंदी आमदार यांच्या सहाय्याने मुंज्यांचे नेतृत्व उखडून टाकावयाचे. जून १९२५ मध्ये दास वारले. ऑक्टोबर २५ मध्ये तांब्यांनी गृहमंत्रिपद स्वीकारले, १ नोव्हेंबर १९२५ रोजी - - मोतीलालांच्या उपस्थितीत - अभ्यंकर व त्यांचे सवंगडी यांनी मुंज्यांवर तोंडसुख घेतले. २५ नोव्हेंबर १९२५ ला मोतीलालांनी गांधींना लिहिले, "तुम्हाला माहिती आहे की, मराठा गटाची असहकाराला कधीच मान्यता नव्हती. लोकमताच्या दडपणामुळे त्यांनी असहकाराच्या चळवळीत भाग घेतला. स्वराज्यपक्षाच्या तत्त्वांवर विश्वास नसतानाही ते स्वराज्यपक्षाला मिळाले त्याचे कारणही तेच (म्हणजे लोकमताचा रेटा) होते. मी त्यांना आता खडखडीतपणे सांगणार आहे की, दिवाणगिऱ्या स्वीकारायला मी कधीच संमती देणार नाही. "प्रतियोगी सहकारिता" हे दिवाणगिऱ्या पत्करण्याला दिलेले साळसूद नाव आहे.... कानपूर कॉँग्रेसमध्ये या प्रश्नावर पडदा पडेल."[१६]

१९२५ सालचे कॉँग्रेसचे अधिवेशन कानपूरला भरणार होते व त्याच्या अध्यक्षपदासाठी केळकरांचे नाव सुचविण्यात आले होते. तेव्हा गांधी-नेहरु पक्षाने सरोजिनी नायडू यांचे नाव पुढे करून त्यांना निवडून आणले. केळकरांना दुसऱ्या क्रमांकाची मते मिळाली."[१७] या अध्यक्षपदाच्या निवडणुकीच्या बाबतीत जी हातमिळवणी झाली तिचा संकेत वरील पत्रात दिसतो. याच सुमाराला मोतीलालांनी "महाराष्ट्रीय पक्ष हा स्वराज्यपक्षरूपी शरीराचा कुजलेला भाग आहे. तो कापूनच काढला पाहिजे" अशी घोषणा केली.

नोव्हेंबर १९२५ मध्येच महाराष्ट्रातील एक गठ्ठा स्वराज्य पक्ष आणि मध्यप्रांत-वऱ्हाड येथील स्वराज्यपक्षातील बहुसंख्य आमदार यांनी स्वराज्यपक्षा-पासून वेगळे होण्याचे ठरविले. जयकर, केळकर, मुंजे, अणे इ. पुढाऱ्यांनी स्वराज्य पक्षाच्या कार्यकारिणीचे राजीनामे दिले. जानेवारी १९२६ मध्ये स्वराज्य पक्षाचे अधिवेशन कानपूरला भरले. तेथे 'कार्यक्रमविषयक

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

धोरणाच्या ठरावाला जयकरांनी उपसूचना आणली की, अडवणुकीचे धोरण सरसकट लावण्यात येऊ नये. ..... ही उपसूचना २८ विरूद्ध ६९ मतांनी नामंजूर झाली .....जयकरांना, केळकरांना व अण्यांना त्यांनी दिलेले राजीनामे परत घेण्याची विनंती करण्यात आली. पण आपणास आता उघडपणे प्रतियोगी सहकारितेचा प्रचार करायचा आहे, म्हणून आम्ही राजीनामे परत घेऊ शकत नाही, असे त्यांनी सांगितले."[१८] फेब्रुवारी १९२६ मध्ये प्रतिसहकार पक्ष रीतसर स्थापन झाला.

तांबे-प्रकरणाचा बनाव हा असा आहे. मी वर सांगितल्याप्रमाणे जयकर-केळकर यांचा तांब्यांनी गृहमंत्रिपद स्वीकारण्याशी साक्षात् संबंध काहीच नव्हता. मोतीलाल यांना संताप आवरत नसे व दास गेल्यानंतर आपण स्वराज्यपक्षाचे कर्तुमकर्तुम अध्वर्यू आहोत अशी अहं-पणाची स्वप्ने त्यांना पडू लागली असावीत. त्यामुळे हे सारे प्रकरण ज्या समजूतदारपणाने हाताळता आले असते तसे त्यांनी हाताळले नाही. नंदा यांचा अभिप्रायही असाच आहे."[१९]

१९२६ सालच्या निवडणुकात प्रतिसहकारपक्ष महाराष्ट्रात व वऱ्हाडात यशस्वी झाला. मध्यप्रांतात या पक्षातील रामराव देशमुख, बा. गं. खापर्डे, राघवेंद्रराव अशा अनेकांना दिवाणगिऱ्या मिळाल्या. केंद्रीय पातळीवर केळकर, जयकर, मुंजे, अणे हे पुढारी निवडून आले. अभ्यंकरांनी मुंज्यांविरूद्ध निवडणूक लढविली व तीत ते हरले. राष्ट्रीय पातळीवर प्रतिसहकार पक्षाने लजपतराय, मालवीय यांच्या पक्षाशी युती केली. स्वराज्यपक्षाची मात्र वाताहत झाली. त्या वेळचा संयुक्त प्रांत (म्हणजे आताचा उत्तर प्रदेश) यातून स्वराज्यपक्षाचा फक्त एक उमेदवार निवडून आला. तो म्हणजे खुद्द मोतीलाल. ते बिनविरोध निवडून आले. मोतीलालांचा दांडगेपणा पाहता त्यांनी बिनविरोध निवडून येण्यासाठी काय युक्त्या लढविल्या असतील याची कल्पना आपण करू शकतो.

१९२६ च्या निवडणुकीत नाफेरवाद्यांनी प्रतिसहकार पक्षाच्या उमेदवारांना पाडण्याचे प्रयत्न केले.[२०] पुणे शहरातून मुंबई विधिमंडळासाठी प्रतिसहकार पक्षाने चंद्रत्रेय नावाचे उमेदवार उभे केले होते. त्यांच्या विरुद्ध, नाफेरवाद्यांनी, लल्लूभाई शहा यांना पाठिंबा दिला. अखेर चंद्रात्रेयच निवडून आले. थोडक्यात, प्रतिसहकारपक्ष निघाल्यानंतर स्वराज्य-पक्षवाले गांधींच्या नाफेर-वाद्यांच्या आणखी जवळ गेले व मोतीलाल नेहरुंनी अधिक लढाऊ पवित्रे घ्यावयास सुरूवात केली. १९२७ साली स्वराज्यपक्षाच्या दृष्टीने परिस्थिती आणखीच बिकट झाली. मोतीलालांचे पट्ट-अनुयायी व एका अर्थाने आश्रित अशा सी.एस्. रंगा अय्यर यांनी (हे स्वतः केंद्रीय विधिमंडळाचे सभासद होते) स्वराज्यपक्षाचे उपनेते व २६ सालच्या गुवाहाटी येथील काँग्रेस अधिवेशनाचे अध्यक्ष श्रीनिवास अय्यंगार यांच्या पाठिंब्याने मोतीलाल यांच्या विरूद्ध बंड पुकारले.[२१] सारांश २७ सालच्या अखेरीला स्वराज्यपक्ष कसाबसा तग धरून होता.

या प्रतिकूल काळात, अर्जुनाच्या अडचणीच्या प्रसंगी त्याचा सखा कृष्ण वारंवार धावून जाई त्याप्रमाणे; गांधींनी मोतीलाल यांची पाठराखण केली. एप्रिल १९२६ मध्ये गांधींना मध्यस्थीला घालून मोतीलाल यांनी, गांधींकरवी, केळकर, जयकर, अणे या 'प्रतिसहकार पक्षाच्या पुढाऱ्यांना अहमदाबादेस बोलावून घेतले."[२२] त्या वेळी प्रतिसहकारवादी व स्वराज्यपक्ष यांच्यात एक करारही झाला. त्यावर 'साक्षीदार' या नात्याने काँग्रेस अध्यक्ष सरोजिनी नायडू यांची सही झाली. नंतर मोतीलाल यांची बुद्धी फिरली व स्वराज्य पक्षात फूट पडेल यासाठी हा करार आपण मान्य करीत नाही, असे त्यांनी जाहीर केले. १९२७ साली मोतीलाल व लजपतराय यांच्यात वाद झाला. लजपतराय यांच्या 'वंदे मातरम्' या वृत्तपत्राकडून माफीची मागणी मोतीलालांनी केली. नाहीतर एक लाखाच्या नुकसारभरपाईचा खटला भरण्याची धमकी दिली. खटला भरला देखील! पण गांधींनी मध्यस्थी करून मोतीलालांकडून खटला मागे घेवविला. १९२६ च्या डिसेंबरात गुवाहाटीला काँग्रसचे अधिवेशन भरले. त्या अधिवेशनाला गांधी जाणार

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थाद्वारे संगणकीकृत
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

नव्हते; १९२६ साली साबरमतीमधून बाहेर जायचे नाही, असा त्यांचा निश्चय होता. पण मोतीलालांच्या भिडेखातर हे गुवाहाटीला गेले.[२३] या अधिवेशनाचे अध्यक्ष श्रीनिवास अय्यंगार होते. ते स्वराज्यपक्षाचे उपनेते होते. पण मोतीलाल व अय्यंगार यांचे जमत नसे. म्हणून मोतीलालांनी गांधींच्या नाफेर पक्षाची कुमक गांधींना साकडे घालून मिळविली.

हे सांगण्याचा उद्देश असा की, प्रतिसहकारपक्ष हा मराठी प्रदेशापुरताच मर्यादित असला तरी त्या विचाराचे लोक देशभर होते. लजपतराय, मालवीय, उत्तरप्रदेशातील मिश्र व मोतीलालांचे पुतणे श्यामलाल नेहरु हे सर्व जण स्वराज्यपक्ष सोडून गेले व त्यांनी प्रतिसहकार पक्षाच्या तत्त्वांचा पुरस्कार केला. अशा रीतीने १९२९ सालाच्या अखेरपर्यंत केळकरांना गांधींवर टीका करण्याचा प्रसंग आला नाही. १९२९ साली जवाहरलाल नेहरुंनी संपूर्ण स्वातंत्र्याची घोषणा केली. संपूर्ण स्वातंत्र्याच्या ठरावाला केळकरांनी विरोध केला. त्यासंबंधी त्यांचा खुलासा असा होता की, 'अंतिम ध्येय' व 'आजच्या आज मागण्याची स्वराज्य घटना' या दोन गोष्टीत फरक आहे. प्रत्येक राष्ट्रीय वृत्तीच्या मनुष्याचे अंतिम ध्येय हिंदुस्थानचे स्वातंत्र्य, संपूर्ण स्वातंत्र्य हेच आहे व असणारच. मग पं.(मोतीलाल) नेहरु यांचेही ते ध्येय का नसेल? पण स्वराज्य-घटनेचा प्रश्न आला असता नेहरु कमिटीने केली अशीच काहीतरी घटना मान्य करणे प्राप्त आहे, हे उघड आहे. स्वातंत्र्यवादी पक्षही 'आजच्या आज' स्वातंत्र्य मागत नाही. तसे तो मागता तर त्याने स्वातंत्र्यांच्या मागणीला 'ध्येय' हा शब्द लावलाच नसता.[२४] हा अग्रलेख जानेवारी १९२९ मधील आहे. पण डिसेंबर १९२९ मध्ये जवाहरलाल नेहरुंनी स्वातंत्र्याची घोषणा केली, तिला विरोध करतानाही केळकरांची हीच भूमिका होती. पण प्रा. मोऱ्यांनी मात्र 'केळकरांनी हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याला विरोध केला,' असा तीव्र उपहास केला आहे.

इथे प्रा. मोरे यांनी, त्यांचे या काळाच्या इतिहासाचे इत्यंभूत ज्ञान लक्षात घेता, गांधींनी १९२७ साली, काँग्रेसने स्वातंत्र्याचा ठराव केला तेव्हा त्याचा जो उपहास केला त्याची आठवण ठेवली असती, तर बरे झाले असते. "१९२७ साली काँग्रेसने स्वातंत्र्याची मागणी करणारा ठराव मंजूर केला तेव्हा गांधींना संताप आला व त्यांनी यावर कडवट टीका केली. त्यांच्या दृष्टीने ही मागणी फूट पाडणारी व अवास्तव होती व अशा मागणीतून काँग्रेसचा दुबळेपणाच व्यक्त होत होता. 'आपण शाळकरी मुलांच्या वादविवाद सभेच्या पातळीवर उतरलो आहोत' असे ते म्हणाले."[२५] हेही लक्षात ठेवणे गरजेचे आहे की, १९३० साली सत्याग्रहाला निघताना गांधींनी ज्या ११ मागण्या केल्या होत्या त्यात स्वातंत्र्याची मागणी समाविष्ट नव्हती.

— ३ —

प्रा. मोरे यांनी केळकरांच्या राजकीय नेतृत्वाच्या अनेक मर्यादा अतिशय कडवट भाषेत मांडल्या आहेत. मुंबईचे धारप वकील हे केळकरांना म्हणाले होते की, "गांधींच्या चळवळीला ब्रिटिश सरकार विरुद्धच लढ्याचे स्वरूप येत असल्यामुळे आपल्या पैकी पुष्कळ कार्यकर्ते त्यात सामील होतात; नव्हे, त्यांना त्यात सामील व्हावेच लागते. परंतु चळवळीचे नियंत्रण आपल्या हाती असत नाही..... तेव्हा तुम्हाला पटणारी अशी एखादी चळवळ योग्य प्रसंगी तुम्ही पुढाकार घेऊन केलीत, तर आपल्या पक्षातील लोक त्यात मोठ्या अभिमानाने व हिरीरीने भाग घेतील." त्यावर केळकरांनी उत्तर दिले,'..... माझा स्वभाव फार हिशोबी आहे. असल्या चळवळी यशस्वी करण्यासाठी लोकांना वाटेल तो त्याग करावयास सांगण्याला अंगी जो एक प्रकाराचा बेदरकारपणा असावा लागतो तो माझ्यात नाही."

यावर प्रा. मोऱ्यांचे भाष्य असे आहे. ' त्यांच्या स्वभावामुळे त्यांनी तर अशी उठावणी केली नाहीच; परंतु त्यांच्या सहकारी व अनुयायांपैकीही कोणी अशी उठावणी करणारा निघाला नाही. त्याचा परिणाम म्हणून शेवटी त्यांचा पक्ष बुडावयाचा तो बुडालाच. अंगी नेतृत्व

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थाद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

गुण नसताना नेतृत्व करण्याचा अट्टाहास आणि धाडस केल्यावर या पेक्षा वेगळे दुसरे काय होणार?......या पक्षाने महाराष्ट्रातील एका स्वाभाविक प्रक्रियेला खो दिला व राजकारणाच्या गाड्याला खीळ घालून त्याची गती अवरोधिली, असेच म्हणणे भाग पडते. त्याचा एक परिणाम म्हणून देशाच्या राजकारणात अग्रेसर असलेला महाराष्ट्र मागे पडला.[२६] (७९३-९४)

राजकारण ह्या क्षेत्रात अतोनात स्पर्धा असते. तेल चोपडलेल्या गुळगुळीत मलखांबावर चढावयाचे व मलखांबाच्या टोकावर जागा मिळवायची, तीही स्पर्धक आपले पाय ओढत असताना, हे जितके कठीण तितकेच राजकारणात अग्रस्थान मिळवणे व तिथे टिकून राहणे हे दुरापास्त असते. बरे, केळकरांना स्पर्धक कमी होते, असे नाही. त्यांच्या पिढीतील शि. म. परांजपे, खाडिलकर, गंगाधरराव देशपांडे, वासुकाका जोशी आणि कदाचित् अच्युतराव कोल्हटकर इतके जबरदस्त स्पर्धक त्यांना होते. पुढच्या पिढीतील शंकरराव देव, न. वि. तथा काका गाडगीळ हे देखील दंड थोपटून होते. खेरीज, या लोकांना उत्तेजन द्यायला मोतीलाल नेहरु, विठ्ठलभाई पटेल यांनी हात आखडता घेतला असता, असे नाही. प्रा. मोरे सांगतात त्या प्रमाणे केळकर हे निष्कर्तृक, धडाडीशून्य आणि सुखासीन नेते असतील तर १९२० सालापासून १९३० सालापर्यंत त्यांचे नेतृत्व टिकले कसे? स्वराज्य पक्षाच्या केंद्रीय विधिमंडळपक्षाचे ते उपनेते होते, महाराष्ट्र प्रांतिक समितीच्या कार्यकारिणीवर होते, महाराष्ट्र कॉंग्रेसमधून अ.भा. कॉंग्रेस समितीवर (ए.आय्.सी.सी.) ते सतत निवडून जात होते. (इथे हे नोंद करून ठेवायला हवे की, काका गाडगीळ या निवडणुकीत एकदा पडले होते.) महाराष्ट्र कॉंग्रेस समितीवर त्यांच्या हवाली असणारी ग.वि.केतकरांसारखी माणसे अध्यक्ष म्हणून निवडून येत होती. (अगदी ३० साली देखील ग.वि.केतकरच महाराष्ट्र कॉंग्रेसचे अध्यक्ष होते.) केळकरांचा लोकशाही स्वराज्य पक्ष बुडाला याविषयी धन्यता मानताना प्रा. मोरे या वस्तुस्थितीकडे दुर्लक्ष करीत आहेत, असे वाटते.

मोठी चळवळ उभी करणे, मोठ्या जनसंमर्दाला चेतवून देणारे वक्तृत्व गाजविणे, सामान्य मनुष्याला आंदोलनात ओढणे व त्या सामूहिक दडपणाखाली सरकारला कोंडीत पकडणे ह्या स्वातंत्र्य चळवळीत टप्प्या-टप्प्याने घडणाऱ्या गोष्टी होत्या. बंगालच्या फाळणीनंतर स्वदेशीची पहिली मोठी चळवळ झाली आणि टिळकांच्या पौरुषशाली नेतृत्वाच्या तेजापुढे फेरोजशहा मेहता व गोखले यांचे सभासंमेलनीय युक्तिवादपूर्ण वक्तृत्व आणि अभिजनांच्या घोळक्यांना संमोहित करणारे नेतृत्व झाकोळून गेले. या मोठ्या चळवळीला समांतर अशी क्रांतिकारकांची उठावणीही ४-५ वर्षे चालली. पण टिळक तुरुंगात गेले. महाराष्ट्रावर दडपशाहीचा वरवंटा फिरला. या काळोखीने भरलेल्या काळात महाराष्ट्रातील व देशातीलही राजकारण मेहता-गोखले यांनीच दीपज्योतीप्रमाणे तेवत ठेवले. मोर्ले-मिंटो सुधारणा मिळविल्या. बंगालची फाळणी संपवली. जवळ जवळ तीच गोष्ट असहकाराची चळवळ संपल्यावर झाली. राजकारणाला मंदी असल्यासारखे झाले. अशा वेळी पुनः सभा-संमेलनीय व ठरावांचे राजकारण स्वराज्यपक्षाने पुढे आणले. केळकरांच्या कर्तृत्वाला, वक्तृत्वाला आणि नेतृत्वाला ज्या मर्यादा होत्या त्यांच्या परिघात नेटकेपणाने करण्याजोगे हे राजकारण होते. या लेखाच्या सुरूवातीला मी जे अवतरण दिले आहे, त्याचा रोख हाच आहे. गांधींनी पुनः संमर्द-चळवळीचे राजकारण मिठाच्या सत्याग्रहाच्या रूपाने सुरू केले, तेव्हा हे सभासंमेलनीय राजकारण साहजिकच मागे पडले. केळकर व त्यांच्या पक्षाने या कायदेभंगाच्या चळवळीतही भाग घेतला हे विसरता कामा नये.

गांधींच्या विधायक कामाचे प्रा. मोरे यांना कौतुक आहे आणि ते योग्यच आहे. पण केळकरांनी देखील 'केसरी'च्या संपादकत्वाचा उपयोग अनेक कार्यकर्ते, लेखक व निरनिराळ्या पातळ्यांवरचे पुढारी तयार करण्यासाठी केला. यातील कित्येक जण पुढे गांधींच्या चळवळीलाही उपयोगी पडले. ग.त्र्यं.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थाद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

माडखोलकरांना केळकरांनी घडवले याचा उल्लेख प्रा. मोऱ्यांनी केलाच आहे. श्री. नी. नवरे, दा. न. शिखरे, दा. वि. गोखले, ग. वि. केतकर हे स्तंभ लेखक केळकरांच्या हाताखाली तयार झाले. केळकरांनी लिहिलेले अग्रलेख नवरे तोंडपाठ म्हणून दाखवीत, हे त्यांच्याकडून मी स्वतः ऐकिले आहे. 'दिवाकरां'च्या नाट्यछटा प्रथम 'केसरी'तून १९१३ साली प्रसिद्ध झाल्या. हे कसे घडून आले त्याची उद्‌बोधक हकीकत दिवाकरांच्या रोजनिशित वाचायला मिळते."[७]

मराठीच्या साहित्य-क्षेत्रात, त्यांनी स्वतः केलेले लिखाण बाजूला ठेवले तरी, अनेक नवीन लेखकांना व त्यांच्या नाविन्यपूर्ण लिखाणाला त्यांनी उत्तेजन दिले. 'नाट्यछटां'ची हकीकत वर दिलीच आहे. साहित्यशास्त्रात त्यांनी 'सविकल्प समाधी'चा विचार १९२१ साली मांडला व त्याच्या भोवती १९५० पूर्वीचा साहित्यशास्त्रीय विचार फिरत राहिला. पुरोगामी साहित्य, विभावरी-वाङ्‌मय, रविकिरणांचे काव्य असे विविध साहित्य-प्रवाह २० सालानंतर पुढे आले व त्या साऱ्या प्रवाहांचे त्यांनी विधायक भूमिकेतून स्वागतच केले. अक्षरशः शेकडो पुस्तकांना त्यांनी प्रस्तावना लिहिली - अगर त्यांच्यावर अभिप्राय लिहिले. नवकथेचा उगम व उत्कर्ष ज्या गंगाधर गाडगिळांच्या हातून झाला त्यांचा पहिला लघुकथा संग्रह 'मानसचित्रे' याला देखील केळकरांची प्रस्तावना आहे. हा साहित्य-उद्योगही केळकरांचे नेतृत्व टिकून राहण्याला उपकारक ठरला. प्रा. मोरे यांनी यातील काही गोष्टींचा उल्लेख केला आहे. (७८६-८७). पण त्याला त्यांनी 'महाराष्ट्राचे ऱ्हासपर्व' असे नाव दिले आहे.

विविध संस्था स्थापन करणे, स्वतः किंवा दुसऱ्यांनी स्थापन केलेल्या संस्थांचे संगोपन करणे, त्या संस्थातील नवीन उपक्रमांना प्रोत्साहन देणे, अडचणीच्या काळात संस्थांना योग्य ते मार्गदर्शन करणे हा देखील राजकारणाला सहाय्यभूत ठरणारा भाग आहे. पुण्यातील व पुण्याबाहेरील अनेक संस्थांचा इतिहास केळकरांच्या याबाबतीतील कर्तृत्वाचा साक्षीदार आहे. कॉसमॉस सहकारी बँक केळकरांनी काढली व ते तिचे पहिले अध्यक्ष होते. पुणे मराठी ग्रंथसंग्रहालयाचेही ते पहिले अध्यक्ष होते. साहित्यपरिषदेशी त्यांचा निकटचा संबंध होता. भारत इतिहास संशोधक मंडळ व मराठी नाट्यपरिषद यांच्या कार्यकारी मंडळांवर ते वर्षानुवर्षे होते. डेक्कन एज्युकेशन सोसायटी व शिक्षण प्रसारक मंडळी यांचे ते अनेक वर्षे कोणते ना कोणते पदाधिकारी होते. ना.ग.नारळकर यांनी नूतन मराठी विद्यालयात ज्या अभूतपूर्व व - त्या काळाच्या मोजमापाने-खर्चिक सुधारणा केल्या त्या केळकरांच्या पाठिंब्यावर केल्या. १९३२ साली केळकरांनी सार्वजनिक जीवनातून निवृत्त व्हावयाचे ठरविले तेव्हा आपण ज्या संस्थांशी संबंधित आहोत त्यांची यादी करून त्या पदांचा एक घाऊक राजीनामाच त्यांनी देऊन टाकला.

केळकर, जयकर, पोतदार यांच्या नेतृत्वाने झालेली महत्त्वाची चळवळ म्हणजे महाराष्ट्र विद्यापीठाची चळवळ. जुन्या मुंबई प्रांतातील मराठी प्रदेशासाठी मराठीतून शिक्षण देणारे स्वतंत्र महाराष्ट्र विद्यापीठ असावे, त्याचे अभ्यासक्रम कसे असावेत, त्या विद्यापीठाचे स्वरूप एकात्मिक (युनिटरी) असावे की महाविद्यालयांना संलग्न करून घेणारे असावे अशा विविध प्रश्नांची सखोल चर्चा त्या काळात झाली. अखेर पुणे विद्यापीठ १९४८ साली निघाले त्या वेळी केळकर हयात नव्हते. तेव्हा या चळवळीशी प्रथमपासून जोडले गेलेले जयकर यांना विद्यापीठाचे प्रथम कुलगुरु म्हणून निवडण्यात आले. प्रा. मोरे यांनी या महत्त्वाच्या चळवळीची अजिबात दखल घेतलेली नाही.

प्रा. मोरे यांनी केळकर यांच्या पुढारीपणा-विषयी जे लिखाण केले आहे ते केवळ दोषैक दृष्टीने केले आहे. केळकर यांचे पुढे विरोधक झालेले काका गाडगीळ, दा.न.शिखरे, सप्रे इत्यादींच्या लिखाणातून केळकरांवर टीका करणारा मजकूर निवडून काढून व एकत्र करून त्यांनी मांडला आहे. या पद्धतीने कोणत्याही नेत्याचे अनेक दोषांनी भरलेले असे चित्र रंगविता येईल. वसंत पळशीकर यांनी अनेक वर्षांपूर्वी टिळकांच्या

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

चरित्रासंबंधात असा उद्योग, आपण दोषैक दृष्टीनें चरित्र लिहीत आहोत असे स्पष्ट सांगून, केला होता. ही लेखमाला 'समाजप्रबोधन' पत्रिकेत प्रसिद्ध झाली होती. गांधींविषयी असे प्रयत्न हिंदुत्वनिष्ठ लेखकांनी केले आहेत.

केळकर हे टिळक किंवा गांधी यांच्या तोडीचे नेते नव्हते हे कोणीही मान्य करील. पण तेवढ्यावरून असे म्हणण्याचे कारण नाही की, केळकरांच्या ठिकाणी नेतृत्वाचे गुणच नव्हते. तसे ते नसते तर प्रा. मोऱ्यांनीच म्हटल्याप्रमाणे 'केळकरांचा सर्व क्षेत्रीय प्रभाव' घडून आलाच नसता. (७८६) असा 'प्रभाव' (हेगीमनी) पसरला की त्याला धक्के देणारी मंडळी पुढे येतातच. शेजवळकर, न.र.फाटक, आहिताग्नी राजवाडे, शं.द.जावडेकर हे अशांपैकी लोक होत. गांधींचा मोठेपणा हे मोठेच आश्रयस्थान त्यांना केळकरांवर शरसंधान करावयास मिळाले. पण विषय फार मोठा आहे. त्याचा स्वतंत्र विचार करावा लागेल.

❀❀❀

तळटीपा

१) Bipan Chandra and others : India's struggle for Independene. P - 237
२) Judith Brown : The Origins of Asian Democracy. P - 197
३) य. दि. फडके : विसाव्या शतकातील महाराष्ट्र. खंड ३. पान १०२-०३.
४) D.R.Nanda : The Nehrus. P - 234.
५) उपरोल्लेखित. पान २३५
६) नंदा. उपरोक्त. पान २३८-३९
७) केळकर. गतगोष्टी पान ६११. मीरत कटाच्या खटल्यातील आरोपींना मदत करताना नेहरु पितापुत्रांनी हात कसा आखडता घेतला, तेही इथे सांगितले आहे.
८) नंदा. उपरोक्त. पान २६४
९) नाना अभ्यंकर : वसिष्ठेचे पाणी .... पान २८२
१०) य. दि. फडके उपरोक्त. १०३
११) ना. सी. फडके 'माझे जीवन, एक कादंबरी.' पान ७६
१२) नाना अभ्यंकर. उपरोक्त. पान २१७
१३) नाना अभ्यंकर. उपरोक्त. पान २३८
१४) नाना अभ्यंकर. उपरोक्त. पान २४७
१५) केळकर, उपरोल्लेखित. ५९६
१६) नंदा, उपरोल्लेखित, पान २६५
१७) केळकर, उपरोक्त, पान ५४२
१८) नाना अभ्यंकर. उपरोक्त. पान २९५
१९) नंदा. उपरोक्त. पान २६४
२०) शंकरराव देव. "दैव देते पण कर्म नेते" पान १३६
२१) नंदा. उपरोक्त. पान २७०
२२) केळकर. गतगोष्टी पान ५५४
२३) नंदा उपरोक्त. पान ३०४
२४) केळकर : असहकारिता खंड पान ७४८
२५) ज्युडिन ब्राऊन : गांधी – प्रिझनर ऑफ होप. १८५
२६) कंसातील आकडे 'लोकमान्य ते महात्मा' या पुस्तकातील पानांचे.
२७) सरोजिनी वैद्य (सं.) समग्र दिवाकर पान ३६५-६६.

❀❀❀

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

श्री ज्ञानदेवांचे तत्त्वज्ञान

रत्नाकर बापूराव मंचरकर

०१. भूमिका

स्रोत, स्वरूप आणि परिणाम अशा तीन अंगांनी ज्ञानदेवांच्या तत्त्वज्ञानाचा विचार करता येईल.

ज्ञानदेवांनी एक तात्त्विक व्यूह उभा केला आहे. त्यासाठी पूर्वपरंपरेतील कोणती तत्त्वे त्यांनी स्वीकारली? ती कोठून वेचली? त्यांच्या तत्त्वविचाराची जडणघडण कशी झाली? यासारख्या प्रश्नांचा विचार करणे म्हणजे स्रोताचा विचार करणे होय.

व्यासंग, गुरुबोध, स्वानुभव आणि स्वयंप्रज्ञा यांच्या साहाय्याने ज्ञानदेवांनी संश्लेषित केलेल्या तत्त्वव्यूहाचे नेमके स्वरूप काय? त्याची वैशिष्ट्ये कोणती? त्यात कितपत नाविन्य आणि मौलिकता आहे? अशा प्रश्नांचा विचार करणे म्हणजे स्वरूपाचा विचार करणे होय.

ज्ञानदेवांची तत्त्वदृष्टी आणि त्यांचे वाङ्मय यांच्यातील परस्परसंबंध काय होते? या तत्त्वज्ञानाचा सामाजिक जीवनावर कोणता परिणाम झाला? या प्रश्नांचा शोध घेणे म्हणजे तत्त्वज्ञानाच्या परिणामांचा विचार करणे होय.

यापैकी ज्ञानदेवांच्या तत्त्वविचाराचा स्रोत कोणता, या मुद्द्यावर सगळ्यात अधिक चर्चा झाली; पण ही चर्चा वादातीत अशा निष्कर्षापर्यंत पोहोचली नाही.

ज्ञानदेवांच्या तत्त्वज्ञानाचे स्वरूप कमी-अधिक प्रमाणात स्पष्ट झाले पण त्यालाही निश्चिती अशी आली नाही.

ज्ञानदेवांच्या तत्त्वज्ञानाच्या परिणामाची चर्चा अगदी विरळ आहे. महाराष्ट्रातील सामाजिक-सांस्कृतिक स्थित्यंतरे आणि त्यांचा ज्ञानदेवांच्या तत्त्वदृष्टीशी असलेला अनुबंध शोधण्याचे प्रयत्न जवळजवळ दिसत नाही.

याविषयीच्या वादचर्चेला, एकूण अभ्यास-परंपरेचा पट उभा करणे एवढाच या टिपणाचा उद्देश आहे.

०२. मायावादी की चिद्विलासवादी?

विद्वानांमध्ये श्रीज्ञानदेवांच्या तत्त्वज्ञानाविषयी एकवाक्यता नाही.

श्री शंकराचार्यांचा 'ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या' हा सिद्धांत स्वीकारून ज्ञानदेवांनी अद्वैतसिद्धी[०१] केली, असे प्रतिपादन भिंगारकरबुवा, रा. द. रानडे, ल. रा. पांगारकर, शं. वा. दांडेकर, शं. दा. पेंडसे, शं. गो. तुळपुळे यांनी कमी-जास्त प्रमाणात केलेले आहे.

ज्ञानदेवांचे तत्त्वज्ञान हा अनेक धारांचा महासमन्वय आहे; असे शं. रा. तळघट्टी म्हणत असले तरी ते ज्ञानदेवांच्या तत्त्वज्ञानाचा विचार मुख्यतः शांकरमताच्या संदर्भात आणि त्यांच्यातील साम्यावर भर देऊन करतात. त्याला शं. वा. दांडेकर आणि शं. दा. पेंडसे यांच्या विवेचनाचा आधार आहे. तळघट्टींनी अनाग्रही व अभिनिवेशरहित वृत्तीने तपशीलवार, सविस्तर आणि सूक्ष्म अभ्यास मांडला आहे. या मायावादी पक्षाचे आजच्या पिढीतील ते बहुधा एकमेव प्रवक्ते दिसतात. हा पक्ष नाकारावयाचा की स्वीकारावयाचा हे त्यांच्या विवेचनाकडे पाहून ठरवावे अशा जबाबदारीने व योग्यतेने त्यांनी आपली भूमिका मांडली आहे.

श्रीज्ञानदेवांचे तत्त्वज्ञान शांकरमताहून भिन्न व क्वचित विरोधीही आहे; ०२ असे प्रतिपादन भारद्वाज तथा शिवरामबुवा भारदे, बाळशास्त्री हुपरीकर, पांडुरंग शर्मा, ज्ञानोपासक तथा ग. वि. ढवळे, न. र. फाटक, बा. मा. खुपरेकरशास्त्री, भा. पं. बहिरट, गं. ब्रा. सरदार, नि. ना. रेळेकर, स. रा. गाडगीळ, म. वा. धोंड, गो. वि. करंदीकर यांनी केलेले आहे. याला चिद्विलासवादी पक्ष म्हणता येईल.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

मायावादी व चिद्विलासवादी अशा या दोन पक्षातील वादाचे ठळक मुद्दे असे -

०२/१ श्रीज्ञानेश्वरी आणि अमृतानुभव यांचे प्रामाण्य

ज्ञानदेवी आणि अमृतानुभव या ज्ञानदेवांच्या दोन्ही ग्रंथातील तत्त्वज्ञानात भिन्नता आहे काय; असा प्रश्न प्रथम भिंगारकरबुवा यांच्या लेखनातून निष्पन्न झाला.

चिद्विलासवाद्यांच्या मते 'ज्ञानदेवी' ही गीताटीका आहे. त्यात ज्ञानदेवांना आचार्यांना अनुसरून लिहावे लागले आहे. पण त्यांचे खरे मनोगत 'अमृतानुभव' या सिद्धानुवाद करणाऱ्या स्वतंत्र ग्रंथात प्रकटले आहे.

मायावाद्यांच्या मते ज्ञानदेवीपेक्षा अमृतानुभवात काही वेगळे सांगितले आहे आणि ज्ञानदेवांचे खरे मत ज्ञानदेवीत दिसत नसून अमृतानुभवात दिसते; या दोन्ही गोष्टी खऱ्या नाहीत.

या संदर्भात गौणप्रधानभाव न ठेवता ज्ञानदेवी, अमृतानुभव, चांगदेवपासष्टी, आणि अभंग अशा ज्ञानदेवांच्या सर्वच वाङ्मयाचा साकल्याने विचार करावा, असे सांगणारे लोकही दोन्ही पक्षात आहेत. प्रेरणा, स्वरूप, प्रतिपादनशैली, अपेक्षित श्रोतृवर्ग इत्यादी दृष्टींनी या प्रत्येक ग्रंथाचे वेगळेपण लक्षात घेऊनही प्रामाण्याच्या दृष्टीने त्यांना सारखे मानता येण्यासारखे आहे, असे मलाही वाटते.

तथापि एवढ्यावरच न थांबता श्रीएकनाथ व श्रीतुकाराम यांच्या तत्त्वदृष्टीवरील ज्ञानदेवांचा प्रभाव लक्षात घेऊनही विचार करणे शक्य आहे. ज्ञानदेवांच्या तत्त्वविचाराचे स्पष्टीकरण आणि पडताळा यातून मिळू शकतो. वारकरी संप्रदायाचे वाङ्मय हे अर्थनिर्णयनाचे वर्तुळ आहे. याचा संदर्भ ज्ञानदेवांच्या तत्त्वविचारात जागता हवा.

०२।२ भेद मांडणीचा की तत्त्वज्ञानाचा ?

श्रीशंकराचार्य व श्रीज्ञानदेव यांच्या तत्त्वज्ञानात भेद नसून त्यांच्या मांडणीत भेद आहे; असे मायावाद्यांचे म्हणणे आहे. शं. वा. दांडेकर यांच्या मते हा भेद दोघांमधील काळाच्या अंतरामुळे पडलेला आहे. एकच गोष्ट अधिकारपरत्वे वेगळ्या रीतीने पटविणे शक्य आणि आवश्यकही आहे; असा ज्ञानदेवांचा विचार असावा; असे त्यांना वाटते.

अमृतानुभव हा सिद्धानुवाद असल्यामुळे त्यात अन्वयात्मक विवेचनावर भर आहे आणि ज्ञानेश्वरी हा ग्रंथ बहुसंख्य समाजाकरिता आबालसुबोध व्हावा म्हणून व्यक्तिरेखात्मक विवेचनावर भर देऊन लिहिला आहे; असे शं. दा. पेंडसे म्हणतात.

हाच मांडणीच्या भेदाचा मुद्दा तळघट्टींनी असाच मांडला आहे आणि त्यावर भर देऊन विवेचन केले आहे.

श्रीशंकराचार्य आणि श्रीज्ञानदेव हे दोघेही पूर्णाद्वैती आहेत; असे दांडेकरांचे प्रतिपादन आहे.

अजातवादाकडे वळून केलेल्या अद्वैताच्या अन्वयी मांडणीला अनुलक्षून त्यांनी पूर्णाद्वैती हा शब्द वापरला आहे.

तळघट्टी व्यतिरेकी व अन्वयी अशा दोन्ही अंगांनी ज्ञानदेवांनी केलेल्या अद्वैताच्या परिपूर्ण मांडणीला अनुलक्षून पूर्णाद्वैत हा शब्द व्यापक अर्थाने वापरतात.

मायावाद हा अद्वैती प्रतिपादनाचा व्यतिरेकी भाग आहे. चिद्विलासवाद हा अद्वैती प्रतिपादनाचा अन्वयी भाग आहे. या दोन्ही दृष्टींनी प्रतिपादन करण्याची पद्धती वेदोपनिषदांपासून चालत आली आहे. शंकराचार्य व ज्ञानदेव या दोघांनीही या दोन्हीही पद्धती वापरल्या आहेत. पण या मुद्द्याकडे दुर्लक्ष झाले आहे. शंकराचार्य व्यतिरेकी मांडणीकडे अधिक झुकतात तर ज्ञानदेव अन्वयाकडे अधिक झुकतात, एवढाच त्यांच्यात भेद आहे; असे मायावाद्यांना वाटते.

यावर चिद्विलासवादी काही ओव्या पुढे करू शकतात.

जालेनि जगें मी झांकें। तरि जगत्वें कोण फांकें।

कीलेवरि माणिकें। लोपिजे काइ।।

- ज्ञानेश्वरी १४।१२२

प्रकट झालेल्या जगामुळे मी झाकला जात

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थाद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

असेल तर जगाच्या रूपाने कोण प्रकाशत आहे? माणकाच्या अंगभूत तेजाने माणिकच लोपले जाते का? असे प्रश्न ज्ञानदेवांनी उपस्थित केले आहेत.

म्हणौनि जर परौतें। सारूनि पाहिजे मातें।
तैसा न्हवे उखितें। आघवें चि मीं।।
- ज्ञानेश्वरी १४।१२६

जगाला बाजूला सारावे आणि मग मला पाहावे असा मी नाही. जगासकट सर्व मीच आहे. असे या प्रश्नांचे उत्तर ते देतात. पुढेही ते म्हणतात -

नुकलितां पटु। तंतू चि आहे स्पष्टु।
नवा विरचता घटु। पृथ्वी न्हवें।।
हमाणौति विश्वपण जावें। मग मातें घेयावें।
तैसा नव्हे आघवें। सकटचि मीं।।
- श्रीज्ञानेश्वरी १४।३७६-३७७

वस्त्राचे धागे न उकलताही ते वस्त्र तंतूरूपच असते आणि मातीचे मडके विरविले नाही तरी ते मृत्तिकारूपच असते, हे स्पष्ट आहे. आणि म्हणून विश्वपण घालवून द्यावे आणि मग मला घ्यावे असे नसून विश्वासकट सर्व मीच आहे. जीव आणि जग ही परमात्म्याचीच व्यक्त दशेतील व्यष्टि-समष्टि रूपे आहेत असे ज्ञानदेव अशा कितीतरी ओव्यांमधून सुचवीत आहेत.

यासारख्या ओव्यांमध्ये नामरूपात्मक दृश्यविश्व हा परमात्म्याचाच प्रकाश आहे, एवढेच अन्वय पद्धतीने सांगितले आहे; असे म्हणणे योग्य होईल का? खरेतर या ओव्यात मायावादाची प्रक्रियाच नाकारलेली आहे.

हे नामरूपात्मक विश्व म्हणजे अविद्येच्या किंवा मायेच्या आवरणाने निर्माण केलेला आभास आहे. तेव्हा शुद्ध ब्रह्मरूपाचे ज्ञान करून घेण्यासाठी या आवरणाचा छेद झाला पाहिजे. जे नामरूपात्मक दृश्य विश्वप्रत्ययाला येत आहे त्याचा निरास झाल्याशिवाय ब्रह्माचे वास्तव ज्ञान अशक्य आहे. विश्व अध्यासाचे निराकरण करणे हेच शंकराचार्यांच्या मायावादी प्रक्रियेचे मर्म आहे.

ज्ञानदेवांनी वरील ओव्यांमध्ये अध्यासाचा निरास करण्याची पद्धती त्याज्य ठरवली आहे. मूळ ब्रह्मावर मायेचे आवरण येते हेच त्यांनी अमान्य केले आहे. जगत हा मायेच्या विक्षेपाने निर्माण झालेला आभास आहे. ही मायावादाची कल्पना त्यांनी त्याज्य ठरविली आहे. अध्यासच नाही तर निरास कशाचा? 'आघवें चि मी' असताना निराकरण कशाचे करणार? हे नामरूपात्मक जग बाजूला सारून शुद्ध, निखळ परमात्म्याचे दर्शन घेतले पाहिजे, ही मायावादाची भूमिकाच येथे नाकारलेली दिसते.

असे मूलभूत भेद असतील तर साम्यस्थळांना किती महत्त्व द्यायचे? ज्ञानदेवांनी किती ठिकाणी कोणाचे अनुसरण केले एवढी मोजदाद अशा वेळी पुरेशी ठरणार नाही. त्यांच्या एकूण तत्त्वज्ञानाचा रोखही लक्षात घ्यायला हवा. ज्ञानदेवांचे वाङ्मय वाचल्यावर त्याचा मनावर कोणता ठसा उमटतो? "सकल हें मूर्त। जाण पां मायाकारित" या शिकवणुकीचा की "जग आसिकी वस्तुप्रभा" या ज्ञानदेवांच्या अनुभवाचा? याचाही विचार करून आपण ज्ञानदेव मायावादी की चिद्विलासवादी, हे ठरविले पाहिजे.

त्यामुळे श्रीशंकराचार्य आणि ज्ञानदेव यांच्यामधील भेद शं. दा. पेंडसे यांच्यासारख्या मायावाद्यानेही टिपले आहेत. ज्ञानदेवांनी शंकराचार्यांचे अद्वैत घेतले पण संन्यासवाद घेतला नाही. (शं. दा. पेंडसे, 'ज्ञानदेव आणि नामदेव' पुणे, १९६९. पृ. ४३) शंकराचार्य ज्ञान्याला कर्माची आवश्यकता मानीत नाहीत तर ज्ञानदेव ज्ञान्यालाही कर्तव्य उरते आणि ते त्याने करावे असा आग्रह धरतात. (शं. दा. पेंडसे, तेथेच पृ. ७५)

चिद्वाद्यांनी तर आणखीही भेद नोंदविले आहेत. शंकराचार्यांमध्ये द्वैताची सावलीही नाही पण ज्ञानदेव भक्तिसुखासाठी द्वैत स्वीकारतात. (गं. बा. सरदार 'ज्ञानेश्वरांची जीवननिष्ठा' पुणे, १९७१) शंकराचार्य भक्तीला साधन मानतात तर ज्ञानेश्वर भक्तीला साध्य मानतात. (तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, प्रस्तावना, 'ज्ञानदेव चिंतन', वसंत स. जोशी. (संपा.), वाई १९७६ पृ. चार.) शंकराचार्य जग हे

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

मायाकार्य मानतात तर ज्ञानेश्वर जग हा चिद्विलास मानतात. (तर्कतीर्थ, तेथेच पृ. तेरा) शंकराचार्य गीतेला स्मृतीसारखे दुय्यम प्रमाण मानतात तर ज्ञानदेव गीतेचे श्रुतिप्रामाण्य मानतात. (तर्कतीर्थ, तेथेच पृ. तीन) हे भेद लक्षात घेऊन ज्ञानदेवांच्या तत्त्वज्ञानाचा निवाडा केला पाहिजे.

०२।३ वादाचे रणांगण -अज्ञानखंडन

अमृतानुभवातील अज्ञानखंडनाचे सातवे प्रकरण हा या दोन्ही पक्षातील जबरदस्त वादविवादाचा मुद्दा आहे.

रामानुजाचार्यांनी शंकराचार्यांच्या अविद्येची सप्तविध अनुपपत्ती दाखविली आहे. पांडुरंग शर्मा यांनी 'निवर्तक ज्ञान' असा आणखी एक मुद्दा काढून अनुपपत्तींची संख्या आठवर नेली आहे. त्यांच्या ज्ञानदेवांनी रामानुजानुसारी अविद्येवर आक्षेप घेतले आहेत.

भा. पं. बहिरट यांच्या मते हे आक्षेप दहा असून ते चिद्विलासाच्या अंगाने घेतले आहेत.

सुबंधांच्या मते आक्षेप बारा असून नामरूपकार्याच्या अंगाने घेतलेले आहेत.

देशपांडे यांना हे आक्षेप जडाच्या संदर्भात वैश्विक आलस्यावरील आणि जिवाच्या संदर्भात बौद्धिक आलस्यावरील आक्षेप वाटतात.

शं.दा. पेंडसे यांच्या मते आक्षेपांची संख्या कमी आहे आणि त्यांचे स्वरूपही वेगळे आहे. शंकराचार्य अविद्या सत्य मानीत नाहीत. त्यामुळे येथे ज्ञानदेव शंकराचार्यांचे खंडन करीत नाहीत. या अज्ञानखंडनामुळे जग खरे ठरत असेल तर ज्ञानदेवांनी केलेल्या ज्ञानखंडनामुळे परब्रह्महीही खोटे ठरते, इकडेही पेंडसे आपले लक्ष वेधतात. त्यांच्या मते अविद्येला खरी व भावरूप मानणाऱ्या रामानुज-महानुभावादी द्वैती संप्रदायाचे खंडनच ज्ञानदेवांना येथे अभिप्रेत आहे. ज्ञानदेवांचे आक्षेप शंकराचार्यांविरुद्ध नसून रामानुजांच्या सद्भावरूप अज्ञानाविरुद्ध घेतलेले आहेत, असे ना. पै. पंडितांचेही मत आहे.

अज्ञान ही संकल्पना सापेक्ष, भावात्मक आणि अभावात्मक अशा त्रिविध अर्थांनी ज्ञानदेवांनी वापरली आहे; हे लक्षात घेतले तर त्यांचे तत्त्वज्ञान शांकरविरोधी आहे असा भासच ठरतो, असे तळघट्टींचे विवेचन या परंपरेत बसणारे आहे.

या कोलाहलातून नेमका मार्ग काढण्यासाठी गो. वि. करंदीकर यांनी तपशीलापेक्षा त्यामागील भूमिकेवर भर दिला. त्यांच्या मते या अज्ञानखंडात ब्रह्म्याच्या संदर्भातील मायारूप, जीवाच्या संदर्भातील अविद्यारूप आणि जगाच्या संदर्भातील जगतारूप अशा अज्ञानाच्या तिन्ही अंगांचे खंडन झाले आहे.

अविद्या किंवा अज्ञान हा भारतीय तत्त्वज्ञानातील केंद्रीय प्रश्न होता. पूर्णद्वैताची किंवा आपली स्वतंत्र तत्त्वदृष्टी परंपरेत सुप्रतिष्ठित करण्यासाठी ज्ञानदेवांनी त्याचा सांगोपांग विचार केला. प्रसंगी काव्य उणावते आहे इकडे लक्ष न देता त्यांनी किचकट वाद आणि वैचारिक डापेच यांचाही वापर केला आहे.

ज्ञानदेवांच्या तत्त्वविचारातील विकासक्रमाचा एक टप्पा म्हणून गो. वि. करंदीकर ज्ञानदेवांच्या अज्ञानखंडनाकडे पाहतात. रामानुजाचार्यांची एकूण भूमिका त्यांना मान्य होण्यासारखी नसली तरी त्यांचे मायावादावरील आक्षेप ज्ञानदेवांना महत्त्वाचे वाटले. त्या प्रकाशात अद्वैतप्रतिपादनातील सद्सद्विलक्षण, अनिर्वचनीय, अनादी मायेची किंवा अविद्येची अडगळ दूर करता येईल का; या दिशेने त्यांनी विचार केला. साहजिकच पारमार्थिक, व्यावहारिक व प्रातिभासिक या सत्तात्रयाच्या सिद्धांताचाही त्यांनी पुनर्विचार केला; असे दिसते.

०३. शैवागत आणि श्रीज्ञानेश्वर

श्रीज्ञानदेवांच्या तत्त्वज्ञानावर शंकराचार्य किंवा रामानुजाचार्य यांच्यापेक्षा शैवागमाचा मोठा प्रभाव आहे;[०१] असाही मतप्रवाह जोरदारपणे मांडण्यात आलेला आहे.

नाथसिद्ध आणि वारकरी संत या दोन्ही परंपरा जोडणारा दुवा म्हणून ज्ञानदेवांकडे पाहता येते. या दोन्ही

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

परंपरांमध्ये त्यांना सारखीच मान्यता आहे.

पिंडे पिंडाचा ग्रासु। तो हा नाथसंकेतिचा डंसु।
परि दाउनु गेला उद्देशु। महाविष्णु।।
तेया ध्वनिताचे केणें सोडुनि। यथार्थाची घडी झाडुनि।
उपलविली मियां जाणौनि। ग्राहिक श्रोते।।

- ज्ञानेश्वरी ६।२९१-२९२.

पिंडाने पिंडाला ग्रासणे (म्हणजे कुंडलिनी शक्तीच्या जागृतीमुळे देहातच देहाचा ग्रास होणे) हे नाथसंप्रदायाचे रहस्य (होय.) पण महाविष्णु (श्रीकृष्ण) दिग्दर्शन (मात्र) करून गेला. श्रोते (हे नाथसंप्रदायाचे रहस्य) ग्रहण करण्याला उन्मुख (आहेत, हे) ओळखून मी ते भावार्थरूपी वेष्टनबंध सोडून, यथार्थरूपी (सणंगाची) घडी उलगडून (त्यांच्यापुढे) पसरली आहे; असे प्रसंगवशात ज्ञानदेव सांगत आहेत.

'निवृत्तिपुरता गुरुविवरण। गयतीची खूण आगमनरूपे' असा आगमनपरंपरेने मुद्रांकित झालेला सविस्तर गुरुबोध गयनीनाथांनी निवृत्तिनाथांना केला. याच अभिप्रायाने श्रीज्ञानदेवांनी 'निगमागमद्रुमफला' (ज्ञाने. १८।२) म्हणजे निगम व आगम या संयुक्त वृक्षाचे फळ असा श्रीगुरू निवृत्तिनाथांचा उल्लेख केला आहे. नाथ आणि वारकरी या दोन्ही संप्रदायांनी निगम आणि आगम या दोन्ही परंपरांतील सात्त्विक, सर्वजनकल्याणकारी आणि शाश्वत अशा तत्त्वांचा स्वीकार केला आहे.

श्रीकृष्ण हे ज्ञानदेवांचे कुलदैवत. काश्मिरी शैव परंपरा श्रीकृष्णास शैवसांप्रदायिक मानते. वसिष्ठ कुळातील व्याघ्रपादपुत्र उपमन्यूने श्रीकृष्णास शिवनामाचा उपदेश करून शैवदीक्षा दिली. त्यामुळे गीता हा त्यांच्या दृष्टीने शैवग्रंथ ठरतो. गीता हा ग्रंथही अशाप्रकारे शैव आणि वैष्णव अशा दोन्ही परंपरांना मान्य असलेला ग्रंथ आहे. ज्ञानदेवांची गुरुपरंपराही अशा उभय परंपरांनी संस्कारित झालेली आहे.

दक्षिण भारतीय शैवपरंपरा शिवोपासक व शिवपूजक आहे. उत्तर भारतीय शैवपरंपरा शिवोपदिष्ट आहे. शिव, जीव आणि जगत यांच्या स्वरूपाची व परस्परसंबंधांची मीमांसा म्हणजे शैवदर्शन होय. काश्मिरी शैवसिद्ध वसुगुप्त (इ.स.९ वे शतक) यांच्या शिवसूत्रांचा ज्ञानदेवांनी

आणि ज्ञान बंधु ऐसें। शिवसूत्राचेनि मिसें
म्हणितले असें। सदाशिवें।।

- अमृतानुभव ३।१६

असा उल्लेख केला आहे. ज्ञानदेवांच्या समाधिप्रकरणात श्रीनामदेवांनीही शैवशास्त्र, शैवागम यांचे उल्लेख केलेले आहेत. वसुगुप्ताचार्य यांची ही शिवसूत्रे हिमालयात 'शंकरपल' व 'शिवपल' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या शिळेवर कोरलेली उपलब्ध झाली. ही सत्त्याहत्तर शिवसूत्रे आहेत. शाक्तोपाय (१० सूत्रे) आणि आणवोपाय (४५ सूत्रे) हे ईश्वराचा अनुग्रह मिळविण्याचे मार्ग आहेत. पण ते कष्टसाध्य आहेत. शांभवोपाय (२२ सूत्रे) हा मार्ग मात्र सर्वजनसुलभ आहे. अनन्यनिष्ठेच्या बळावर ईश्वराच्या इच्छेने अनुग्रह लाभतो. महेशता प्राप्त होते. विश्व हे आत्मप्रकटीकरण आहे. आत्मवैभव आहे. आपण विश्वात्मक आहोत. आपणच परमात्मतत्त्व आहोत अशी प्रत्यभिज्ञा - म्हणजे आपलीच आपल्याला पुन्हा ओळख होणे - शांभवोपायात अभिप्रेत आहे. शैव-दर्शनातील स्पंद व प्रत्यभिज्ञा असे दोन महत्त्वाचे सिद्धांत अभिनवगुप्त (इ.स. ९५०-९६० च्या सुमारास), रामकण्ठ (इ.स. ९५०-१००० च्या सुमारास), आचार्य सोमानंद, कल्लट, उत्पल, क्षेमराज यांनी मांडले आहेत.

श्रीशंकराचार्यांच्या मायावादाचे निरसन करून चिद्विलासाचे अभिनव तत्त्वज्ञान ज्ञानदेवांनी स्वयंप्रज्ञेने सांगितले. त्यांची अद्वैतसिद्धी ही नाथपंथी, शैवसंप्रदायी म्हणजे शांभव अद्वयाशी जुळणारी आहे. ज्ञानदेवांनी आपल्याला गुरूपरंपरेने लाभलेले शांभवअद्वयानंदवैभव आपल्या ग्रंथातून प्रकट केले आहे असे चिद्विलासी पक्षाचे मत आहे. पंडित बाळाचार्य खुपेकरशास्त्री हे या मताचे समर्थक आहेत.

शैवदर्शन एकजिनसी दर्शन आहे असे नाही. ज्ञानदेवांच्या तत्त्वविचाराच्या घडणीत वसुगुप्ताचार्यांची शिवसूत्रे, अभिनवगुप्त ही काश्मिरी शैवाचार्यांची एक

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थाद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

धारा आहे. तिच्याशी संलग्न अशी दुसरी धारा गोरक्षनाथप्रणीत सिद्धसिद्धांतपद्धतीसारख्या ग्रंथातून येऊन मिळाली आहे. 'महार्थमंजिरी'कार महेश्वरानंद हे काश्मिरी शैवाद्वैती होते. पण तेच गोरक्षनाथ होत असे 'ज्ञानोपासक' यांचे म्हणणे आहे. (ज्ञानोपासक, 'गोरक्षनाथ व महेश्वरानंद,' महाराष्ट्र, मार्च-नोव्हेंबर १९५१) ज्ञानदेवांनी शंकराचार्यांचे खंडन करून गोरक्षनाथांचे अनुसरण केले असा त्यांचा निष्कर्ष आहे. अमृतानुभव हा 'सिद्धानुवाद' आहे असे न. र. फाटकही म्हणतात. शिवसूत्रातील गाभ्याची संकल्पना ज्ञानदेवांनी अमृतानुभवाच्या आरंभी शिवशक्ति समावेशनाच्या काव्यात्म प्रतिमेतून व्यक्त केली आहे.

शैवदर्शनात द्वैताद्वैत, विशिष्टाद्वैत, शक्ति विशिष्टाद्वैत याही धारा आहेत; पण ज्ञानदेवांनी त्यांचा स्वीकार केलेला नाही. त्यातील चिद्विलासवाद मात्र त्यांनी स्वीकारलेला आहे. पण तोही जसाच्या तसा नव्हे. काश्मिरी शैव मताप्रमाणे 'विलास' म्हणजे 'लीला' होय. ज्ञानदेवांच्या मते 'विलास' म्हणजे 'प्रकाश'. पराशिवाची लीला हा शैवांचा अर्थ तर चैतन्याचा प्रकाश, 'जग आसिकी वस्तुप्रभा' (अमृतानुभव ७।२८९) असा ज्ञानदेवांचा अर्थ आहे.

ज्ञानेश्वरीच्या तेराव्या अध्यायात पाच व सहा या श्लोकांवर टीका करताना ज्ञानदेवांनी क्षेत्र हे छत्तीस तत्त्वांचे मानले आहे. संख्यांची २४ तत्त्वे शंकराचार्य, काश्मिरी शैव व ज्ञानेश्वर यांनी सारखीच मानली आहेत. त्याशिवाय शैवांनी वेगळी अशी बारा तत्त्वे मानली आहेत. ती ज्ञानदेवांनी स्वीकारली नाहीत. गणनेने शंकराचार्यांनी ३१ तत्त्वे मानली आहेत. त्याच पंचकर्मेंद्रियांचे पाच विषय मिळवले तर शंकराचार्य व ज्ञानेश्वर यांची तत्त्वे सारखीच व संख्येने छत्तीसच होतात. (वि. मो. केळकर) ज्ञानेश्वरीतील आभासवाद आणि ईश्वराद्वयी काश्मिरी शैवमतातील आभासवाद हे वेगवेगळे आहेत. शैवांच्या शांभव, शाक्त व आणव या मार्गांपेक्षा ज्ञानदेवीतील कुंडलिनीयोग किंवा हरिपाठातील नामयोग निरळे आहेत. तात्पर्य, ज्ञानदेवांनी वसुगुप्ताच्या काही कल्पना स्वीकारल्या तरी काही कल्पना वेगळ्याच मांडलेल्या आहेत.

शांकरवेदान्त आणि शैवागम यांच्यातील साम्यभेदाविषयी परस्परविरोधी मते आहेत. 'दोन्हीत तम-प्रकाशावत विरुद्ध स्वभावाचे नाते आहे' असे पांडुरंग शर्मा म्हणतात. ('ज्ञानेश आणि शांभव तत्त्वज्ञान', ज्ञानेश्वर, नोव्हेंबर १९५१) शं. दा. पेंडसे यांच्या मते या दोन्ही धारा अद्वैती परंपरेतील असल्याने त्यांच्यात तेवढा विरोध नाही. नाथसिद्ध अजातवादी व विवर्तवादी म्हणजे मायावादी असल्याने ज्ञानदेवांनी त्यांचा उपयोग केला. गोरक्षनाथांच्या सिद्धसिद्धांत पद्धतीतील विवेचन गौडपाद, वसिष्ठ आणि शंकराचार्य यांच्या अद्वैताला जवळचे आहे, असेही पेंडसे म्हणतात. यापुढे जाऊन मायावाद आणि चिद्विलास या दोन्हीत मौलिक फरक नाही असा निर्वाळा सुरेंद्र बारलिंगे (शं. रा तळघट्टी यांच्या 'ज्ञानेश्वर विचारदर्शन' ची प्रस्तावना) यांनी दिला आहे.

या दोन पक्षांची ही टोकाची मते पाहिल्यावर ज्ञानदेवांच्या तत्त्वज्ञानाचे सुस्पष्ट दर्शन घडणे किती अवघड आहे, याचा सहज बोध होतो.

०४. स्रोतग्रंथाचे निसरडे स्वरूप

ज्ञानदेवांच्या तत्त्वसरणीचे स्रोत म्हणून अद्वैती परंपरेतील ज्या धारांकडे पाहिले जाते त्यांचे स्वरूप मुळातच निसरडे आहे. श्रीमद्भगवतगीतेंचेच पहा -

सर्वोपनिषदो गावो दोग्धा गोपालनन्दनः।
पार्थो वत्सः सुधीर्भोक्ता दुग्धं गीतामृतं महत्।।
- गीताध्यान ४

वेदांचे सार उपनिषदे आणि उपनिषदांचे सार ही गीता.

ती श्रीकृष्णाने म्हणजे विष्णूच्या अवताराने सांगितलेली आहे. श्रीकृष्णाला शैव मानणारेही सांप्रदायिक आहेत. त्यामुळे ती शैव-वैष्णवांना; नाथ-वारकरी-महानुभाव यांनाही सारखीच पूजनीय आहे. तिच्यात बौद्धविचारही काही प्रमाणात आहे. सर्वश्रेष्ठ धर्म सांगणारा ग्रंथ म्हणून गीतेचा पहिला वापर आद्य शंकराचार्यांनी इसवीसनाच्या आठव्या शतकात केला.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थाद्वारे संगणकीकृत

नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

पण त्यांनी गीतेला स्मृतिप्रामाण्याच्या पातळीवरच ठेवले. ज्ञानदेवांनी मात्र गीतेला श्रुतिप्रामाण्य दिले. वेद 'निद्रिताचा घोरू' आहे तर गीता 'जागृतीचे बोलणे' आहे, असे गीतेचे श्रेष्ठत्व सांगितले आहे. हीच भूमिका पुढे श्रीएकनाथांनी ('कृष्णनिःश्वासे जन्मले वेद। गीता स्वमुखी प्रकटली शुद्ध') आणि नंतर तुकारामांनीही (तुका म्हणे वेद स्वप्नीचे चेहले। ते काय येईल जागृतीसी) घेतल्याचे दिसते. वेदांपेक्षा गीतेचे श्रेष्ठत्व ठसविण्याची ही खास संतांची पद्धत आहे. कर्म, ज्ञान आणि उपासना ही वेदांची तीन कांडे आहेत. पण भक्तीची सांगोपांग मांडणी करावयाची असेल तर वेदापेक्षा गीतेचा आधार घेणे अधिक सोयीचे होते. प्रवृत्तिपर आणि निवृत्तिपर अशीही वैदिक परंपरेची विभागणी केली जाते. पण प्रवृत्तीनिवृत्तीचे एकजीव रसायन सिद्ध करावयाचे तर गीता अधिक उपयुक्त होती. त्यामुळे उपनिषदे, ब्रह्मसूत्रे आणि गीता या वैदिक धर्माच्या प्रस्थानत्रयीपैकी ज्ञानदेवांनी गीतेची निवड केली आणि तिला वेदांची प्रतिष्ठा दिली.

या गीतेचे नेमके प्रतिपाद्य काय आहे ते सांगण्याचे अनेक प्रयत्न झाले. किंबहुना ज्याने गीतेवर काही सांगितले नाही असा अव्वल दर्जाचा कोणीही धर्मज्ञ, प्रतिभावंत आणि प्रज्ञावंत दाखविणे भारतीय परंपरेत शक्य होईल असे वाटत नाही. वेगवेगळ्या काळातील वेगवेगळ्या पंथांच्या व विचारांच्या प्रणेत्यांना गीतेमधून आपल्या कार्याला उपयुक्त असे परस्परभिन्न निष्कर्ष काढता आले हे आपल्याला माहीत आहे. आद्य शंकराचार्य, श्रीज्ञानेश्वरमाऊली, लोकमान्य टिळक, महात्मा गांधी, आचार्य विनोबा भावे अशा वंदनीय पुरुषश्रेष्ठांनी आपापल्या पद्धतीने गीतार्थाचे विवरण केले आहे. त्यांचे सूर परस्परभिन्न व क्वचित विरोधीही आहेत. आणि तरीही त्या त्या काळातील विराट भारतीय लोकमानसाला प्रेरित आणि प्रवाहित करण्याचे सामर्थ्य त्या सुरांनी दाखविले आहे, हे किती आश्चर्य !

भारतीय मनोवृत्तीत परस्परविसंगत गोष्टींचा समन्वय करण्याची क्षमता आहे. मूलभूत विरोध असलेल्या कल्पना हे मन सहजपणे एकाच वेळी स्वीकारते. या प्रवृत्तीचा नमुना म्हणून डी. डी. कोसंबी[०४] गीतेकडे पाहतात. तथापि कालोचित परिवर्तनाला सन्मुख राहणाऱ्या प्रवाही धर्मधारेसाठी आवश्यक असे हे गीतेच्या मंत्राक्षरांचे वैभव आहे; असेही म्हणता येईल. काहीही असले तरी गीतागर्भात अर्थसंभवाच्या अनेक शक्यता आहेत, ही वस्तुस्थिती कायम राहते.

शैवांना आणि नाथांना शं. दा. पेंडसे यांनी मायावादी, अजातवादी आणि विवर्तवादी ठरविले आहे ते त्यांच्यावरही शंकराचार्यांचा प्रभाव आहे हे दाखविण्यासाठी.

पण शंकराचार्य तरी मायावादी होते का याविषयीच मो. प्र. मराठे[०५] यांनी शंका व्यक्त केली आहे. 'जन्माद्यस्य यतः' हे ब्रह्माचे लक्षण आहे. जगाची उत्पत्ती ब्रह्मापासून होते. ब्रह्माच्याच ठिकाणी जग स्थित होते आणि ब्रह्मामध्येच विलीन होते. पाणी बर्फात परिणत होते तसे ब्रह्म जगात आपोआप परिणत होते. शंकराचार्यांना मायावाद किंवा विवर्तवाद सांगावयाचा नसून ब्रह्मकारणतावाद सांगावयाचा होता, असे मराठ्यांचे प्रतिपादन आहे:

असं असेल तर मायावादी आणि चिद्विलासवादी या दोन्ही पक्षांमध्ये हलकल्लोळ उडेल आणि आपल्या बाजू बदलाव्या लागतील; असे आखाड्याबाहेरून पाहताना वाटते.

तेव्हा ज्ञानदेवांच्या तत्त्वज्ञानाचा आधार समजल्या जाणाऱ्या या ग्रंथाचे स्वरूप व संबंध याविषयीची वस्तुनिष्ठ तथ्ये समोर येणे आवश्यक आहे; एवढेच येथे म्हणता येईल.

०५. 'परि हे कव्हणाही न मिळे'

'उपनिषदे, याज्ञवल्क्य, गौडपादकारिका, योगवासिष्ठ, शांकर तत्त्वज्ञान, काश्मिरी शैवसंप्रदाय आणि गुरूपरंपरेने चालत आलेले नाथपंथाचे तत्त्वज्ञान अशा सप्तसिंधूचे ओघ ज्ञानेश्वरांच्या 'अद्वैत' ज्ञानसागराला येऊन मिळालेले दिसतात.[०६] हे वस्तुस्थितीदर्शक विधान आहे असे असूनही पेंडसे ज्ञानदेवांना शांकरमतानुयायी ठरवितात.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

ज्ञानदेवांच्या तत्त्वविचाराच्या स्रोताविषयी कोणतीही एकांगी व अभिनिवेशी भूमिका सत्यापासून दूर नेते. 'ज्ञानदेव आग्रहवादी नसून संग्रहवादी होते.'[७७] विषयाच्या ओघामध्ये निरनिराळ्या विचारांचे व आध्यात्मसाधनांचे ते भरघोस विवरण करतात. त्यामुळे त्या त्या मताच्या अभ्यासकांना आपलेच प्रतिबिंब ज्ञानेश्वरीमध्ये दिसते. असे असले तरी तेथेच किंवा इतरत्र ते त्याचे सापेक्ष मूल्यमापनही करतात. त्यामुळे अशा विचारांचा व साधनांचा गौणप्रधानभाव ज्ञानदेवांच्या लेखनात स्पष्ट होत जातो. त्यांनी जागोजाग जे मूल्यगर्भ अभिप्राय दिलेले आहेत, ते लक्षात घेतले तर बरेचसे वादविवाद कमी होतील. ज्ञानदेवांच्या विचारांची संगती लागेल आणि त्यांच्या तत्त्वज्ञानाचे स्वरूपही पुष्कळसे स्पष्ट होईल.

ज्ञानदेव अनुभवसंपन्न योगी आणि स्वतंत्र बुद्धीचे सिद्धप्रज्ञ होते. त्यामुळे कोणत्याही एका विचारपरंपरेशी त्यांनी स्वतःला बांधून घेतले नाही. स्वानुभव आणि स्वयंप्रज्ञा यांच्या कसोटीवर त्यांनी तत्त्वपरंपरेच्या ग्राह्याग्राह्यतेची निवड केली. त्यांचे आकलन, मूल्यमापन आणि व्यवस्थापन केले. या सर्वांच्या संश्लेषणातून काहीशा स्वतंत्र म्हणता येईल अशा तत्त्वदर्शनाची त्यांनी आपल्या अनुपमेय शैलीत मांडणी केली.

ज्ञानदेवांच्या तत्त्वव्यूहातील घटक आपल्याला इतरत्र दाखविता येतील. पण त्यांचा वापर करून सिद्ध झालेला तत्त्वव्यूह जसाच्या तसा कोठेच दाखविता येणार नाही. 'सकळही शास्त्रे या शास्त्रासि मिळेती परि हे कव्हणाही न मिळे' (लीळाचरित्र-उत्तरार्ध लीळा क्र. ६१ पृ. ७१९) सर्व शास्त्रे या शास्त्राला मिळतात पण हे शास्त्र कोणासही मिळत नाही; असे श्रीचक्रधरांनी आपल्या तत्त्वज्ञानाबद्दल म्हटले आहे. ते तितक्याच यथार्थपणे श्रीज्ञानदेवांच्या तत्त्वज्ञानाबद्दलही म्हणता येईल.

विज्ञानेश्वरापासून हेमाद्रीपंडितापर्यंतची समकालीन वैदिक संस्कृत पंडितांची परंपरा 'बोलिलेंची बोलावे शिजविलेंची शिजवावे' असे चर्वितचर्वण करण्यात धन्यता मानीत होती. या पार्श्वभूमीवर श्रीचक्रधर (इ.स. १२१० ते १२७४) आणि श्रीज्ञानेश्वर (इ.स. १२७५ ते १२९६) या मराठी विचारवंतांनी स्वयंप्रज्ञतेच्या बळावर नव्या वाटा चोखाळल्या आणि महाराष्ट्रीय अस्मितेचा तेजाळ प्रत्यय घडविला.

०६. विचारविकासाचे टप्पे

अद्वैती तत्त्वपरंपरेतील या सगळ्याच स्रोतांशी ज्ञानदेवांचा कमी-अधिक संबंध आला. गो. वि. करंदीकर म्हणतात त्याप्रमाणे या सगळ्यांकडे ज्ञानदेवांच्या विचारविकासाचे टप्पे म्हणून पाहता येईल. ज्ञानदेवांच्या अद्वैती जाणिवेतील स्थित्यंतरे, परस्परसंबंद्धता, अतूटता आणि विकास यांचा आलेख ज्ञानदेवांच्या वाङ्मयात शोधता येतो.

'निगमागमद्रुमफळ' (ज्ञानेश्वरी १८।२) म्हणजे निगम आणि आगम या संयुक्त वृक्षांचे फळ असा सद्‌गुरू निवृत्तिनाथांचा ज्ञानदेवांनी उल्लेख केला आहे. निगम आणि आगम, शैव आणि वैष्णव, नाथ आणि वारकरी अशा भिन्न परंपरांचा संगम श्रीनिवृत्तिनाथांच्या ठायी झालेला होता. गुरूबोधाच्या रूपाने ही संमिश्र परंपरा ज्ञानदेवांपर्यंत पाझरत आलेली आहे. निवृत्ति आणि ज्ञानदेव या गुरूशिष्यांच्या संबंधात भावाभावातील रक्ताचा जिव्हाळा, पितापुत्रातील वात्सल्य आणि प्रियप्राणेश्वरीतुल्य प्रेमभाव यांचे रंग मिसळलेले आहेत. ज्ञानदेवांच्या आध्यात्मिक प्रवासाला निवृत्तिनाथ साक्षी तर होतेच पण आवश्यक तेव्हा सहाय्यकही झाले असावेत. नाथपंथीय वातावरणाचे संस्कार, सत्येंद्रनाथ-गोरक्षनाथांचे ग्रंथ, काश्मिरी शैव परंपरा, वसुगुप्ताचार्यांची शिवसूत्रे, यांच्या संपर्कात ज्ञानदेव येथेच आले असणार. आपल्या अंतःप्रेरणेशी सुसंगत तेवढाच आणि परिभाषा त्यांनी घेतलेली दिसते.

शंकराचार्यांच्या केवलाद्वैताचा घनिष्ठ प्रभाव त्यांच्यावर दिसतो. ज्ञानेश्वरीत तो अधिक प्रमाणात जाणवतो. अमृतानुभवाच्या दोन, तीन व चार या प्रकरणातही तो प्रकट होतो.

रामानुजाचार्यांचे विशिष्टाद्वैत ज्ञानदेवांना मानवण्यासारखे नव्हते. तथापि रामानुजांनी

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थाद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

शांकरमतावर जे आक्षेप घेतले ते त्यांना विचारणीय वाटले. विशेषतः माया व अविद्या या संकल्पना आणि सत्तात्रयाचा सिद्धांत यांचा त्यांनी त्या प्रकाशात फेरविचार केला.

पूर्णाद्वैताच्या वाटेवर चालताना वाल्मीकिप्रणीत 'योगवसिष्ठा'चे साहाय्य झाले असावे. योगवसिष्ठ आणि अमृतानुभव यात 'पराकोटीचे साधर्म्य'असल्याचे शं. दा. पेंडसे यांनी नोंदविले आहे.

या सर्वांचे कमी-अधिक संस्कार स्वीकारीत ज्ञानदेवांच्या तत्त्वविचाराची जडणघडण झाली. परम-सत्याचे ज्ञान आणि अनुभव घेत ज्ञानदेवांना स्वानुभवाचे अमृत लाभले. अंतिम सत्याविषयीची अमर्याद जिज्ञासा आणि त्यासाठी असणारी शास्त्र, तर्क व अनुभव ही साधने त्यांच्या मर्यादा यांच्या ताणातून अमृतानुभवाचे लेखन झाले आहे. त्यांच्या प्रदीर्घ प्रवासातील संस्कार अमृतानुभवात चित्रित झाले आहेत. आणि म्हणूनच गो.वि. करंदीकरांनी अमृतानुभवाला ज्ञानदेवांचे आध्यात्मिक आत्मचरित्र असे म्हटले आहे.

०७. पूर्वपरंपरेला नकार

या प्रवासात ज्ञानदेवांनी परंपरेकडून काही स्वीकारले होते तसे काही नाकारलेही. तेही त्यांच्या स्वभावाप्रमाणे हळुवारपणे. पुष्कळदा कळू न देता. उदाहरणार्थ, 'ज्ञान' हा शब्द ज्ञानेश्वरीतील १४।१५१-१५४ या ओव्यांमध्ये 'विद्वत्ता' किंवा 'विषयज्ञान' या गीतेला अभिप्रेत अर्थाने वापरला आहे. तोच 'ज्ञान' शब्द 'आत्मज्ञान' या अर्थाने अमृतानुभवात ३।१७ वापरला आहे. अज्ञानमूलक ज्ञान बंधनकारक ठरते. - ज्ञानं बंधः - असे शिवसूत्र आहे. हे सूत्र 'ब्रह्मज्ञानही बंधनच आहे' या अर्थाने अमृतानुभवात (३।१६१) वापरले आहे. ज्ञानदेव असे जाणीवपूर्वक करतात. कधी ते पूर्वीच्या शब्दांना नवा अर्थ देतात तर कधी मुळाचा अर्थविस्तार करतात. अशाप्रकारे जुन्याला नवरूप देण्याची त्यांची पद्धती आहे. त्यामुळे ते एका बाजूने परंपरेशी असलेले आपले नाते कायम ठेवतात आणि दुसऱ्या बाजूने स्वतंत्रताही साधली जाते.

ज्ञानदेवांनी परंपरेपासून काही घेतले आहे तसे परंपरेतील काही नाकारलेही आहे. त्यातून त्यांचे वेगळेपण स्पष्ट होते.

श्रीशंकराचार्यांच्या (इ.स. ७८८-८२०) कैवलाद्वैतवादापेक्षा ज्ञानदेवांची तत्त्वदृष्टी वेगळी आहे. शंकराचार्यांप्रमाणे 'जग हा ब्रह्म्याच्या तुलनेने आभास आहे' असे मानीत नाहीत. त्या आभासामागे असलेली मायेची किंवा अविद्येची संकल्पना स्वीकारीत नाहीत. (अमृतानुभव ६/२०, २४, ३८, ३९, ४७, ५७. ७।२१५) ज्ञानदेव जग हेच ब्रह्म मानीत नसले तरी जग हेही ब्रह्मच मानतात. (अमृतानुभव ७।९५, १००, १२४, १३१, १३५, १४५, १५९, १७४, २०४, २५७, २८९.) शंकराचार्यांच्या कैवलाद्वैतात आत्मज्ञानाला प्रतिष्ठा आहे. ज्ञानदेवांच्या पूर्णाद्वैतात अज्ञानाप्रमाणे ज्ञानालाही अस्तित्व नाही. शंकराचार्यांप्रमाणे ज्ञानदेव संन्यास आवश्यक मानीत नाहीत.

मंडनमिश्रांच्या (सातवे शतक) भावाद्वैतात भेदज्ञानाची शक्यता नाकारलेली आहे. ज्ञानदेव भेद आणि अभेद यांना परस्परपूरक ठरवितात. (अमृतानुभव ९।२९). दृष्टिसृष्टिवाद, विवर्त, अविद्या, अतिर्वचनीयत्व या संकल्पनाही नाकारतात. मंडनमिश्र अभाव हा ब्रह्माच्या बाहेर ठेवतात. ज्ञानदेवांच्या ब्रह्माच्या पोटात नाहीपणाही सामावला आहे.

रामानुजाचार्यांच्या (इ.स. १०१७ ते ११३७) विशिष्टाद्वैतवादापेक्षा ज्ञानदेवांचे पूर्णाद्वैत वेगळे आहे. परब्रह्म सविशेष आहे. ईश्वर, चित् व अचित् ही तीनही अंतिम तत्त्वे आहेत. ही रामानुजाचार्यांची मूलभूत बैठक ज्ञानदेवांना मान्य होणे शक्य नव्हते. (अमृतानुभव ५।५२, ७।२८३)

निंबार्काचार्यांच्या (इ.स. अकरावे शतक) भेदाभेदवादापेक्षा ज्ञानदेवांचा सत्कार्यवाद वेगळा आहे. शंकराचार्यांच्या सत्कारणवादापेक्षाही तो वेगळा आहे. कारण व कार्य एक आहे. असे असले तरी कार्यकारणरूप असते पण कारण कार्यरूप नसते; असे शंकराचार्य म्हणतात. कारण व कार्य यात अभेद आहे तसा भेदही आहे; असे निंबार्काचार्य म्हणतात. कारण व

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

कार्य ही सर्वार्थांनी एक आहेत असे ज्ञानदेवांचे प्रतिपादन आहे.

ज्ञानदेवांच्या नंतर पंधराव्या शतकात उदयाला आलेले वल्लभाचार्य (इ. स. १४७९ ते १५३२) शुद्धाद्वैती होते. ब्रह्म, जीवात्मा व जग ही एकच आहेत हे त्यांचे प्रतिपादन ज्ञानदेवांशी जुळणारे आहे. व्यापक संदर्भात स्वीकारलेल्या परिणाम, तिरोभूतत्त्व, सगुणत्व, अविद्या व लीला या वल्लभाचार्यांच्या संकल्पना ज्ञानदेवांना मान्य झाल्या नसत्या.

सत्, चित् व आनंद या तत्त्वांविषयीही ज्ञानदेव इतरांहून वेगळेपण दाखवितात. शंकराचार्यांच्या विचार-प्रणालीत 'सत' ही मूलभूत कोटी आहे. शैवदर्शनात 'चित्' ला अधिक महत्त्व आहे. ज्ञानदेव 'आनंद' या पदाला अधिक महत्त्व देतात. सत्, चित् व आनंद या तिन्ही कल्पना एका 'आनंद' या कल्पनेतून व्यक्त होतात, हे सांगण्यात ज्ञानदेवांचे वैशिष्ट्य आणि योगदान आहे. ईश्वर आणि जग या दोन्हींकडे ते प्रेममय व आनंदमय दृष्टीने पाहतात.[०८] माणूस आणि ईश्वर यांच्यातील संबंध भक्तीचा आहे; असे तर ज्ञानदेवांनी सांगितले आहेच. त्याबरोबरच माणूस आणि जग, माणूस आणि माणूस यातील संबंधांनाही त्यांनी भक्तीचे रूप दिले.[०९]

अशा प्रकारे आपल्या मूळ प्रवृत्तीला पोषक अशा निरनिराळ्या अद्वैती विचारांचे संश्लेषण करीत ज्ञानदेव काहीशा स्वतंत्र म्हणता येईल अशा तत्त्वसारणीपर्यंत पोहोचले.

०८. स्वतंत्र तत्त्वदृष्टी

ज्ञानदेवांच्या स्वतंत्र तत्त्वदृष्टीला रा. द. रानडे 'स्फूर्तिवाद', शं. वा. दांडेकर 'पूर्णाद्वैत', भा. पं. बहिरट 'चिद्विलासवाद', तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी 'आत्मलीलावाद', गो. वि. करंदीकर 'गूढाद्वैत' म्हणतात.

गो. वि. करंदीकर म्हणतात त्याप्रमाणे सगळेच ब्रह्म आहे - (सर्वं खलु इदं ब्रह्मम्। - छांदोग्य ३।१४।१)- ही तत्त्वदृष्टी ज्ञानदेवांइतक्या सर्वंकषपणे व उत्कटत्वाने कोणीही साकार केलेली नाही.

तैसे दृश्य कां द्रष्टा। या दोन्ही दशा वांझटा
पाहतां एकीकाष्ठा। स्फूर्तिमात्र तो।।
- अमृतानुभव ७।२४४

या एकाच ओवीत त्यांच्या पूर्णाद्वैती तत्त्वज्ञानाचे सर्व सार आलेले आहे. ब्रह्माशिवाय दुसरी कोणतीही कोटी, संकल्पना किंवा सत्ता त्यांनी मानलेली नाही. ब्रह्माशिवाय दुसरे काहीही न दिसे, न असे अशी ही स्थिती आहे. एकाशिवाय अधिक असे काहीच नसल्याने येथे व्यवस्था लावण्याचा प्रश्न उद्भवत नाही. ज्ञानदेव व्यवस्था लावीत नाहीत तर अवस्था भोगवू पाहतात. या अवस्थेतील प्रत्येक उद्गारात तद्रूपतेचा आणि तल्लीनतेचा एकच सूर ऐकू येतो.

अद्वैतविचाराच्या आधाराने प्रवास करता करता शेवटी पूर्णाद्वैताच्या गाभाऱ्यात ज्ञानदेवांना भेटलेल्या या अवस्थेला गो. वि. करंदीकर गूढाद्वैत असा शब्द वापरतात. खरे तर द्वैतसापेक्ष अशा या शब्दाला अशा अवस्थेत स्थान नाही.

या गूढाद्वैतात अस्तित्व-नास्तित्व, द्वैत-अद्वैत, भेद-अभेद, सगुण-निर्गुण या कोटी परस्परपूरक ठरून विसर्जन पावतात. गूढाद्वैताच्या या अवस्थेत भोग्य व भोक्ता, क्रिया व अक्रिया, भाषण व मौन, प्रवृत्ती व निवृत्ती, आठवण व विसर, स्वैरता व समाधी, स्वेच्छा व विधी, देव व भक्ती, भक्ता व अभक्ती, कर्म व अकर्म, बंध व मोक्ष ही सर्व सर्व अर्थांनी सारखी ठरतात.

एवं दशोपनिषदे। पुढारी न ढळती पदे।
देखोनि बुडी बांधे। येथेचि दिधली।।
- अमृतानुभव १०।१८

अशा आत्मविश्वासाने स्वानुभवाचे अमृत येथे मांडले आहे. पुढील काही ओव्या पहाव्यात -

आता आमोद सुनास जाले। श्रुतीस श्रवण रिघाले।
आरिसे उठिले। लोचनेसी।। - अमृत. ९।१
जाली स्वेच्छाची विधि। स्वैर जाली समाधी।
दशे इये मोक्षरिद्धि। बैसों घापे।। - अमृत. ९।३३

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

आता देवातेंचि देवें। देववरी भजावें।
अर्पणाचेंति नावें। भलतिया।। - अमृत ९।४०

आता भक्ति अभक्ति। जालें ताट एकी पांती।
कर्माकर्माचिया वाती। माल्हवूनिया।। - अमृत. ९।४९

घालितां अव्हासव्हा पाये। शिवयात्रा होत जाये।
शिवा गेलियाही नोहे। केही जाणें।। - अमृत ९।५२

आपणचि चेंडू सुटे। मग आपणया उपटे।
तेणे उंदळला दाटे। आपणपांचि।। - अमृत ९।५६.

अमृतानुभव हा अशा अंतिम अवस्थेचा वेध घेऊ पाहणारा आणि काव्याच्या अंगाने त्या अंतिम अवस्थेचा प्रत्यय देऊ पाहणारा एक विशुद्ध आध्यात्मिक ग्रंथ आहे.

हे पाणियावरी मकरी। रेखलिया।। अमृत. १०।१७.

हेच त्याचे यथार्थ वर्णन होऊ शकते.

शास्त्रप्रामाण्य, गुरूबोध आणि आत्मानुभव या एकाहून एक चढत्या कसोट्या ज्ञानदेवांनी मानल्या. आत्मानुभवाच्या कसोटीवर स्वयंप्रज्ञेने त्यांनी परंपरागत विचारांची तपासणी केली आणि त्याचे संश्लिष्ट सार आपल्या हाती ठेवले आणि म्हणूनच शिवकल्याणांनी

प्रमेयप्रमाणातीत। अनुभवमात्र ।।
- अमृतानुभव टीका ३।७५.

असा ज्ञानदेवांच्या अमृतानुभवाचा यथार्थ गौरव केला आहे.

०९. श्रीज्ञानदेवांची जीवनदृष्टी आणि जीवनमार्ग

या तत्त्वज्ञानातून ज्ञानदेवांची जीवनाकडे पाहण्याची भूमिका सिद्ध होते. याविषयीचे भा. पं. बहिरट यांचे मूळ विवेचन समोर ठेवणे अधिक योग्य होईल.

"**मायावाद**

तात्त्विक स्वरूप - जग हे अज्ञान कार्य आहे.

नैतिक स्वरूप - नैसर्गिक सर्व वृत्ती, कामक्रोधादी नाहीशा करणे इष्ट.

धार्मिक स्वरूप - ईश्वरानुभूतीच्या आड विश्व येते. जगातून शक्य तो दूर राहिले पाहिजे.

चिद्‌विलासवाद

तात्त्विक स्वरूप - विश्व ही परमेश्वराची स्वतःशी क्रीडा आहे.

नैतिक स्वरूप - वृत्ती नाहीशा करण्याचा प्रयत्न न करता ईश्वरसन्मुख केल्या पाहिजेत.

धार्मिक स्वरूप - जग हे ईश्वरानुभूतीच्या आड येत नाही. त्याचे खरे स्वरूप परमेश्वरी लीलेचे आहे हे ओळखून जगात राहून जगदीशाशी प्रेममीलन अनुभविले पाहिजे.

मायावादाच्या तिन्ही स्वरूपांचा शेवट संन्यासमार्गात होतो तर चिद्‌विलासाच्या सिद्धांताचा शेवट भक्तिमार्गात होतो. मायावादी जग हे त्याज्य मानतो. जडवादी हा जगास भोग्य मानतो. चिद्‌विलासदृष्ट्या जग हे त्याज्यही नाही, भोग्यही नाही तर ईश्वराच्या प्रेमाच्या अनुभूतीचे द्वार आहे. त्यात दोन्हींचा समन्वय साधला जातो. त्यामुळेच

तरि प्रवृत्ति आणि निवृत्ति। यियें वोझिं नेघों मती।
अखंड चित्तवृत्ति। आठवों मी।।
- श्रीज्ञानेश्वरी १२।१२२

सांडूनि प्रवृत्ति निवृत्ति जाण। मजलागी शरण रिघावें
- एकनाथी भागवत १२।२३४

प्रवृत्ति निवृत्तिचे आटोनिया भाग। उतरिलें चांग रसायन
- तुकाराम गाथा.

अशी प्रवृत्ती निवृत्ती या भेदांपलीकडे जाण्याची भूमिका मराठी परंपरेत रुजली.

ज्ञानदेवांच्या तत्त्वज्ञानाचा परिणाम काय झाला हे पहावयाचे तर त्यातून निष्पन्न होणारा जीवनमार्ग पहावा लागतो.

गीता, विष्णुपुराण यांची भक्तिपरंपरा ही निर्गुण, निराकार परमेश्वराची कर्मप्रधान भक्तिपरंपरा आहे. नारायणीय भागवताची भक्तिपरंपरा सगुण-साकार परमेश्वराची संन्यासप्रधान भक्तिपरंपरा आहे. ज्ञानदेवांनी ज्ञानोत्तर भक्तीची जोड दिली.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

वैष्णवाचार्यांच्या प्रेमरूप भक्तीला ज्ञानदेवांनी अद्वैताचा पाया दिला. आणि एक व्यापक असे सामाजिक परिमाणही दिले. भारतीय तत्त्वज्ञानाच्या इतिहासात ही मांडणी केवळ अपूर्व आहे, असे स. रा. गाडगीळ आणि म. वा. धोंड यांनी दाखविले आहे.

दृश्य जगत मायिक मानून ब्रह्म हेच सत्य मानणाऱ्या शांकरअद्वैताची अपरिहार्य परिणती कर्मसंन्यासात होते. पण जगदीशच जगद्रूपाने नटलेला आहे या ज्ञानदेवांच्या चिद्विलासी प्रतीतीने ज्ञानोत्तर कर्म आणि भक्ती यांची वाट खुली होते.

ज्ञानदेवांचा परमात्मा हा जसा सगुण, साकार व विश्वात्म आहे तसा तो निर्गुण, निराकार आणि विश्वोत्तीर्णही आहे. तो ज्ञानाने वेद्य आणि भक्तीने सेव्य आहे. येथे दृश्य जगताच्या आड लपलेले ब्रह्म शोधावयाचे नसून दृश्य जगताच्या रूपाने नटलेले ब्रह्मच ज्ञानदृष्टीने जाणावयाचे आहे. विश्वाच्या सेवेतच विश्वात्मा अनुभवावयाचा आहे. जो सहज प्रेमाचा संबंध ज्ञानदेवांनी ईश्वर आणि माणूस यांच्यामध्ये दाखविला तोच संबंध त्यांनी माणूस आणि विश्व, माणूस आणि माणूस यांच्या नात्यातही पाहिला.

येथे महत्त्व आहे ते उपासकाच्या अंतःकरण-प्रवृत्तीला. त्यातील भावनात्मक उदात्ततेला आणि नैतिकतेला. येथे महत्त्व आहे ते परमात्म्याच्या निर्हेतुक प्रेमलक्षणा भक्तीला. या प्रेमभावापुढे कुळ आणि जाती, वर्ण आणि विद्वत्ता हे अवघेच अकारण आहे, अशी ज्ञानदेवांनी ग्वाही दिली. सत्ता आणि संपत्ती, स्त्री आणि पुरुष असे भेद भक्तीच्या भावक्षेत्रातून त्यांनी दूर सारले.

'सर्वाभूती भगवद्भाव' ह्या भावनेने अशा भक्ताच्या लौकिक संबंधांना आणि जाणिवांना अलौकिकाची झळाळी येते. त्याची नित्यकर्मेही त्या सर्वेश्वराची पूजा ठरतात. ही भक्ती एका बाजूने ज्ञानमूलक आहे आणि दुसऱ्या बाजूने कर्तव्यकर्मप्रधान आहे. भूतमात्रांविषयीची आपली कर्तव्ये निष्काम बुद्धीने आणि प्रेमपूर्वक करण्यातून ती प्रकट होते.

धर्म जीवनापासून वेगळा नाही तर जीवनच धर्ममय आहे. हवा जशी सर्वत्र असावी लागते तसा धर्मही जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात असावा लागतो. आणि म्हणून जीवनापासून पलायन करून नव्हे तर जीवनाच्या मध्यप्रवाहात उभे राहून धर्माचरण केले पाहिजे; असे ज्ञानदेवांचे सांगणे आहे. सर्वत्र ईश्वर आहे हे जाणून निष्ठापूर्वक आपली कर्तव्ये चोखपणे पार पाडणे हाच व्यक्तिमात्राचा स्वधर्म आहे. स्वधर्म ही वैयक्तिक कर्तव्यपालनाची आणि सामाजिक सदाचरणाची संकल्पना आहे. या स्वधर्मकुसुमांनी त्या सर्वात्मक ईश्वराची पूजा केली म्हणजे तो संतुष्ट होतो.

ज्ञानदेवांच्या भक्तियोगात बाहेर तप आणि आत जप आहे. प्रत्येक कर्म बुद्धीला पटले पाहिजे, हृदयात ठसले पाहिजे, कृतीतून प्रकटले पाहिजे. सर्वत्र असलेल्या ईश्वराला ओळखण्यात ज्ञान आहे. त्याच्याशी स्वतःला सेवावृत्तीने जोडण्यात कर्म आहे. हे कर्म करताना परमेश्वराचे अखंड स्मरण करण्यात भक्ती आहे. प्रत्येक कर्म ज्ञानमय, सेवामय आणि प्रेममय झाले पाहिजे. येथेच ज्ञान, कर्म आणि भक्ती एकरूप होतात. सगुण आणि निर्गुण, प्रवृत्ती आणि निवृत्ती, प्रपंच आणि परमार्थ एकरूप होतात. ज्ञानदेवांच्या या तत्त्वशिलेवर वारकऱ्यांचे भक्तिमंदीर उभे आहे.

१०. तत्त्वज्ञानाचे संदर्भक्षेत्र आणि परिणाम

ज्ञानदेवांच्या तत्त्वज्ञानाचा केवळ संकल्पनांच्या पातळीवर विचार करून चालणार नाही. त्या संकल्पनांना अर्थ आणि आकार देणाऱ्या समकालीन (आणि सार्वकालीनही) सामाजवास्तवाशी असलेला त्याचा संबंधही शोधावयास हवा.

वर्णाश्रमधर्माच्या चौकटीत बांधलेल्या समाजाचे आघात ज्ञानदेवांना सोसावे लागले. मातापित्यांच्या जलसमाधीच्या रूपाने त्याची जबर किंमत मोजावी लागली. पांढरीवर घर नाही. काळीवर शेत नाही अशा या जातिबहिष्कृत आणि परित्यक्त महात्म्याला अवघ्या अभाग्यांची वेदना आपलीशी वाटली. तिने त्यांना आपल्या अंगीकृत कार्याचे भान दिले.

दबल्या-दाबल्या, चिरडल्या-चुरडल्या

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

गेलेल्यां-मध्ये आध्यात्मविद्येचे अधिकारी असा आत्मविश्वास ज्ञानदेवांना जागवायचा होता. स्त्रीशूद्रांसह सर्व उपेक्षितांना सामावणाऱ्या नव्या धर्मविचाराचे प्रवर्तन करावयाचे होते. कोणत्याही देशकालास्थितीत समाजजीवन सुखी करणारे आध्यात्मदर्शन घडवावयाचे होते.

अशा 'आर्ताचेनि वोरसे' उचंबळून आलेल्या हृदयाने त्यांनी जग आणि जीवन निववणाऱ्या शांतरसाचा वर्षाव केला.

त्यामागे ब्रह्मविद्येचा सुकाळु करून अवघाचि संसार सुखी करण्याची आणि तिन्ही लोक आनंदाने भरण्याची जिद्द होती. त्यातून अमृताला पैजेवर जिंकणाऱ्या मऱ्हाठ बोलीच्या 'साहित्यसोनियाच्या खाणी' त्यांनी 'इये मराठीचिये नगरी' उघडल्या. सर्वभूतीं सर्वसुखीं संपूर्ण व्हावे अशी ग्रंथपुण्यसंपत्ती त्यांनी सिद्ध केली.

या ग्रंथांनी ज्यांची जीवने वाऱ्यावर व्यर्थ उधळली जात होती त्यांच्या जीवनाला धर्मनिष्ठेचा कणा प्राप्त करून दिला. 'देव भक्तीचा भुकेला। यातिकुळ नाही त्याला' ह्या त्यांच्या आश्वासनाने सामाजिक बंधने परमार्थाच्या क्षेत्रात तरी गळून पडली.

स्त्री-जन्म म्हणुनि न व्हावे उदास।
साधुसंता ऐसे केले जनी।।

अशी कृतज्ञता नामयाची दासी जनी व्यक्त करू लागली.

जातीचे हे शिंपी विश्व जाणे यातें।
आणि प्रत्यक्ष सांगाते जेवविले।।

असा धन्यतेचा निर्भर आनंद नामदेवांनी प्रकट केला.

कांदा मुळा भाजी। अवघी विठाबाई माझी।
लसूण, मिरची, कोथिंबीर।
अवघा झाला माझा हरी।।

असा सावता माळी यांचा प्रपंच हरिरूप होऊन गेला.

काय भुललासि वरलिया रंगा।
चोखा डोंगा परि भाव नोहे डोंगा।।

असा आत्मविश्वस्त भाव चोखामेळ्याच्या ठायी जागा झाला. जनी आणि चोखोबा ही वारकरी संप्रदायाच्या सर्वोदयी आंदोलनातील स्त्री-शूद्रांच्या उद्धाराची श्रेष्ठतम प्रतीके आहेत.

या सर्वांचे स्फूर्तिस्थान होते श्रीज्ञानदेव. त्यांनी स्वानुभव आणि स्वयंप्रज्ञा यांच्या बळावर सर्वसामान्यांना सहजपणे चालता येईल असा परमार्थपथ निर्माण केला. अद्वैतबोध, ईश्वरनिष्ठा, सगुण-निर्गुण उपासना, नाम-स्मरण, हरिकीर्तन, गुरूकृपा, सर्वात्मभाव, आत्मार्पण आणि लोकसेवेसाठी तत्परता ही त्यांची भक्तिसाधना होती. जन्मजात समाजव्यवस्थेने केलेली कोंडी फोडून कोणत्याही व्यक्तीला आत्मोद्धार करता येतो असा विश्वास त्यांनी सर्वसामान्य माणसांमध्ये जागविला. मध्ययुगीन समाजाच्या इतिहासात हा आत्मविश्वास आणि त्यातून निर्माण झालेले, डोळे दिपविणारे आत्मप्रत्ययाचे तेज केवळ अपूर्व होते. त्याने महाराष्ट्राच्या सामाजिक, वाङ्मयीन आणि धार्मिक जीवनात नव्या युगाचे प्रवर्तन घडविले हा इतिहास आहे.

११. अपेक्षा आणि आश्चर्य

श्रीज्ञानदेवांचे चरित्र, सामाजिक पर्यावरण, प्रेरणा, वाङ्मयनिर्मिती आणि कार्य यांचा गाभा म्हणून त्यांच्या तत्त्वज्ञानाचा विचार झाला पाहिजे. ऱ्हासकाळाला नवजीवन देणारी कोणती संजीवनी त्यांच्या तत्त्वज्ञानात होती याचा शोध घ्यावयास हवा. मराठी जीवनात त्यांनी जागविलेला आत्मविश्वास, घडविलेले उत्थान आणि प्रवर्तिलेला मार्ग यांच्याशी अन्वित आणि सुसंगत रूपात त्यांच्या तत्त्वज्ञानाची मांडणी झाली पाहिजे.

अखेरी ज्ञानदेवांच्या तत्त्वज्ञानाविषयी एक आश्चर्यकारक वस्तुस्थिती नोंदवूया. आपला धर्मबोध 'अबालसुबोध' करण्याची ज्ञानदेवांची प्रतिज्ञा होती. वारकऱ्यांच्या सातत्यशील परंपरेकडे पाहिले तर ती तडीस गेली असेच म्हणावे लागते. असे असूनही विद्वान पंडितांमध्ये मतमतांतराचा गलबला दिसावा याचे

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थाद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

आश्चर्य वाटते. पंडित भांबावतात. ज्ञानदेवांच्या तत्त्वविचाराशी झगडतात. याउलट खेड्यापाड्यातले साधेभोळे स्त्रीपुरुष माऊलीचा हात धरून त्यातून निःशंकपणे पार होतात. श्रीज्ञानेश्वरांच्या अमृतवाणीतून अबोध शहाणपणाचे जे पाझर शेतारानापर्यंत पोहोचले त्याचा नमुना म्हणून बहिणाबाई चौधरींच्या अनागर कवितेकडे बोट दाखविले तरी पुरे !

❋ ❋ ❋

संदर्भ आणि टीपा

०१. ज्ञानदेवांचे तत्त्वज्ञान शांकरमतानुसारी आहे याभूमिकेसाठी पहा -

०१. भिंगारकर श्रीपती रघुनाथ तथा भिंगारकरबुवा, 'श्रीमहासाधु ज्ञानेश्वरमहाराज यांचा कालनिर्णय व संक्षिप्त चरित्र,' भिंगारकर, आर्यभूषण, पुणे, १९००. प्रस्तुत लेखन 'केसरी'तून लेखमालेच्या स्वरूपात आधी प्रसिद्ध झाले होते. १८९८-१८९९.

०२. पांगारकर ल. रा. (१) 'श्रीज्ञानेश्वरमहाराज चरित्र आणि ग्रंथविवेचन', पुणे १९१२ दु.आ. १९२४ पुनर्मुद्रण. 'श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे चरित्र' सुमंगल पब्लिशिंग कंपनी, मुंबई, १९९०. (२) 'मराठी वाङ्मयाचा इतिहास' खंड-१, ज्ञानदेव-नामदेव काळ.

०३. रानडे रामचंद्र दत्तात्रय, गुरूदेव, (१) ज्ञानेश्वर वचनामृत, पुणे १९२६. दु.आ. व्हीनस बुक स्टॉल, पुणे, १९५२. नवी आवृत्ती १९८६. (२) 'मिस्टिसिझम इन महाराष्ट्र' १९३३, अनुवाद, 'मराठी संत वाङ्मयातील परमार्थमार्ग' खंड १. कृ. वें. गजेंद्रगडकर (अनुवादक), भारतीय विद्याभवन, मुंबई १९६३.

०४. सुबंध प्रल्हाद सीताराम तथा सुबंध प्रल्हादबुवा (१) 'अमृतानुभव दीपिका' सुबंध, पुणे-मुंबई, (भाग १) १९३०, (भाग २) १९३३. (२) 'जगद्गुरू शंकराचार्य व संतश्रेष्ठ ज्ञानेश्वरमहाराज,' अखंड भारत, दि. २१-५-१९६४.

०५. दांडेकर शंकर वामन तथा मामासाहेब (१) 'श्रीज्ञानदेव : चरित्र, ग्रंथ व तत्त्वज्ञान' जांभेकर, श्रीगणेश, पुणे १९३२. (२) 'ज्ञानेश्वर महाराजांची जगन्मिथ्यत्वाची कल्पना', तत्त्वज्ञानमंदिर, ऑक्टोबर १९३७ ते जानेवारी १९३८. (३) सार्थ श्रीज्ञानेश्वरी संपादन व प्रस्तावना, प्रसाद प्रकाशन, पुणे १९५३.

०६. देशमुख नरहर बाळकृष्ण (संपा.) 'श्रीज्ञानेश्वरदर्शन', भाग १ व २, अहमदनगर १९३४. यातील पुढील लेख पहा.

साहित्यखंड १ -

(१) कुर्तकोटी शंकराचार्य, 'श्रीज्ञानेश्वरदर्शनाचे सार्थक.'

(२) दांडेकर शं. वा., 'श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे तत्त्वज्ञान'

(३) दिवेकर महादेवशास्त्री, 'चिद्विलास'

(४) नाईक म.सा., 'शंकराचार्यांचा मायावाद व ज्ञानेश्वरांचे अज्ञानखंड'.

(५) पंडित नारायण पैकाजी वेदांतकेसरी तथा बाबाजी महाराज, 'शांकर आणि ज्ञानेश्वर वेदांत'.

(६) पांढरीपांडे श्री. ल., 'ज्ञानेश्वरांचे आचार्यानुसरण.'

०७. पंडित नारायण पैकाजी वेदांतकेसरी तथा बाबाजी महाराज (१) 'अमृतानुभवकौमुदी', मांढरे. ज्ञा.उ. पुणे १९३६. (२) 'श्रीज्ञानेश्वरमहाराजांचा चिद्विलास', महाराष्ट्र, नागपूर, १९५१. (३) 'विविधलेखसंग्रह', प्रथमखंड १९६४.

०८. पेंडसे शंकर दामोदर, (१) श्रीज्ञानेश्वरांच्या तत्त्वज्ञानाविषयीचे मतभेद, ज्योत्स्ना, नोव्हेंबर १९३९. (२) 'श्रीज्ञानेश्वरांचे तत्त्वज्ञान' ढवळे प्रकाशन, तत्त्वविवेचक, मुंबई, १९४१. 'आशीर्वाद' ल. रा.पांगारकर. (३) 'श्रीज्ञानेश्वरीचा अभ्यास' शिक्षणप्रसारक मंडळी, पुणे, १९५४. (४) 'अद्वैतवाद व मायावाद', प्रसाद, एप्रिल १९५०. समाविष्ट 'मराठी संत' १९६१. (५) 'महाराष्ट्राचा भागवत धर्म - ज्ञानदेव आणि नामदेव' कॉन्टिनेंटल, पुणे १९६९.

०९. तुळपुळे शं. गो. 'पाच संतकवी', दु.आ. १९६२ (प.आ.) १९४८.

१०. केंघे चि. त्र्यं. (१) 'ज्ञानेश्वर आणि

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

शंकराचार्य,' नवभारत १९५४. (२) 'अमृतानुभवाचे तत्त्वज्ञान,' नवभारत, जानेवारी १९५५. (३) 'शंकराचार्य आणि ज्ञानेश्वर' लेखमाला, जीवनविकास- नागपूर, मे १९५७, ऑक्टो. १९५७, जानेवारी १९५८, जून १९५८.

११. जोशी लक्ष्मणशास्त्री तर्कतीर्थ (१) 'फिलॉसॉफी ऑफ ज्ञानदेव' (बहिरट भा. पं.) चे परीक्षण, नवभारत, मार्च १९५७. (२) 'तत्त्वमीमांसा - आंग्लपूर्व काळ' 'महाराष्ट्र-जीवन' भाग १, सरदार गं. बा. (संपा.), जोशी-लोखंडे, पुणे, १९६०. (३) 'ज्ञानदेवी व ज्ञानदेवी' समाविष्ट 'ज्ञानदेव चिंतन', जोशी वसंत स. (संपा.), वाई, १९७६

१२. देशपांडे अ. ना. (संपा.) 'शं. दा. पेंडसे गौरवग्रंथ अर्थात संतसाहित्य संस्कृतिमंथन', सुविचार, नागपूर-पुणे, १९६३ मधील पुढील लेख पहावेत.

(१) अप्रबुद्ध, 'श्रीज्ञानेश्वरांचा मायावाद'

(२) देशपाडे ग. त्रं., 'शांकरअद्वैत आणि शिवाद्वैतदर्शन काही साम्य'.

१३. केळकर वि. मो. (१) 'भाष्याकारांते (वाट) पुसतु', महाराष्ट्र साहित्य पत्रिका, जाने-मार्च १९७२. (२) 'ज्ञानेश्वर आणि शंकराचार्य' समाविष्ट 'श्रीज्ञानेश्वर नवदर्शन' मुंबई १९७७.

१४. केळकर वि. मो. - मंगळूरकर अरविंद, (संपा.), ज्ञानदेवी खंड १-३ मराठी विभाग, मुंबई विद्यापीठ, मुंबई १९९४. यातील तिसऱ्या खंडातील परिशिष्टात संपादकांचे अनेक टिपणलेख आहेत.

१५. तळघट्टी शंकर रामचंद्र (१) 'ज्ञानेश्वर विचारदर्शन' सन पब्लिकेशन, पुणे १९९४, प्रस्तावना, सुरेंद्र बारलिंगे. या पुस्तकाचे परीक्षण जावडेकर अ. ग. परामर्श, फेब्रुवारी १९९५. (२) 'शंकराचार्य व ज्ञानेश्वर', परामर्श, ऑगस्ट १९८९. (३) 'ज्ञानेश्वरीतील मायावाद', परामर्श, १९९१.

०२. ज्ञानदेवांची भूमिका शांकरमतापेक्षा भिन्न आहे; याविषयीच्या विवेचनासाठी पहा.

०१. भारदे शिवराम एकनाथ तथा भारद्वाज, 'ज्ञानदेव आणि ज्ञानेश्वर' ग. गं. दाभोळकर, चित्रशाळा, पुणे १९३१. प्रस्तुत लेखन प्रथम 'सुधारक' पत्रातून लेखमालेच्या स्वरूपात प्रसिद्ध झाले. १८९८-१८९९.

०२. कुलकर्णी पांडुरंग ज्ञानेश्वर, तथा पांडुरंग शर्मा (१) 'ज्ञानेश्वर महाराज व इतर तत्त्ववेत्ते', चित्रमयजगत, पुणे, १९२२. (२) 'ज्ञानचक्रवर्ती ज्ञानेश्वर', याज्ञवल्क्य, डिसेंबर १९४२. (३) 'ज्ञानेश आणि शांभव तत्त्वज्ञान', ज्ञानेश्वर, नोव्हेंबर, १९५१. (४) 'ज्ञानेश - शांकर की शांभव?', नवभारत, जुलै १९५४. (५) 'ज्ञानेश्वरांचे तत्त्वज्ञान' (शं.दा.पेंडसे) परीक्षण, महाराष्ट्र , मार्च १९५६ ते फेब्रुवारी १९५७.

०३. बहिरट भालचंद्र पंढरीनाथ, (१) 'अमृतानुभव आणि शांकरमत', प्रेमबोध, एप्रिल १९४५. (२) 'फिलॉसॉफी ऑफ ज्ञानदेव', पॉप्युलर, मुंबई, दु.आ. १९६१. (प.आ. १९५६). (३) 'मराठी संतांचा मायावाद', समाविष्ट 'शं.दा. पेंडसे गौरवग्रंथ' उनि. १९६२. (४) भालेराव यांच्या सह, 'वारकरी संप्रदाय : उदय आणि विकास', स. कृ. पाध्ये, व्हीनस, पुणे १९७२. (५) 'ज्ञानेश्वरांचे तत्त्वज्ञान,' समाविष्ट 'श्रीज्ञानेश्वर विविधदर्शन.' १९७५.

०४. हुपरीकर बाळशास्त्री, 'शंकराचार्य व ज्ञानेश्वर' ग्रंथमाला, १९५१

०५. ढवळे ग.वि. तथा ज्ञानोपासक (१) 'गोरक्षनाथ ऊर्फ महेश्वरानंद', महाराष्ट्र, नागपूर, मार्च ते नोव्हेंबर १९५१ (क्रमशः) (२) 'नाथसंप्रदाय आणि ज्ञानेश्वर' ढवळे ग. वि., नागपूर, १९६९.

०६. गोसावी श्री. न. 'ज्ञानेशांचे आचार्यानुसरण', प्रेमबोध, १९५४.

०७. खुपेकरशास्त्री बाळाचार्य मा. (१) 'श्रीशिवागम आणि ज्ञानेश्वर', शिक्षणप्रसारक मंडळी, पुणे, १९६०. (२) 'श्रीज्ञानेश्वरांच्या वाङ्मयाभ्यासाचे दिग्दर्शन', मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, मराठी संशोधन मंडळ, मुंबई, १९६१. (३) 'श्रीज्ञानेश्वरवाङ्मयाचा सांगोपांग अभ्यास' पुणे विद्यापीठ, पुणे १९६३.

०८. सरदार गंगाधर बाळकृष्ण, 'ज्ञानेश्वरांची जीवननिष्ठा' मा. कृ. केळकर, शिक्षणप्रसारक मंडळी, पुणे, १९७१.

०९. गाडगीळ सखाराम रामचंद्र (१) 'वैदिक

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थाद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

यज्ञ, मध्ययुगीन तंत्रसाधना आणि ज्ञानदेवप्रणीत भक्तियोग' दास्ताने रामचंद्र आणि कंपनी, पुणे १९७९. (२) 'प्राचीन व मध्ययुगीन धर्मकल्पना आणि मराठी संत', लोकवाङ्मय गृह, मुंबई.

१०. धोंड मधुकर वासुदेव, 'ज्ञानेश्वरी : स्वरूप, तत्त्वज्ञान आणि काव्य', पुणे-मुंबई, १९८०.

११. करंदीकर गोविंद वि. 'अहो ज्ञानेश्वर' प्रास्ताविक लेख 'अमृतानुभव' (अर्वाचीनीकरण) मौज प्रकाशन गृह, मुंबई १९८१.

१२. रेळेकर नि. ना. - नासिराबादकर ल. रा. (संपा.) 'ग्रंथश्रेष्ठ ज्ञानदेवी' फडके प्रकाशन, कोल्हापूर या ग्रंथातील पुढील लेख पहावेत.

(१) देशपांडे सुधाकर, 'ज्ञानेश्वरीतील भक्ति-कल्पना'

(२) रेळेकर नि. ना., 'ज्ञानदेवीतील परम-भक्तिदर्शन'.

०३. ज्ञानेश्वरांच्या तत्त्वज्ञानावरील शैवागमाच्या प्रभावासाठी पांडुरंग शर्मा, खुपेकरशास्त्री बाळाचार्य, ज्ञानोपासक, रेळेकर नि. ना. यांचे लेखन पहावे. त्यांचे संदर्भ क्र. २ मध्ये नोंदविलेले आहेत. त्याशिवाय पहा -

तगारे ग. वा., 'अभिनवगुप्त आणि ज्ञानदेव' 'पैलतीर' ज्ञानदेव विशेषांक, ऑक्टोबर १९९०. (२) 'ज्ञानदेव आणि वज्रायन पंथ', नवभारत, ऑगस्ट १९५८. (३) 'ज्ञानदेवी आणि शैवदर्शन' समाविष्ट 'एकतरी ओवी अनुभवावी,' कामत अशोक - मोहिते शिवाजी (संपा.) ओंकार व माऊली संयुक्त प्रकाशन पुणे-पंढरपूर, काळ नाही.

०४. कोसंबी दामोदर धर्मानंद तथा डी.डी. 'प्राचीन भारतीय समाज-संस्कृती संवर्धन ऐतिहासिक मागोवा' निवेदक जयंत गडकरी, (कल्चर अँड सिव्हिलायझेशन ऑफ ॲन्शंट इंडिया' या इंग्रजी ग्रंथावरून) दा. ध. कोसंबी एज्युकेशनल ट्रस्ट, मुंबई, काळ नाही. यातील पुढील अवतरण पहा. 'भारतीय समाजमानसाची घडण करणारी संस्कृत भाषेतील रचना कोणती? याचे उत्तर भगवद्‌गीता हेच आहे... भारतीय मनोवृत्तीमध्ये परस्परविसंगत गोष्टींचा समन्वय करण्याची व मूलभूतदृष्ट्या परस्परविरोधी अशा कल्पना सहजगत्या स्वीकारण्याची जी क्षमता आहे तिचे दर्शन गीतेमधील सौष्ठवपूर्ण व नादमधुर संस्कृत भाषेतील तर्कदुष्ट व दैवी संदेशात आहेत.' (पृ. २०८-२०९).

०५. मराठे मो. प्र., 'ए क्रिटिकल एक्झामिनेशन ऑफ द फिलॉसॉफी ऑफ शंकराचार्य विथ स्पेशल रेफरन्स टू हिज ब्रह्मसूत्रभाष्य', युनिव्हर्सिटी ऑफ पूना, १९७३.

आणखी पहा. ममता उपगडे, 'शंकराचर्यांची जगाविषयी भूमिका', परामर्श, मे. १९९५.

०६. पेंडसे शं.दा. 'ज्ञानेश्वरांचे तत्त्वज्ञान', उनि. पृ. ४५१.

०७. उद्‌धृत, पेठे म. प. 'श्रीज्ञानदेव वाग्यज्ञदर्शन', श्रीज्ञानेश्वर विद्यापीठ, आळंदी - पुणे, १९७३. पृ. २८३.

०८. गोखले प्रदीप यांच्यावरील पुस्तकाचे परीक्षण, मोरे सदानंद, परामर्श, मे १९९१.

प्रस्तुत लेखातील मध्ययुगीन साहित्याच्या संदर्भासाठी पुढील प्रती वापरल्या आहेत.

१) 'श्रीज्ञानेश्वरी', वि. का. राजवाडे (प.आ.संपा.) शं. वा. दांडेकर व इतर (दु.आ.संपा.), महाराष्ट्र शासन, मुंबई, तिसरी आवृत्ती, १९६३.

२) 'सार्थ अमृतानुभव आणि चांगदेवपासष्ठी', देशपांडे दत्तराज (संपा), सारथी प्रकाशन, पुणे १९८८.

३) 'श्रीअमृतानुभव विवरण : शिवकल्याणकृत नित्यानंदैक्यदीपिका', खानेलकर गं. दे. (संपा.) १९७१.

४) 'लीळाचरित्र' कोलते वि. भि. (संपा), महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई १९७८.

५) 'गीतापंचक' भाग १, आवटे य. ह., पुणे, शके १८३०.

❊ ❊ ❊

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

वाई
९१५१०६

जन्म भाषेचा, पुराणकथेचा

विश्वनाथ खैरे

(शब्दातल्या शेवटच्या अक्षरातला स्वर बोलण्यात लांबवला जातो, त्याचे लेखन व्यंजनावर अनुस्वार देऊन करण्याची प्रथा आहे. अनुच्चारित अनुस्वार लेखनात येऊ नयेत या प्रमाणलेखनाच्या नियमाशी ही प्रथा विसंगत आहे. म्हणून अनुस्वाराऐवजी अवग्रहचिन्हाचा उपयोग या लेखात केला आहे. या प्रयोगाचा साधकबाधक विचार व्हावा.)

१. जन्म भाषेचा

थोर दिवंगत साहित्यिक दुर्गा भागवत यांनी त्यांच्या 'लहानी' या लहानशा पुस्तकात त्यांच्या लहानपणाचे अनेक शारीरिक आणि बौद्धिक प्रताप वर्णन केले आहेत. दहाबारा वयाच्या त्या स्वतः, त्यांच्याहून चार वर्षांनी मोठा काका, धाकट्या दोन बहिणी आणि चारपाच वर्षांचा धाकटा भाऊ या पंचकडीने 'एकाक्षरी' नवी भाषा बनवण्याचा पराक्रम केला होता. त्याचे वर्णन त्यांच्या शब्दात :

आमचा काका आमचा म्होरक्या. कल्पना त्याच्या डोक्यातून चांगल्या निघायच्या. तो म्हणाला, "आपल्याला कळू नये म्हणून ही माणसं इंग्रजी बोलतात ना? तर आपण पण अशी भाषा बोलू की त्यांना ती मुळीच समजणार नाही. मराठीत बोलायचऽच नाही मुळी."

मग तो माझ्या कानात म्हणाला, "ऐक. प्रत्येक शब्दाचऽ पहिलऽ अक्षर तेवढऽ बोलायचऽ. 'मी भात खाते' असऽ म्हणायचं तर 'मी.भा.खा.' असऽ होईल. आहे की नाही?"

'आहे रे, खरऽच आहे.' मी म्हटले.

त्या दिवशी आम्ही रूढ मराठीतली वाक्ये आमच्या नव्या एकाक्षरी भाषेत बोललो. प्रत्येकाने मोठमोठी वाक्ये म्हणायचा सपाटा लावला. कुणाचा आवाज उत्साहाच्या भरात चढला की काका दटावायचा.

असे करता करता त्या खोलीत दार बंद करून आम्ही आमची भाषा बोलायला सरावलो. तिच्यात आम्ही सुधारणासुद्धा केल्या. 'आई' नि 'आहे' दोन्हीत 'आ'च आहे. मग आम्ही नियम केला की आईतला 'आ' तसाच ठेवायचा. शेजारी कारवारी बिऱ्हाड होते. त्यांच्या बोलीत 'असा' दोन अक्षरांचा शब्द आम्ही क्रियापदाकरता उचलला. मग 'नाही' आलाच. त्याला 'ना' व 'नसा' असे दोन शब्द आम्ही लावले. म्हणजे 'मी जात नाही' असे असले तर 'मी जा ना' आणि 'ते नाही' म्हणायचे तर 'ते नसा' असे करायचे.

त्याचप्रमाणे 'ला' 'कडे' वगैरे प्रत्यय आम्ही तसेच ठेवले होते. असे नियम नि अपवाद करून आम्ही आमची लघुभाषा बनवली. ती भरभर बोललो की खरेच काही नवीनच वाटायची. झपाटेबंद अशी ही भाषा मोठी जोरदार होती. हा जोर अर्थात आमच्या अभिनयातूनच जास्त आला होता. या भाषेने आम्हा मुलांना संघटित केले.

पाच डोकी एक होऊन एकसूत्रीपणाने ही भाषा चालू झाली. मग आम्ही आपापसात मोठ्या मंडळींसमोर ही भाषा मोठमोठ्याने तोऱ्यात बोलू लागलो. आणि काय नवल? सारी माणसे खरोखरच आ वासून पाहू लागली. आम्ही भराभर बोलायचो ते त्यांना कळायचेच नाही. आमचा आनंद गगनात मावेना. मोठ्यांना न समजणारी, नाव गाव नसलेली भाषा आमची आम्ही तयार केली होती. शेजारीपाजारी दुसऱ्या मुलांना सुद्धा आम्ही ती कधी शिकवली नाही. इतकी पक्की ती भागवती भाषा बनली.

पण काय? शेवटी आमच्यातले कुणी

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

फंदफितुरीला बळी न पडताच भाषेचे गुपित फुटले. आमचा मोठा काका बापुकाका, रोज नुसता ऐकायचा. एक दिवस आमच्याच भाषेत त्याने आम्हाला काही सांगितले. आम्ही ते ऐकून चाट पडलो. त्या हुशार माणसाने भाषेची घाटणी हुडकून काढलीच की. मग घरात साऱ्यांनाच ती यायला लागली. म्हणजे समजायला लागली. बोलायचा मक्ता मात्र आमच्याकडेच राहिला. कधी कधी बाहेरचे लोक असले की त्यांच्यासमोर घरचे काही कळू नये म्हणून मोठी माणसे आमच्याशी त्या भाषेत बोलतील तेवढेच. पण ते फक्त इशारे असत. 'तुम्ही इथून जा' 'खायचं झालं आहे' 'भांडू नका' वगैरे. पण पुढे कितीतरी वर्षे, मोठेपणी आम्ही आपापसात त्याच भाषेत बोलायचो. आता आम्हीही ती भाषा बोलत नाही. पण ही आमची एके काळची मिरास होती, ही गोष्ट मात्र खरी. (भागवत १९८० पृ. ९४-१००)

मराठी भाषाविज्ञानाच्या पुस्तकातला पहिला पाठ होऊ शकेल अशी ही भागवती एकाक्षरी भाषेची कथा आहे. या कथेचा विचार, मानवाच्या विकासात भाषेचा उदय कसा झाला असावा याही दिशेने करता येईल. या दिशेचे काही विवेचन मानवी विकास आणि भाषा : अंतःसंबंध (खैरे २००२) या लेखात आले आहे.

वेगळी भाषा तयार करण्यामागे या बालगटाचा काही उद्देश होता. 'आपल्याला कळू नये म्हणून ही माणसं इंग्रजी बोलतात ना? तर आपण अशी भाषा बोलू की त्यांना ती मुळीच समजणार नाही. मराठीत बोलायचऽच नाही मुळी.' मानवी भाषानिर्मितीमागची प्रेरणा अशीच होती असे एक मानीव मानवशास्त्रात मांडले आहे :

..आदि-मानवविकासाच्या द्विपाद, शिकार-रानमेव्यावर जगण्याच्या अवस्थेत आपल्या पूर्वजांचा मेंदू वानरांच्या एवढाच होता. भाषांच्या विकासासाठी मेंदूचा आकार झपाट्याने दुप्पट व्हायला हवा होता - ती घटना त्यानंत खूपच काळाने आली. आदिकाळातला मानव कमी प्रगत मानवाच्या जातींचा नायनाट किंवा त्यांच्यावर स्पर्धामात करीत असतानाचा तो काळ होता.

बरोबरीच्या मानवी जातींना परिसरदोहनात किंवा सांस्कृतिक अंगाने चकवणे, संख्याबळात आणि स्पर्धेत मागे टाकणे आणि शक्य असेल तेथे त्यांच्यावर वर्चस्व मिळवणे किंवा त्यांचा नावनिशाणा नष्ट करणे हे मानवांना अत्यंत महत्त्वाचे होते.

भाषिक विकासाचे फायदे (मानव या) एकाच प्राणिजातीतल्या अंतर्गत स्पर्धात आणि आक्रमणांच्या संदर्भातच आपल्याला दिसतात. त्यांतूनच सर्व भाषांच्या फाटाफुटींचे आणि अस्थिरतेचे स्पष्टीकरण मिळते; कारण, चुकीची किंवा गोंधळात टाकणारी माहिती देणे किंवा माहिती लपवणे हे जीवविकासाच्या संदर्भात, स्वच्छ आणि काटेकोर तपशीलवार माहिती देण्याइतकेच महत्त्वाचे राहिले आहे.

आदि मानवाची शिकार ही लबाडी आणि चुकीची माहिती देण्यावरही अवलंबून होती... स्वजातीतील अंतर्गत स्पर्धेत फसवणूक करणे स्पर्धालू मानवाला साहजिकपणेच जमले असेल आणि भाषा हे अशी लबाडी करण्याचे सुरेख माध्यम होते. (मॅकिनॉन १९७८)

प्रेरणा किंवा उद्देश निश्चित झाल्यावर प्रत्यक्ष जडणघडणीची क्रिया होते. भाषा ही चिन्हव्यवस्था आहे, त्या चिन्हांची आणि व्यवस्थेची निर्मिती सामान्य माणूस करतो आणि एकाहून अधिक माणसांनी ती चिन्हव्यवस्था मान्य केली की त्यांच्या संवादाचे साधन होते - या बाबींचा वस्तुपाठ दुर्गाबाईंच्या कथेवरून मिळतो. त्यांची भाषा 'मोठ्यांना न समजणारी' असल्यामुळे 'मराठी'हून वेगळी होती असे म्हणता येईल.

या भाषेतली चिन्हे मराठीतल्या चिन्हांवरून बनवली आहेत. ही एक उपनिर्मिती म्हणता येईल. चिन्ह आणि अर्थ नेमके जुळणारे असावेत म्हणून तिच्या व्यवहारात, फक्त आद्याक्षरे घेण्याच्या मूळ तत्त्वाला थोडीफार मुरड घातली. चिन्हांचा कच्चा माल मराठीहून वेगळ्या भाषांमधूनही घेतला. चिन्हांच्या शिस्तिमची

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

बांधणी किंवा संरचना करण्यासाठी मराठीचेच व्याकरणरूप उपयोगी पडले होते असे म्हटले पाहिजे. कारण अद्याक्षरे मराठी शब्दरूपांचीच होती. याचमुळे या एकाक्षरी भाषेचे संकेत सोडवणे कुटुंबातल्या दुसऱ्या काकाला शक्य झाले. मातृभाषेप्रमाणेच अन्य अपरिचित भाषाही ऐकून ऐकून येते. त्या अन्य भाषेचा संपर्क वाढत राहिला तर मातृभाषेवर परिणाम ही होऊ शकतो.

समाजातल्या विशेष बुद्धिमान माणसाने एकादी चिन्हव्यवस्था काढावी, समाजाने ती फेरफार करून स्वीकारावी आणि पिढी दर पिढी ती विकसित होत जावी ही बोलीच्या वा भाषेच्या विकासाची कथा आहे.

❋❋❋

संदर्भ आणि टीपा

भागवत, दुर्गा (१९८०) लहानी, वरदा बुक्स, पुणे पृ. ९४-१००

खैरे, विश्वनाथ (२००२) मानवी विकास आणि भाषा : अंतःसंबंध भाषा आणि जीवन, दिवाळी २००२, पृ. ८-१७

मॅक्किनॉ, जॉन (१९७८) दि एप विदिन अस, कॉलिन्स, लंडन पृ. १७९-८२

२. जन्म पुराणकथेचा

(मुंबई विद्यापीठ मराठी विभागाच्या प्रमुख डॉ. पुष्पलता राजापुरे-तापस यांनी मला २६ ऑक्टोबर २००७ सकाळी, विद्यार्थ्यांसाठी 'पुराणकथा' या विषयावर भाषण देण्याची विनंती केली. त्याच्या पूर्वतयारीसाठी एम.ए.ला अभ्यासासाठी लावलेल्या पुस्तकांतली काही वाक्ये उदाहरणादाखल घेऊन त्यांच्यावरून पुराणकथांच्या आकलनाची संकल्पना आणि प्रक्रिया भाषणात विशद केली. विद्यार्थ्यांचा सहभाग हवा म्हणून ती वाक्ये वाचणे, फळ्यावर लिहिणे आणि त्यांचे चित्ररूप फळ्यावर काढणे यासाठी तीन विद्यार्थ्यांना पुढे यायला सांगितले. भाषणाच्या शेवटी त्यांना प्रश्न विचारण्यास सांगितले. त्या भाषणातला काही भाग.)

माझ्या मित्राने त्याच्या दहावीतल्या नातवाला संस्कृत व्याकरण अडते ते समजावून द्यायला मला सांगितले. त्याच्या पुस्तकातले त्याला अडणारे प्रश्न मी समजून घेतले. मग त्याला म्हटले, तू एक मराठी वाक्य लिही. त्यानऽ लिहिलऽ 'मी जातो.' ते अर्थातच संपूर्ण मराठी वाक्य होतऽ. तरी वाक्यात किंवा भाषेत शब्दांचे अनेक प्रकारचे संबंध असतात ते समजून, ज्याला आपण व्याकरण म्हणतो त्याची समज येण्यासाठी, आणखी थोड्या शब्दांची गरज होती. मग 'मी घरून शाळेत जातो' 'मी शाळेतून घरी आल्यावर अभ्यास करतो' अशा सोप्या वाक्यांवरून 'व्याकरण म्हणजे काय' हे त्याला समजावले. नंतर संस्कृत नामांची आणि क्रियापदांची रूपे वाचून त्याने त्यांच्या विभक्ती, वचने पुरुष, काळ वगैरे व्याकरणाच्या बाबी ओळखून सांगितल्या.

आता तुमच्यासमोर पुराणकथांविषयी बोलायचऽ म्हणून अशीच सोपी वाक्यऽ तुमच्याच पुस्तकांमधली घेतली आहेत. ती एकानऽ वाचली आहेत आणि दुसऱ्यानऽ फळ्यावर लिहिली आहेत.

गाढवाचऽ लग्न या वगाच्या गणगौळणीतली ही वाक्यऽ -

'हा आठवा अवतार - गौळणींनो, तुमच्याकरता धरला.

नको आडवू आडराना, नंदाच्या हरि कान्हा।
लहान असुनी गोजिरवाणा, गोकुळी का जुंपिला घाणा।'

ही वाक्यऽ ऐकून या विद्यार्थिनीनऽ कृष्णाचऽ आणि एका गौळणीचऽ चित्र फळ्यावर काढलऽय. तिला मी कितीही म्हटलऽ की दोनचार रेघांचऽ चित्र काढ, तरी मोरमुकुट काढल्याशिवाय तिचऽ चित्र सुरूच होऊ शकत नव्हतऽ. इथेच पुराणकथेला आपण सामोरे जातो. कृष्ण हा पुराणकथेतला नायक आहे. त्याच्या

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

कथा सर्वांनी लहानपणापासून ऐकल्या आहेत. त्यामुळऽ त्याचऽ काही चित्र आपल्या मनात तयार झालेलऽ आहे. तिच्या मनात जे पक्कऽ झालऽय त्यात मोरमुकुट आहे. तो तिच्या कृष्णाचा अविभाज्य भाग झाला आहे.

ते चित्र आणि फळ्यावरचऽ ते लेखन, दोघांचाही उगम त्या शब्दांच्या उच्चारणात होता. ते शब्द बोलणाराच्या कंठातून आले. त्या बोलण्याची जुळणी बोलणाराच्या मेंदूत झाली होती. त्या मेंदूच्या आज्ञेनुसार शब्द बनवण्याची किंवा उच्चारण्याची क्षमता त्या मेंदूत जन्मत: नव्हती; हळूहळू, वयाच्या वर्षभरात तयार झाली होती. अर्थ, आशय, विचार यांची क्षमता मात्र त्या मेंदूत अगदी जन्मापासून किंवा थोडीफार गर्भात असल्यापासूनच होती.

ते अर्थ, आशय किंवा विचार, शब्द किंवा चित्र यांच्या म्हणजे चिन्हांच्या रूपाने फळ्यावर मांडले गेले. गौळण या शब्दातले ग, औ, ळ, ण हे ध्वनी आहेत, त्यांना स्वत:चा अर्थ नाही. ते सगळे मिळून जे शब्दचिन्ह तयार झालऽ त्याला मराठी बोलणारांपुरता काही अर्थ आहे. त्याचा अर्थ चित्र काढणारीला जो कळला त्यावरून तिनऽ चित्रचिन्ह रेखाटलऽ. आपल्या मेंदूत अशी असंख्य चिन्ह साठत जातात. पुराणकथांमधली चिन्हऽ समाजात परंपरेनऽ अनेक पिढ्यांपासून साठत येतात. त्या कथा लहानपणापासून ऐकत आल्यामुळऽ ती चिन्हऽ किंवा चित्रऽ किंवा वर्णनऽ आपल्याला खरी वाटत असतात; आपली त्यांच्यावर श्रद्धा असते.

अशी श्रद्धा असण्याचऽ एक कारण भाषा शिकण्याच्या प्रक्रियेत सामावलेलऽ आहे. मूल भाषा शिकतऽ म्हणजे आईनऽ किंवा समाजानऽ सांगितल्यानुसार, अमुक ध्वनींनी अमुक वस्तूचऽ चिन्ह होतऽ, हे ते मूल बिनबोभाट मान्य करून लक्षात ठेवतऽ, आणि त्याचा पुन्हा पुन्हा त्याच अर्थानऽ उपयोग करायला लागतऽ. पुराणकथेतली माणसऽ किंवा प्रसंग यांच्या बाबतीत तेच होतऽ. म्हणून युरोपातल्या माणसाला कृष्णाची किंवा भारतातल्या माणसाला बायबलातली गोष्ट माहीत नसते किंवा तिच्यावर त्याची श्रद्धा नसते. पुराणकथा श्रद्धेने खऱ्या मानलेल्या असतात हे समजणऽ ही पुराणकथांच्या आकलनातली पहिली पायरी आहे.

आता आपण दुसऱ्या अवतरणाकडऽ पाहू या. ते ढोर या भगवान इंगळे यांच्या आत्मकथनातील पृ. ३ वर आलऽ आहे. इंगळ्यांच्या प्राथमिक शाळेतले गुर्जी एक ते दहा या अंकांची कशी नामी ओळख करून देत असत ते सांगताना सातच्या लेखनाविषयी त्यांनी सांगितलऽय :

चांदोबाची कोर काढून, भामट्याच्या मुलाकडऽ धनुकली करून हाळूनं सांगायचं - "या आलाशिंगनं चांदोमामाला हाऽ आसला दगड हानला. मग त्याला उटला टेंगूळ.' तवा चांदोबाच्या वाटीत गाट काढून गर्जायचं, 'टेंगळावाला, सात रेऽ साताऽचाऽ."

सात या आकड्याचऽ या प्रकारचऽ चित्र कुणालाही काढता येईल हा गुर्जींना विश्वास होता आणि इंगळ्यांनी पण सांगितलऽ आहे की सगळे आकडे चांगले समजायचे म्हणून. ते असऽ दिसेल -

आता या चित्राकडे आपले आपण गुर्जींच्या आणि इंगळ्यांच्या वर्णनानुसार पाहू. आपले आपण म्हणजे असऽ की, हे सात या अंकाचऽ चिन्ह आहे; त्यात सात वस्तू काही आपल्याला दिसत नाहीत. मुळात अंक हीच एक संकल्पना आहे आणि लेखी आकडा हे त्या संकल्पनेचऽ आपल्या समाजातलऽ ते चिन्ह आहे. सात हा आकडा लिहिला यापलीकडे आपण त्या चिन्हाला काही मानीत नाही.

गुर्जींनी मात्र त्या चिन्हातल्या दोन वक्रांना वेगळे आशय दिले आहेत : एक चंद्रकोर तर दुसरे दगड

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

आणि टेंगूळ. त्याशिवाय त्या आशयांची एक कथा पण बनवलेली आहे. आलाशिंग नावाच्या त्यांच्या विद्यार्थ्याला त्या कथेतला नायक बनवला आहे. त्याने दगड हाणला अशी खरी नसलेली घटना रंगवली आहे. एका वक्राला केवळ दिसण्याच्या सारखेपणावरून चंद्रकोर म्हटलऽ आणि ती जणू आकाशातलीच आहे असऽ मानून पृथ्वीवरच्या आलाशिंगनऽ तिच्यावर दगड फेकल्याची कल्पना शब्दांमध्ये मांडली. गुर्जींनी सात या आकड्याच्या मराठी लेखनावर रचलेली ही कथा आहे.

आलाशिंग याच नाव आलातशृंग (कोलीत-शिंग) असऽ करून कथा रचली तर ती प्राचीन संस्कृत पुराणकथा भासवता येईल. ती खरी घडलेली नाही हे आपल्याला माहीत आहे. तरी ती ऐतिहासिक आहे असे दाखवण्याची युक्तीही गुर्जींच्या त्या एका वाक्यातून मिळू शकते. गुर्जींनी चंद्रकोरीवरील दगड हाणण्यासाठी आलाशिंगकडे बोट दाखवले, हे अगदी नकळत झाले असेल, कारण आलाशिंग भामट्याचा मुलगा होता. दगड हाणण्यासारखे काम भामट्या जातीकडून झाले असे म्हणणे सामाजिक पूर्वग्रहांना धरून आहे.

असल्या साऱ्या कल्पना माणसाच्या मेंदूत उद्भवतात. एकाच वास्तवावरच्या दोन माणसांच्या कल्पना वेगळ्या असू शकतात. सात या आकड्याच्या चित्रावर गुर्जी आणि त्यांचा शिष्य इंगळे यांच्या कल्पना अगदी वेगळ्या आहेत. हा शिष्य सातचऽ वर्णन 'चांदोबाच्या वाटीत गाट' असऽ करतो. येथे चंद्राच्या कोरीची वाटी झाली आहे, चंद्राच्या टेंगळाची वाटीची गाठ झाली आहे. पोरवयातल्या इंगळेला घरात नित्य दिसणारी वाटी आठवली, तिला आलेला पोचा आठवला. वाटीत गाठ कशाने आली याचा त्या शिष्याने विचार केला नाही. तरी चांदोबाला वाटीची उपमा दिली आहे. त्यामुळे आलातशृंगापेक्षा एका वेगळ्याच कल्पित कथेची बीजे या शिष्याच्या कल्पनेत आहेत हे आपल्या ध्यानात येईल.

भारतीय पुराणकथांच्या भांडारात एकाच वास्तवावर वेगवेगळ्या कल्पना लढवून रचलेल्या अशा विविध कथा आपल्याला आढळतात. चंद्राशी किंवा इतिहासाशी काही संबंध नसलेल्या एखाद्या वाक्यातल्या कल्पनांवरून त्या रचण्याची रीत आपल्याला समजते. रामायण-महाभारत किंवा अठरा पुराणे यांच्यात आलेल्या कित्येक पुराणकथांचे आकलन या प्रकारे आपल्याला होऊ शकते.

❋❋❋

वैदिक, संस्कृत भाषाशास्त्र, महाभारत – रामायण – भगवद्गीता, संस्कृत वाङ्मय यांचे गाढे अभ्यासक व रसिक समीक्षक

प्राच्यविद्यापंडित डॉ.म.अ.मेहेंदळेकृत

प्राचीन भारत : समाज आणि संस्कृती

निवडक मौलिक लेखांचा संग्रह

प्रा.मे.पुं. रेगे यांच्या विवेचक प्रस्तावनेसह

डेमी आकाराची ३८ + ५१६ पृष्ठे, पुठ्ठा बांधणी

किंमत : रु. ५५०/-

संपर्कासाठी पत्ता : **चिटणीस, प्राज्ञपाठशाळामंडळ, ३१५, गंगापुरी, वाई ४१२ ८०३ (जि. सातारा)**

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थाद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

काल, आज आणि उद्या
राष्ट्रीय ज्ञान आयोग
साक्षी

पंतप्रधान मनमोहनसिंग यांच्या नेतृत्वाखालील पुरोगामी आघाडीच्या सरकारने अधिकार-ग्रहण केल्यानंतर एका वर्षाने, १३ जून २००५ रोजी, राष्ट्रीय ज्ञान आयोगाची स्थापना केली. श्री. सॅम पित्रोदा या आयोगाचे अध्यक्ष असून डॉ. पी. एम्. भार्गव, डॉ. अशोक गांगुली, डॉ. जयंती घोष, डॉ. दीपक नायर व डॉ. नंदन नीलकेनी असे पाच जण या आयोगाचे सदस्य आहेत. या आयोगाचा कार्यकाल २ ऑक्टोबर २००५ ते २ ऑक्टोबर २००८ असा नक्की केला गेला आहे.

पंतप्रधानांना वेळोवेळी धोरण-विषयक आणि सुधारणांविषयी सल्ला देणे हे ज्ञान आयोगाचे मुख्य काम आहे. भारतीय समाजाला ज्ञानावर आधारित समाजाचे रूप देण्यासाठी काय काय करावे, सध्या अस्तित्वात असलेल्या ज्ञानप्रणालींना आधुनिक रूप देणे व नवीन प्रकारच्या ज्ञानप्रणालींची घडण व्हावी यासाठी सरकारने काय पावले उचलावीत, ज्ञानाच्या निर्मितीत व ज्ञानापासून मिळणाऱ्या लाभात समाजातील सर्व घटकांचा सहभाग राहावा याची काय काळजी घ्यावी यासाठीचे दिग्दर्शन ज्ञान आयोगाने करावयाचे आहे.

सरकारने ज्ञान आयोगापुढे खालील पाच मुद्दे विचारार्थ ठेवले आहेत :

(१) एकविसाव्या शतकाची आव्हाने स्वीकारू शकेल व ज्ञानाच्या सर्व क्षेत्रात चाललेल्या जागतिक स्पर्धेत यशस्वी होईल अशी शिक्षण-व्यवस्था निर्माण करणे.

(२) विज्ञान व तंत्रज्ञान यांच्या प्रयोगशाळातून होणाऱ्या ज्ञाननिर्मितीला प्रोत्साहन देणे.

(३) बौद्धिक संपत्तीच्या अधिकारांचा अभ्यास करणाऱ्या संस्थांची कार्यक्षमता वाढवणे.

(४) शेती व उद्योग यांच्यासाठी ज्ञानाचा अधिक उपयोग केला जावा याची काळजी घेणे.

(५) जनतेला अधिक परिणामकारक, पारदर्शक व उत्तरदायी अशी सेवा मिळावी यासाठी सरकारी कारभारात ज्ञानाचा वापर होत राहील असे पाहाणे; आणि, लोकाना (सरकारी कारभाराचा) जास्तीत जास्त लाभ घेता यावा यासाठी ज्ञानाचा प्रसार करणे.

ज्ञान आयोगाने 'राष्ट्राला दिलेला संदेश २००६' या नावाखाली आपला पहिला अहवाल जानेवारी २००७ मध्ये सरकारला दिला. तो आता जनतेसाठी उपलब्ध झाला आहे. आयोगाचा दुसरा अहवालही प्रसिद्ध झाला आहे, पण तो अद्याप हाती आला नाही.

— १ —

ज्ञानसंपन्न समाज निर्माण करावयाचा असेल, तर ज्ञान लोकांपर्यंत पोचवणे हे जरुरीचे आहे. यातील पहिले पाऊल म्हणजे लोकांना साक्षर बनविणे. साक्षरता प्रसारासाठी १९८८ साली 'राष्ट्रीय साक्षरता मिशन'ची स्थापना झाली. मिशनचे उद्दिष्ट असे होते की, १५ ते ३५ या वयोमानातील एकूण जनतेपैकी ७५% जनता २००७ सालापर्यंत साक्षर झाली असली पाहिजे. मिशनने यासाठी असे धोरण आखले होते की, गावोगावी ज्या सांस्कृतिक व सेवाभावी संस्था असतील अशांच्या मार्फत समाज-शिक्षण व समाज जागरूकता यांचा एक भाग म्हणून साक्षरतेचा प्रचार व्हावा.

'मिशन'च्या या कार्यक्रमाचे परिणाम दिसून आले आहेत. १९९१ च्या शिरगणतीप्रमाणे साक्षरतेचे प्रमाण ५२.२१% होते ते २००१ च्या शिरगणतीप्रमाणे ६५.३८% इतके वाढले आहे. परंतु, स्वातंत्र्यप्राप्तीपासून साक्षर लोकांची टक्केवारी जरी वाढत होती, तरी लोकसंख्येत वाढ होत असल्याने निरक्षर लोकांची संख्या कमी होत नव्हती. 'मिशन'च्या कार्यक्रमामुळे प्रथमच असे दिसून आले की, निरक्षरांची संख्या घटली! १९९१ मध्ये निरक्षरांची संख्या ३२.९० कोटी होती ती २००१

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

साली ३०.४० कोटी झाली. ही प्रगती लक्षणीय असली तरी ७५% जनतेला साक्षर करण्यासाठी 'मिशन'च्या प्रयत्नांना आणखी परिणामकारक बनविले पाहिजे. ज्ञान आयोगाने निरक्षरतेच्या प्रश्नाची वर दिलेली मांडणी फक्त केली आहे. परंतु सध्याच्या अहवालात या प्रश्नाच्या सोडवणुकीसाठी उपाय मात्र सांगितलेले नाहीत.

ज्ञान आयोगाने पुस्तकालयांवर स्वतंत्र प्रकरण लिहिले आहे व ते या अहवालाचे वैशिष्ट्य आहे. पुस्तकालये समृद्ध व्हावीत, ती गावोगावी स्थापन व्हावीत, त्यांची सूची तयार असावी, पुस्तकालयात प्रशिक्षित सेवकवर्ग असावा, गावातील रहिवाशांचा पुस्तका-लयाच्या व्यवस्थापनात सहभाग असावा व तो वाढावा इ.अनेक अपेक्षा पुस्तकालयांसंबंधी व्यक्त होतात. ही सर्व कामे झपाटल्या पद्धतीने व्हावीत यासाठी ज्ञान आयोगाने एक 'राष्ट्रीय पुस्तकालय आयोग' स्थापन करण्याची शिफारस केली आहे. केंद्र व राज्य सरकारांनी आपल्या अंदाजपत्रकात पुस्तकालयांसाठी निश्चित रक्कम खर्च करण्यासाठी ठेवावी, अशीही ज्ञान आयोगाची सूचना आहे.

ज्ञान आयोगाच्या शिफारशीतील आणखी एक महत्त्वाचा भाग म्हणजे अनुवाद-कार्यक्रमांवर त्यांनी दिलेला भर. अनुवाद करणे हाही एक उद्योग आहे आणि त्यात दोन ते पाच लाख लोकांना नोकरी मिळू शकते. अनुवादासाठी काय लागत नाही? चांगला अनुवाद करण्यासाठी ज्या भाषेतील पुस्तकाचा अनुवाद करायचा ती भाषा व जीत अनुवाद करायचा ती भाषा या दोन्ही भाषांवर प्रभुत्व असावे लागते. तेवढ्याने भागत नाही; कारण अनुवाद करणे या कलेला भाषांचे ज्ञान हे पूरक आहे. प्रत्यक्ष अनुवाद कला ही भाषाज्ञानापेक्षा काही अधिक आहे. त्यामुळे अनुवाद करण्याचे शिक्षण देणे ही गरजेची गोष्ट आहे. बरे, केवळ परभाषेतील सामग्रीचा अनुवाद स्वभाषेत करावा एवढा एकतर्फीच उद्देश नाही. भारतीय भाषातील पुस्तकांचा व ज्ञानभंडाराचा अनुवाद मलाय, थाई, चिनी अशा भाषातून करणे तितकेच अगत्याचे आहे. त्यातून चांगला धनलाभ होऊ शकतो. अनुवाद उद्योगाशी निगडित अशा विषयांचा थोडक्यात आढावा घेऊन ज्ञान आयोगाने अनुवाद-उद्योगाला चालना मिळावी यासाठी उपयुक्त सूचना केल्या आहेत. त्यापैकी काही अशा आहेत. अनुवादकांची सूची तयार करणे, अनुवादासंबंधी माहिती मिळावी यासाठी 'राष्ट्रीय वेब पोर्टल'ची स्थापना करावी, अनुवादासंबंधात वार्षिक संमेलने घ्यावीत, अनुवादित पुस्तकांसाठी पुरस्कार द्यावेत. शेवटी सूचना अशी आहे की, एक अनुवाद-आयोग स्थापन करावा.

अनुवादाशी संबंधित विषय भाषांच्या शिक्षणाचा. ज्ञान-आयोगाने सर्व भर इंग्रजी भाषेच्या शिक्षणावर दिला आहे. इयत्ता पहिलीपासूनच इंग्रजी भाषेच्या शिक्षणाला सुरुवात व्हावी व तिसऱ्या इयत्तेपासून आणखी कोणता तरी विषय (उदा. इतिहास, भूगोल, विज्ञान किंवा गणित) इंग्रजीतून शिकवावा अशी ज्ञान-आयोगाची शिफारस आहे. साहजिकच प्रश्न असा येईल की, यासाठी शिक्षक कोठून आणावयाचे? यावर ज्ञान-आयोगाचा तोडगा असा की, इंग्रजी भाषेत प्राविण्य दाखविणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देऊन इंग्रजी शिकवायला नेमावे. तसेच निरनिराळ्या सालातील ४० लाख शिक्षकांना दूरदर्शन वरून इंग्रजीचे शिक्षण द्यावे आणि त्यांच्यासाठी उजळणी-वर्गांचे आयोजन करावे.

इंग्रजी शिक्षणावर ज्ञान-आयोगाने दिलेला भर ठीकच आहे. पण इंग्रजीचे शिक्षण व इंग्रजीतून शिक्षण देणारे शिक्षक तयार करण्याचा कार्यक्रम कितपत यशस्वी होईल, याची शंका वाटते. इंग्रजी विषय घेऊन पदव्युत्तर पदवी घेतलेले शिक्षक इंग्रजी विषय शिकविण्यासाठी उमेदवार म्हणून येतात तेव्हा असा अनुभव येतो की, या उमेदवारांना २-३ वाक्ये देखील व्यवस्थित बोलता येत नाहीत. इतकेच नव्हे तर, त्यांनी त्यांच्या पदवी-शिक्षणासाठी लावलेली क्रमिक पुस्तकेदेखील वाचलेली नसतात! तेव्हा प्रशिक्षण देऊन वाकबगार शिक्षक निर्माण करण्याची योजना कितपत परिणाम-कारक होईल, हा प्रश्न आहे. खेरीज, मातृभाषेच्या शिक्षणाविषयी आयोगाने काहीच विचार केलेला दिसत नाही. मातृभाषेच्या बरोबरच इंग्रजीचे

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

शिक्षण सुरू व्हावे इतकाच मातृभाषेचा उल्लेख येतो. आज अशी स्थिती आहे की, पदवीपर्यंत मराठीतून शिकलेल्या विद्यार्थ्यांना देखील शब्दकोश किंवा चरित्रकोश यांचा उपयोग करता येत नाही, कारण त्यांना मुळाक्षरांची क्रमवारीच माहीत नसते! शाळा-महाविद्यालयात शिकताना कोश वापरण्याची वेळच त्यांच्यावर येत नाही.

ज्ञान-आयोगाचे अध्यक्ष सॅम पित्रोदा यांची दळण-वळण (कम्युनिकेशन) शास्त्रातील प्रमुख व्यावसायिक म्हणून ख्याती आहे. साहजिकच भाषा-शिक्षण व ज्ञान-प्रसार यांच्यासाठी दृक्-श्राव्य माध्यमे व संगणक-जाळे वापरावे यावर त्यांचा भर आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना इंग्रजीचा व्यवहारात उपयोग करण्याची वेळच येत नाही. त्यामुळे इंग्रजी संभाषण करण्याची सवय त्यांना होत नाही. यासाठी द्विभाषी आकाशवाणी व दूरचित्रवाणी यांची मदत घ्यावी असा त्यांचा आग्रह आहे. त्याचप्रमाणे एक राष्ट्रीय ज्ञान जाळे (नॅशनल नॉलेज नेटवर्क) स्थापन करण्यात यावे अशी त्यांची सूचना आहे. या ज्ञान-जाळ्याविषयीचे अनेक तांत्रिक तपशिल सदर अहवालात दिलेले आहेत.

– २ –

भारतातील उच्च शिक्षण क्षेत्रातील परिस्थिती चिंताजनक आहे, असे वारंवार बोलले जाते. प्रत्येक नवा शिक्षणमंत्री 'मी शिक्षणव्यवस्थेत आमूलाग्र परिवर्तन घडवून आणीन' अशी प्रतिज्ञा करून सूत्रे हाती घेतो; पण गेल्या साठ वर्षात उच्च शिक्षणात कोणतेच बदल झाल्याचे दिसत नाही. उलट शिक्षणाचा दर्जा खालावतो आहे, विद्यार्थी वर्गात बसतच नाहीत, महाविद्यालयांची झोपडपट्टी पसरत चालली आहे, शिक्षणाची ज्यांना आवड नाही व त्यासाठी योग्य अशी वृत्ती नाही (ॲप्टिट्यूड) असे विद्यार्थी या क्षेत्रात गर्दी करत आहेत; अशी ओरड आपण सतत ऐकत असतो. शिक्षण-आयोग (१९६६) त्यानंतर आलेले नवीन शैक्षणिक धोरण (न्यू पॉलिसी ऑफ एज्युकेशन), त्या धोरणाचा पुनर्विचार करण्यासाठी नेमलेली राममूर्ती-समिती (१९९१) या सर्वांच्या शिफारशींचा रोख असा होता की, विद्यापीठीय शिक्षण थोड्या विद्यार्थ्यांपुरतेच मर्यादित ठेवावे, याच हेतूने शिक्षण-आयोगाने + २ हा नवा टप्पा स्थापन करण्याची शिफारस केली. उद्देश असा की, + २ टप्प्यावरील दोन वर्षात विद्यार्थ्यांना व्यावसायिक शिक्षण द्यावे ज्यामुळे १२ वी नंतरच मनुष्य स्वतःचा व्यवसाय सुरू करील. नवीन शैक्षणिक धोरणाच्या कर्त्यांनी तर इयत्ता आठवीपासूनच व्यावसायिक शिक्षणाला सुरूवात व्हावी, अशी सूचना केली होती. असेही सांगितले जाई की, (आपले आदर्श जे अमेरिका व युरोप) येथे फारच थोडे विद्यार्थी विद्यापीठीय शिक्षण घेतात. उच्च शिक्षण ही एक चैन आहे व ती आपल्यासारख्या गरीब देशाला परवडणारी नाही.

पण १९९१ नंतर जागतिकीकरण व निर्नियंत्रण यांची लाट आली. ज्ञान ही एक व्यापारी वस्तू झाली व ज्ञाननिर्मिती करणाऱ्या महाविद्यालये व विद्यापीठे या संस्थांवर होणारा खर्च हा देखील उत्पादनशील खर्च आहे, असे मानण्यात येऊ लागले. विद्यापीठे व महाविद्यालये यांच्यावर सरकारी खर्च चालूच राहून त्याला खाजगी लोकांच्या पैशाचे पाठबळ मिळाले पाहिजे, असा गजर सुरू झाला. या गजराचा प्रतिध्वनी ज्ञान-आयोगाच्या शिफारसीतून ऐकू येतो.

ज्ञान-आयोग सांगतो की, देशातील एकूण लोकसंख्येच्या ७% इतकी लोकसंख्या उच्च शिक्षणासाठी योग्य अशा वयोमर्यादेतील आहे. या लोकसंख्येपैकी फक्त ६।। ते ७% तरुण आज उच्च शिक्षण घेतात. ज्ञानसमृद्ध समाज घडवायचा असेल तर २०१५ सालापर्यंत आताच्या दुप्पट, म्हणजे संबंधित वयोमर्यादेत असणाऱ्या तरुणांपैकी १५%, लोकांना उच्च-शिक्षण मिळाले पाहिजे, असे होण्यासाठी महाविद्यालये व विद्यापीठे यांच्या संख्येत भरघोस वाढ झाली पाहिजे. आज भारतात फक्त ३५० विद्यापीठे आहेत. ही संख्या १५०० पर्यंत नेऊन ठेवली पाहिजे; आणि ही गोष्ट २०१५ सालापर्यंत प्रत्यक्षात आली पाहिजे. त्यातही उत्कृष्ट दर्जाची राष्ट्रीय (म्हणजे

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

केंद्रसरकारने ज्यांची जबाबदारी घेतली आहे अशी) ५० विद्यापीठे असली पाहिजेत. येत्या तीन वर्षात कमीत कमी १० नवी राष्ट्रीय विद्यापीठे निघाली पाहिजेत.

पदवीपर्यंतचे शिक्षण देणारी महाविद्यालये सध्या विद्यापीठांशी संलग्न असतात. ही संलग्नता हे विद्यापीठांवर पडलेले व त्यांना न सोसणारे ओझे आहे. ज्ञान निर्माण करणे, शिक्षणाचा दर्जा टिकविणे इत्यादी जी विद्यापीठांची मुख्य कर्तव्ये आहेत, ती विद्यापीठांना, या ओझ्यामुळे, पार पाडता येत नाहीत. विद्यापीठांवरील हे ओझे कमी करण्याचे तीन मार्ग ज्ञान-आयोगाने सुचविले आहेत. उत्तम उपाय हा की महाविद्यालयांना स्वायत्त (ऑटोनॉमस) करणे; मध्यम उपाय म्हणजे, महाविद्यालयांचे गट बनवून त्या प्रत्येक गटाला स्वायत्तता देणे; कनिष्ठ मार्ग असा की, पदवी-शिक्षण-परीक्षा मंडळे स्थापन करावीत व या परीक्षा-मंडळांनी महाविद्यालयांचे नियमन करावे. ही परीक्षा-मंडळे राज्यांसाठी निरनिराळी असावीत व एक केंद्रीय-परीक्षा मंडळही असावे. काही महाविद्यालयांना एकवट महाविद्यालये म्हणून विकसित करावे. अशा महाविद्यालयात व्यावसायिक व सर्व सामान्य (प्रोफेशनल व जनरल) असे दोन्ही अभ्यासक्रम एकत्रित शिकविले जातील. या एकवट महाविद्यालयांचे नियंत्रण केंद्रीय-परीक्षा-मंडळाने करावे.

भारतातील आजची अपुरी शिक्षण व्यवस्थाही अवाढव्य आहे. या शिक्षण-व्यवस्थेवर नियंत्रण ठेवण्यासाठी राज्य सरकारांची व केंद्रसरकारची विविध मंडळे आहेत. असे दिसते की, निरनिराळ्या तेरा मंडळांकरवी आज शिक्षणाचे नियंत्रण होते. नियंत्रण करणाऱ्या अधिकार-मंडळांचा जो गजबजाट झाला आहे, त्यामुळे नवीन शिक्षणसंस्था काढणे, त्यांना मान्यता मिळविणे, त्यांच्यासाठी निधी पुरविणाऱ्या संस्थांकडून पैसे मिळविणे इत्यादी गोष्टी गुंतागुंतीच्या होऊन बसल्या आहेत. ज्ञान आयोगाने म्हटले आहे की, 'सध्याची नियंत्रण-व्यवस्था चांगल्या शिक्षण संस्थांच्या स्थापनेतील अडथळा बनून राहिली आहे. ज्या संस्था अस्तित्वात आहेत त्या संस्थांवरील नियंत्रणचा या नियंत्रण-व्यवस्थेने केलेला वापर चुकीचा व चुकीच्या बाबतीत केलेला असतो. ही नियंत्रण-व्यवस्था अभिनव किंवा विधायक अशा योजना सुरू करू देत नाही. तेव्हा अशी एक स्वतंत्र (म्हणजे सरकारच्या आधीन नसलेली) नियंत्रण व्यवस्था निर्माण केली पाहिजे की जी उत्तम शिक्षण संस्थांच्या विकासाला प्रोत्साहन तर देईलच पण शिक्षणसंस्थांमध्ये उत्तरदायित्वाची (अकौंटेबिलिटी) भावना वाढवील!'

या विचारसरणीतून 'इंडिपेंडंट रेग्युलेटरी ऑथॉरिटी फॉर हायर एज्युकेशन' (आय्.आर्.ए. एच्.ई.) स्थापन करण्याची सूचना पुढे आली आहे. या अधिकारमंडळाने शिक्षण संस्थांच्या बाबतीत पाच प्रकारची कार्ये पार पाडायची आहेत. (१) शिक्षणसंस्थेला मान्यता देणे. मान्यता याचा अर्थ असा की, शिक्षणसंस्थेने विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावा, त्यांना शिक्षण द्यावे व शेवटी पदवी द्यावी या प्रक्रियेला अधिकारमंडळाने संमती दिली आहे. (२) शिक्षणाची गुणवत्ता ठरविण्याचे निकष तयार करायचे व शिक्षणसंस्था त्या निकषांवर उतरेल असे शिक्षण देत राहील याची काळजी घ्यायची. (३) सरकारी अनुदाने मान्यता प्राप्त शिक्षणसंस्थामध्ये कशी वाटावयाची, हे ठरवायचे. (४) विद्यार्थ्यांना शिक्षण उपलब्ध होईल व ते योग्य मूल्य देऊन मिळेल अशी व्यवस्था करावयाची. (५) शिक्षणसंस्थातून बाहेर पडणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांचा व्यवसाय करण्यासाठी परवाना द्यावयाचा.

हे अधिकारमंडळ स्थापन झाले की, विद्यापीठ अनुदान मंडळ, अखिल भारतीय तांत्रिक शिक्षण मंडळ (एआयसीटीई) इत्यादी अधिकारमंडळे नाहीशी होणार आहेत, अशातला भाग नाही. ही अधिकारमंडळे या नियामक मंडळाचे घटक बनतील. उदाहरणार्थ, नियामक मंडळाचे तिसरे कार्य अनुदाने करण्याचे नियम ठरविणे आहे; प्रत्यक्ष अनुदान देण्याचे काम विद्यापीठ अनुदान मंडळच करीत राहील. त्याचप्रमाणे तांत्रिक शिक्षण संस्थातील शिक्षणाची गुणवत्ता तपासण्याचे काम अ.भा. तांत्रिक शिक्षण मंडळच करील, पण ते (पक्षीः तांत्रिक शिक्षण मंडळ) नियामक मंडळाचे एक घटक म्हणून

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

काम करील. थोडक्यात, या नवीन नियामक मंडळाने शिक्षण व्यवहाराला बसलेला नोकरशाहीचा विळखा कमी होईल किंवा शिक्षणसंस्थांवर होत असणारा अधिकार मंडळांचा जाच थांबेल, असे काही वाटत नाही.

ज्ञान आयोगाने या नियामक मंडळाची (आय् आर ए एच् ई) घटना अशी कल्पिली आहे. नियामक मंडळाची स्थापना संसदेने एक कायदा मंजूर करून करावी. या नियामक मंडळाचा एक अध्यक्ष व सहा सभासद असावेत. प्रत्येक सदस्याचा कार्यकाल सहा वर्षांचा असावा; पण दर दोन वर्षांनी एक तृतीयांश सभासद निवृत्त होतील व नवे नेमले जातील. अध्यक्ष व सदस्य याची नेमणूक पंतप्रधान करतील; पण या सदस्यांची निवड एका निवडसमितीकडून केली जाईल. थोडक्यात म्हणजे राजकीय हस्तक्षेपापासून हे नियामक मंडळ मुक्त राहील.

— ३ —

प्रश्न साहजिकच असा येईल की, या शिक्षण संस्थांचा आर्थिक प्रपंच कसा चालेल? भारतीय शिक्षणव्यवस्था इंग्रजी राज्याच्या स्थापनेपासून सरकारी अर्थसहाय्यावर अवलंबून होती व सरकारी छत्राखालीच नांदत होती. नवीन शैक्षणिक धोरणाच्या काळापासून असे सांगण्यात येऊ लागले की, उच्च शिक्षण ही सरकारची जबाबदारी नाही; प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाची कुचंबणा उच्च शिक्षणावर बेसुमार पैसा खर्च होत असल्याने होते. तेव्हा सरकारने उच्च शिक्षणाच्या आर्थिक जबाबदारीतून स्वतःला मोकळे करावे व शालेय शिक्षणाकडे ते पैसे खर्च करावेत. खाजगी वैद्यकीय व अभियांत्रिकी महाविद्यालयांचे भरपूर पीक महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्र व तामिळनाडू या राज्यातून आले ते याच विचारसरणीतून. महाराष्ट्र राज्य आता नवीन महाविद्यालये स्थापन करण्याला परवानगी देते तेच मुळी या अटीवर की, महाविद्यालयाला कधीही सरकारी अनुदान मिळणार नाही.

पण आता ज्ञान-आयोग निराळाच विचार मांडत आहे. सध्या भारताच्या संपूर्ण अंतर्गत उत्पन्नाचा (ग्रॉस डोमेस्टिक प्रॉडक्ट) फक्त ०.७% भाग उच्च शिक्षणावर खर्च होतो व ही रक्कम अगदीच अपुरी आहे. ज्ञान आयोगाचे असे प्रतिपादन आहे की, संपूर्ण अंतर्गत उत्पन्नाचा १.५% भाग तरी उच्च शिक्षणावर सरकारकडून खर्च झाला पाहिजे. २०१२ सालापर्यंत तरी खर्चाची ही पातळी गाठली गेली पाहिजे. सरकारी अनुदानाखेरीज विद्यापीठांना व महाविद्यालयांना इतरही आर्थिक स्रोतांचा उपयोग करून घेता येईल. अनेक विद्यापीठांकडे शेकडो एकर जमीन आहे. तेव्हा अशा विद्यापीठांना हे भूमिरूपी अनुदानच मिळाले आहे. या जमिनीचा उपयोग करून विद्यापीठे पैसे उभे करू शकतात. ज्ञान आयोगाने स्पष्ट शब्दात असे म्हटले नसले तरी त्याच्या सूचनेचा गर्भितार्थ सहज कळण्याजोगा आहे. पुणे विद्यापीठाने पूर्वी 'व्हिजन २०२०' नावाची योजना काढली होती. या योजनेने विद्यापीठाच्या आवारात एक जंगी खाते-दुकान (मॉल) काढावे असे सुचविले होते. फर्ग्युसन महाविद्यालय-मार्गावर पुणे विद्यापीठाची 'रानडे संस्था' नावाची इमारत आहे. तेथेही एक प्रचंड खाते-दुकान काढण्याची योजना होती.

ज्ञान आयोगाने शिक्षण-शुल्कात सुधारणा (रॅशनॅलायझेशन) करण्याची सूचना केली आहे. ज्ञान आयोग सांगतो की, विद्यापीठे व महाविद्यालये यांच्या खर्चाची २०% भरपाई तरी शिक्षण-शुल्कातून झाली पाहिजे. तसेच मूल्यसूचकांक (प्राईस-इंडेक्स) जसा चढत जाईल त्याप्रमाणे दर दोन वर्षांनी शुल्कात वाढ देखील केली पाहिजे. अशा शुल्कवाढीला हात घालण्यापूर्वी दोन गोष्टींची पूर्तता व्हावयला हवी. एक, ज्यांची आर्थिक परिस्थिती अनुकूल नाही, अशा विद्यार्थ्यांना (कर्जरूपाने किंवा शिष्यवृत्तीच्या रूपाने) केवळ शुल्काचेच नव्हेत तर उपजीविकेसाठीही पैसे पुरविण्याची व्यवस्था झाली पाहिजे. आजच्या अनुदान-प्रणालीनुसार विद्यापीठाने/महाविद्यालयाने शुल्कवाढी-तून किंवा अन्य मार्गाने पैसे मिळविल्यास तेवढी रक्कम अनुदानातून वजा होते. ही अट काढून टाकली पाहिजे.

उच्च शिक्षणसंस्थांना पूर्वी देणगीच्या रूपाने

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

चांगली मदत होत असे. १९५० च्या दशकात उच्च शिक्षणावर होणाऱ्या खर्चापैकी १२% खर्च देणग्यातून मिळणाऱ्या पैशातून होत असे. तथापि, नव्वदीच्या दशकात देणग्यांपासून मिळणारी मदत ३% वर आली. यालाही कारण चुकीची अनुदान प्रणाली हेच आहे. एखाद्या महाविद्यालयाने / विद्यापीठाने १ लाख रूपये देणगीच्या रूपाने उभे केले तर तेवढी रक्कम अनुदानातून वजा होते. खरे तर शिक्षण-संस्थेने लाखभर रूपये मिळवले तर उत्तेजनार्थ तेवढ्याच रक्कमेचे अनुदान सरकारने त्या संस्थेला दिले पाहिजे. या संस्थांनी आपले पैसे कुठे गुंतवावेत यावरही निर्बंध आहेत. त्यामुळे कमी व्याज देणाऱ्या ठेवीत या रकमा ठेवाव्या लागतात. ज्ञान–आयोगाच्या प्रतिपादनाचा कल असा दिसतो की, शिक्षणसंस्थांना (विद्यापीठे व महाविद्यालये) आपले पैसे किफायतशीरपणे–म्हणजे समभागातून किंवा म्युच्युअल फंडातून गुंतविण्याचे स्वातंत्र्य द्यावे. माजी विद्यार्थिसंघाकडूनही शिक्षणसंस्थांना भरघोस पैसे मिळू शकतात. पण, यासाठी, शिक्षणसंस्थांनी अधिक नाविन्यपूर्ण मार्गांचा अवलंब केला पाहिजे.

ज्ञान-आयोगाचे असे निरीक्षण आहे की, व्यावसायिक (उदा. वैद्यक, अभियांत्रिकी व व्यवस्थापन) शिक्षणापैकी ३/४ भाग आज खाजगी क्षेत्राच्या हातात आहे. पण सामान्य शिक्षण (म्हणजे कला, विज्ञान व वाणिज्य(?) या शाखा) शिक्षण देणाऱ्या संस्था व विद्यापीठे अजूनही बहुतेक सर्वस्वी सरकारी अनुदानावर अवलंबून आहेत. याबाबतीत फायद्याच्या आमिषाने खाजगी भांडवलदार पैसे गुंतवितील ही अपेक्षा वाजवी ठरणार नाही. ज्ञान–आयोगाची अशी सूचना आहे की विद्यापीठे (व महाविद्यालयेही) आपल्याकडील जमिनीचा उपयोग खाजगी गुंतवणूकदारांना करण्याची परवानगी देऊ शकतील व त्याच्या बदल्यात मिळणारा पैसा आपल्या (विद्यापीठांच्या) विकासाकरिता वापरू शकतील.

शिक्षणासाठी निधी उभा करण्याचा आणखी एक उपाय म्हणजे परदेशी विद्यार्थ्यांना आपल्या देशांत येऊन शिक्षण घेण्यासाठी आकर्षित करणे व त्यातून परदेशी चलन मिळविणे. ज्ञान आयोगाची अशी टिपणी आहे की, तीस वर्षापूर्वी जेवढे परदेशी विद्यार्थी भारतात शिक्षणासाठी येत होते, तितकेही आता येत नाहीत. उलट भारतातून दर वर्षी एक लाख साठ हजार विद्यार्थी परदेशी शिकायला जातात व त्यासाठी दरवर्षी १८,४०० कोटी रूपये खर्च होतात. तेव्हा देशातील उच्चशिक्षणाचा माहोल व दर्जा सुधारल्यास आपण भारतीय विद्यार्थ्यांना भारतातच शिक्षण घेण्यासाठी थांबवू शकू व परदेशी विद्यार्थीही ओढून घेऊ शकू.

– ४ –

उच्च शिक्षणाचा – म्हणजे पारंपरिक सामान्य शिक्षणाचा–दर्जा सुधारायचा असेल तर या शिक्षणाशी संबंधित अशा प्रत्येकाला जबाबदारीची, म्हणजेच उत्तरदायित्वाची, जाणीव करून दिली पाहिजे. या शिक्षणव्यवस्थेतील प्रत्येक जण व्यवस्थेतील इतरांना उत्तरदायी आहेच; पण संपूर्ण व्यवस्थाही समाजाला उत्तरदायी आहे. यासाठी शिक्षणसंस्थेतील कामकाजाचे नियम अधिक काटेकोर व परिणामकारक केले पाहिजेत. शिक्षणव्यवस्थेला समाजाप्रति उत्तरदायी बनविणे याचा अर्थ, आजपर्यंत, आपण असा केला की सरकारी नियमांनी व्यवस्थेला करकचून आवळणे. पण ज्ञान आयोगाचे असे सांगणे आहे की, काही उपायाने आपण शिक्षण व्यवस्थेच्या मूल्यमापनात विद्यार्थी व पालक यांना सामावून घेतले पाहिजे. याला एक उपाय हा आहे की, शिक्षणसंस्था इतक्या मोठ्या प्रमाणात उपलब्ध करून देणे की, विद्यार्थ्यांना निवडीसाठी अनेक पर्याय राहातील व त्यातून शिक्षणसंस्थांचे आपोआपच मूल्यमापन होत राहील.

विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी विविध पर्याय उपलब्ध करून देणे याचाच अर्थ असा की, शिक्षणाच्या संस्था–संस्थांमधील स्पर्धा वाढविणे. आज वाई किंवा भोर अशा ठिकाणी एकेकच महाविद्यालय आहे. या ठिकाणच्या विद्यार्थ्यांना त्या महाविद्यालयातून प्रवेश घेण्याखेरीज पर्याय नाही. साहजिकच, या महाविद्यालयांचे मूल्यमापन विद्यार्थ्यांकरवी व्हावयाला हवे

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

तसे होत नाही. या विद्यार्थ्यांना विकल्प मिळाल्यास, म्हणजे दुसरी महाविद्यालये (तेच किंवा अन्य काही) शिक्षण देण्यास उभी राहिली, तर चालू महाविद्यालयांचे काहीसे यथातथ्य मूल्यमापन होण्यास अवसर राहील. याच्याच पुढची पायरी म्हणजे देशातील शिक्षण-व्यवस्था व परदेशी शिक्षण-व्यवस्था यांच्यात आपण स्पर्धा उभी करू शकलो तर भारतीय शिक्षण व्यवस्थेचे मूल्यमापन सहजच होईल म्हणून ज्ञान-आयोग असे सांगतो की, विदेशी विद्यापीठे व शिक्षणसंस्था यांना भारतात विना हरकत आपले व्यवसाय थाटता आले पाहिजेत व भारतीय शिक्षण संस्थांना परदेशात आपले व्यवसाय चालविता येतील अशी व्यवस्था केली पाहिजे.

आज 'राष्ट्रीय चाचणी व प्रमाणपत्र मंडळ' (नॅक) ही संस्था देशातील शैक्षणिक संस्थांचे मूल्यमापन करीत असते. या मूल्यमापनाविषयी ज्ञान-आयोगाने काही महत्त्वाची निरीक्षणे नोंदविली आहेत. 'नॅक'कडे आज शिक्षणसंस्थांच्या मूल्यमापनाची मक्तेदारी आहे, हा पहिला दोष आहे. या दोषातून दुसऱ्या दोषाची पैदास होते, ती ही की, हे काम बरेचसे लहरी राहाते. तिसरी कमतरता ही की, 'नॅक'कडे विविध प्रकारच्या शिक्षणसंस्थांचे योग्य मूल्यमापन करता येईल अशी सामग्री नाही. यावर उपाय म्हणून ज्ञान-आयोगाची अशी सूचना आहे की, 'राष्ट्रीय उच्च शिक्षण नियामक मंडळा'ची (आय्.आर्.ए.एच्.ई.) स्थापना झाल्यावर या संस्थेने अनेक खाजगी मूल्यमापन संस्थांना (एजन्सीज) शिक्षणसंस्थांचे मूल्यमापन करण्याचा परवाना द्यावा. म्हणजे नॅक व या इतर मूल्यमापन संस्था तरतरीतपणे काम करू लागतील.

गुणवत्ता सुधारण्यासाठी स्पर्धा हा लोकमान्य उपाय ठरला की, दोन शिक्षण संस्थात किंवा एकाच शिक्षणसंस्थेतील दोन विभागात व एकाच विभागातील दोन शिक्षकात स्पर्धेचे बीज रूजविणे ओघाने आलेच. ज्ञान आयोगाने या वस्तुस्थितीला नाराजीयुक्त मान्यता दिली आहे की, काम चांगले न करणाऱ्या शिक्षकाला किंवा संस्थेला शिक्षा करण्याचा रिवाज आपल्याकडे नाही. पण जो चांगले काम करतो त्याला प्रोत्साहन द्यायला तरी कोणाची हरकत नसावी? तेव्हा आज जी समान (युनिफॉर्म) वेतनश्रेणी सर्व शिक्षकांना दिली जाते ती व्यवस्था कायम ठेवून आपण चांगले काम करणाऱ्या शिक्षकाला अगर चांगले शिक्षण देणाऱ्या संस्थेतील सर्व शिक्षकांना प्रोत्साहनपर पगार का न द्यावा? ज्ञान-आयोगाच्या या सूचनेचा विचार सहाव्या वेतन आयोगाने दिलेल्या वेतनश्रेणींपैकी कोणत्या वेतन श्रेणी उच्च शिक्षणव्यवस्थेत लागू करायच्या हे ठरविताना विद्यापीठ अनुदान आयोग करील अशी धास्ती किंवा अपेक्षा या व्यवस्थेत काम करणाऱ्यांना वाटल्यावाचून राहाणार नाही.

❋❋❋

सूचना : राष्ट्रीय ज्ञान आयोगाच्या पहिल्या अहवालाचा केवळ आढावा आम्ही दिला आहे. शिक्षणप्रेमी व शिक्षणव्यवस्थेचा अभ्यास करणारे लोक असतील त्यांनी याबाबतची आपली मते 'नवभारत'कडे आवर्जून पाठवावीत. त्या चर्चेत 'नवभारता'त अवश्य प्रसिद्धी मिळेल.

संपादक

❋❋❋

अनुक्रमणिका
मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

रजिस्टर. क्र. **11697/57**

आपल्या ग्रंथालयात अवश्य हवीत अशी

प्राज्ञपाठशाळा मंडळ ग्रंथमालेची

संग्राह्य वैचारिक मराठी प्रकाशने

	सुधारित किंमत २० नोव्हेंबर २००६ पासून लागू
❑ वैदिक संस्कृतीचा विकास (तिसरी आवृत्ती) । तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी	३०० रु.
❑ अद्वैतसिद्धीचे मराठी भाषांतर (पूर्वार्ध) । ब्र. स्वामी केवलानंद सरस्वती	२०० रु.
❑ पुरोहितवर्गवर्चस्व व भारताचा सामाजिक इतिहास । डॉ. सुमंत मुरंजन	१२० रु.
❑ हिंदी साहित्यविचार । प्रा. प्यारेलाल गोहेल	२५ रु.
❑ श्री. यशवंतराव चव्हाण अभिनंदन ग्रंथ	६० रु.
❑ संशोधन साधना । डॉ. वसंत स. जोशी	६० रु.
❑ तरंगयामिक व पुंजयामिक । मा. ग. टोळे	२० रु.
❑ आर्यांच्या सणांचा प्राचीन व अर्वाचीन इतिहास । ऋग्वेदी	१५० रु.
❑ वागीश्वरी । डॉ. गो. के. भट	६० रु.
❑ प्रस्थानभेद (प्राचीन १४ विद्यांची माहिती) पुनर्मुद्रण । गं. वा. लेले	५० रु.
❑ गिर्यारोहण परिचय । अच्युत खोडवे	४० रु.
❑ इतिहासाचे तत्त्वज्ञान (दुसरी आवृत्ती) । सदाशिव आठवले	१३० रु.
❑ दासशूद्रांची गुलामगिरी (भाग २) । शरद पाटील	१५० रु.
❑ शाहीर हैबती । डॉ. शिवाजीराव चव्हाण	४० रु.
❑ गीताचिकित्सा । भाऊ धर्माधिकारी	१४० रु.
❑ तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी (चरित्र) । सौ. मालती देशपांडे	२५ रु.
❑ बौद्ध धर्माचा अभ्युदय आणि प्रसार । प. ल. वैद्य	५० रु.
❑ हिंदू धार्मिक परंपरा आणि सामाजिक परिवर्तन (संवर्धित दुसरी आवृत्ती) । मे. पुं. रेगे	१६० रु.
❑ पाच पुस्तक-परीक्षणे । वा. म. कुलकर्णी	६० रु.
❑ भेदविलोपन : एक आकलन । अशोक केळकर	३० रु.
❑ कॉलिंगवुडची कलामीमांसा - एक भाष्य । रा. भा. पाटणकर	१०० रु.
❑ धर्मश्रद्धा : एक पुनर्विचार । दि.के. बेडेकर	३० रु.
❑ आचार्य शं. द. जावडेकर : व्यक्तित्त्व आणि विचार	१०० रु.
❑ तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, कार्य आणि विचार	१५० रु.
❑ इहवाद आणि सर्वधर्मसमभाव । मे. पुं. रेगे	१२० रु.
❑ प्राज्ञपाठशाळा आणि तिची परंपरा	२०० रु.
❑ चार्वाक : इतिहास आणि तत्त्वज्ञान (तृतीयावृत्ती) । सदाशिव आठवले	१०० रु.
❑ विनोबांची संस्कृत साम्यसूत्रे (रसग्रहणात्मक मराठी अनुवाद) । वसंत नारगोलकर	१२० रु.
❑ नागरी समाज, राज्यसंस्था आणि लोकतंत्र : भारतीय संदर्भात विवेचन । द.ना. धनागरे	४० रु.
❑ प्राचीन भारत : समाज आणि संस्कृती (निवडक मौलिक लेखांचा संग्रह) । डॉ. म. अ. मेहेंदळे	५५० रु.
❑ हिंदुधर्माची समीक्षा आणि सर्वधर्मसमीक्षा (दुसरी आवृत्ती) । तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी	२२५ रु.
❑ पाश्चात्त्य नीतिशास्त्राचा इतिहास (दुसरी आवृत्ती) । प्रा. मे. पुं. रेगे	१६० रु.

१) ग्रंथालये व संस्थांना किंमतीत १० टक्के सूट. पोस्टेजचा खर्च वेगळा पडेल. २) व्ही.पी. ची पद्धत नाही.
३) पैसे मनिऑर्डरने वा ड्राफ्टने पाठवावेत.

संपर्कासाठी पत्ता : चिटणीस, प्राज्ञपाठशाळा मंडळ, ३१५ गंगापुरी, वाई ४१२८०३ (जि. सातारा)

हे मासिक घ.वा. जोशी यांनी अक्षरसाहित्य, ३५, गुरुकृपा सो., शाहूनगर, गोडोली, सातारा ४१५००१ येथे छापून सरोजा भाटे यांनी प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाई यांच्याकरिता तेथेच प्रसिद्ध केले.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई